मूल्यवर्धन

# महाराष्ट्रातील मूल्यवर्धन कार्यक्रम : सद्य:स्थिती

श्री. शांतिलाल मुथ्था यांनी केलेल्या पाहणीचा अहवाल

२०१६-२०१७

SHANTiLAL MUTTHA FOUNDATiON









फक्त खाजगी वितरणासाठी

© शांतिलाल मुथ्था फाउंडेशन,

**प्रकाशन : एप्रिल २०१७**
द्वारा : शांतिलाल मुथ्था फाउंडेशन, ८ वा मजला, मुथ्था चेम्बर २, सेनापती बापट मार्ग,
पुणे – ४११ ०१६, (महाराष्ट्र), भारत
फोन : (+९१) २० ६६०५००००
www.mutthafoundation.org info@mutthafoundation.org

# प्रस्तावना

नोव्हेंबर २०१५ मध्ये  महाराष्ट्र शासन आणि मुथ्था फाउंडेशनमध्ये करार होऊन मूल्यवर्धन कार्यक्रमास राज्यात प्रारंभ झाला. विद्या प्राधिकरणाने मूल्यवर्धन आराखडा, शाळांत वापरायचे शैक्षणिक साहित्य यांची तपासणी करून मंजुरी दिली. फाउंडेशनतर्फे शिक्षक प्रशिक्षण घेऊन इयत्ता पहिली ते तिसरीच्या वर्गात मूल्यवर्धन उपक्रमाचे आयोजन करण्यास उत्साहाने प्रारंभ झाला. शिक्षकांनी अल्पावधीत हा कार्यक्रम स्वीकारला. विद्यार्थीही उपक्रमामध्ये रमू लागले. पालक व ग्रामस्थांमध्ये उत्सुकता निर्माण झाली. लोकाग्रहामुळे या कार्यक्रमाचा विस्तारही नागपूर जिल्ह्यात करण्यात आला. आजमितीस हा कार्यक्रम ३४ जिल्ह्यांतील ६३ केंद्रांतील ७२४ शाळांत सुरु असून यामध्ये ३७०३२ विद्यार्थी सहभागी आहेत.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेन्द्र फडणवीस व शिक्षणमंत्री मा. श्री. विनोद तावडे यांनी दि. ७ नोव्हेंबर २०१६ रोजी मूल्यवर्धन कार्यक्रम आढावा बैठकीचे आयोजन केले. यामध्ये प्रधान सचिव, शिक्षणविभाग मा. नंदकुमार, शिक्षण आयुक्त मा. धीरजकुमार, संचालक, प्राथमिक शिक्षण विभाग व विद्या प्राधिकरण मा. गोविंद नांदेडे व शिक्षण विभागाशी संबंधित अधिकारी आणि 'शांतिलाल मुथ्था फाउंडेशन'चे संचालक श्री. वल्लभ भन्साळी, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वेंकटरामन व अध्यक्ष या नात्याने मी उपस्थित होतो. या बैठकीत श्री. नंदकुमार यांनी मूल्यवर्धनच्या कार्यक्रमाचा आराखडा, एक वर्षात मूल्यवर्धन कार्यक्रमाची झालेली अंमलबजावणी इत्यादी बाबी मा. मुख्यमंत्र्यांसमोर मांडल्या. यावेळी मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची एक चित्रफीत दाखविण्यात आली. या चर्चेनंतर मा. मुख्यमंत्री व मा. शिक्षणमंत्री यांनी सध्या मूल्यवर्धन कार्यक्रम प्रत्येक जिल्ह्याच्या एका केंद्रात चालू आहे, तो महाराष्ट्रातील जिल्हापरिषदेच्या सर्व शाळांपर्यंत पोहोचविण्याचा निर्णय एकमताने घेतला.

मूल्यवर्धन कार्यक्रमाचे पायाभूत सर्वेक्षण (बेसलाईन सर्व्हे) ज्ञान प्रबोधिनीच्या माध्यमातून प्रयोगिक शाळांमध्ये करण्यात आले. गेल्या एक वर्षात विद्या प्राधिकरण तसेच शांतिलाल मुथ्था फाउंडेशनच्या शिक्षण तज्ञांनी सर्वच्या सर्व ३४ जिल्ह्यांमध्ये जाऊन कार्यक्रमाचे अवलोकन केले. मा. मुख्यमंत्री व मा. शिक्षणमंत्री यांच्या बैठकीमध्ये जेव्हा मूल्यवर्धन सर्व शाळांमध्ये पोहोचविण्यासंदर्भात निर्णय घेतला, तेव्हा मी स्वतः सर्व ३४ जिल्ह्यांमध्ये जाऊन या सर्व कार्यक्रमाचा विस्तृत आढावा घेण्याचे ठरविले. त्यानुसार, दि.१६ नोव्हेंबर २०१६ ते दि. २२ फेब्रुवारी २०१७ दरम्यान हा कार्यक्रम ज्या केंद्रात सुरु आहे, अशा महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात जाऊन मी त्या केंद्रांना भेटी दिल्या. तेथील मूल्यवर्धन शिक्षक, मुख्याध्यापक, विद्यार्थी, शिक्षक प्रशिक्षक, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, पालक यांच्या भेटी घेऊन त्या त्या केंद्रामध्ये मूल्यवर्धन कशा पद्धतीने सुरु आहे, गेल्या वर्षभरात मूल्यवर्धन अंमलबजावणीमध्ये स्थानिक पातळीवर काही अडचणी येत आहेत का, याचा आढावा घेतला. निरनिराळ्या स्तरावर शिक्षक प्रशिक्षण प्रक्रिया पार पाडताना काही अडचणी आहेत का? शिक्षक प्रशिक्षकांनी इतर शिक्षकांना केंद्रामध्ये दिलेले प्रशिक्षण शिक्षकांनी व्यवस्थित स्वीकारले आहे का? त्याप्रमाणे आपल्या शाळेत ते यशस्वीपणे राबवीत आहेत का? ते राबविल्यानंतर स्वतः शिक्षकांमध्ये व नंतर विद्यार्थ्यांमध्ये काही सकारात्मक बदल दिसून येत आहेत का? या सर्व बाबींचा बारकाईने शोध या भेटींमध्ये घेतला. यासाठी विद्या प्राधिकरणाबरोबर चर्चा करून या दौऱ्याचे उद्देश व स्वरूप स्पष्ट करणारे निवेदन सर्व जिल्हा

शिक्षणाधिकाऱ्यांसाठी तयार करून पाठवले. त्यामध्ये दौऱ्यात मला सहकार्य करण्याची विनंती करण्यात आली होती.

मूल्यवर्धन कार्यक्रमाची अंमलबजावणी चांगल्या पद्धतीने चालू असलेल्या जिल्ह्यामध्ये याची व्याप्ती केंद्रामधून २–३ तालुक्यांमध्ये वाढविता येणे शक्य आहे का? जिल्ह्यातील प्रशिक्षक ही जबाबदारी पार पाडू शकतील का? जिल्ह्यातील चांगले काम करणारे शिक्षक स्वेच्छेने या कामासाठी तयार होतील का? जर हे सर्व शक्य झाले तर, प्रत्येक जिल्ह्याच्या नेमक्या किती व कोणत्या तालुक्यांत याची व्याप्ती सन २०१७ मध्ये वाढविणे शक्य आहे, याची चाचपणी या दौऱ्यात केली. मूल्यवर्धन कार्यक्रमाचा विस्तार २–३ तालुक्यात करत असताना जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा शिक्षणाधिकारी व संबंधित तालुक्याचे गट शिक्षणाधिकारी या सर्वांचे या बाबतीत काय मत आहे व ते किती आग्रही आणि उत्साही आहेत या गोष्टींचा अंदाज घेतला.

समग्र शाळा दृष्टिकोनातून (होल स्कूल ॲप्रोच) मूल्यवर्धन शिक्षकांबरोबरच शाळेतील इतर शिक्षक, मुख्याध्यापक, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, पालक, विद्यार्थी व शिक्षणाधिकारी या सर्व हितसंबंधी घटकांना (स्टेक होल्डर्स) मूल्यवर्धन कार्यक्रमाबद्दल आवड कशा पद्धतीने निर्माण होईल किंवा मूल्यवर्धन कार्यक्रमाची माहिती या घटकांपर्यंत कशी पोहोचवता येईल याचा अंदाज संबंधितांशी बोलून घेतला. गेल्या एक वर्षापासून मूल्यवर्धन कार्यक्रम ३४ जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी एका केंद्रातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सुरु आहे. परंतु एकाही जिल्ह्यात याबाबत कार्यक्रमाच्या प्रसिद्धीवर भर न देता अंमलबजावणीवरच भर देण्यात आला होता.

या दौऱ्याचा अहवाल आपणापुढे सादर करताना मला समाधान वाटत आहे. मला हे मुद्दाम स्पष्ट करावेसे वाटते की हा संशोधन अहवाल नाही. या दौऱ्यातून मूल्यवर्धन कार्यक्रम अंमलबजावणी विषयी मला जे आकलन झाले त्यानुसार माझी प्रांजळ निरीक्षणे मी या अहवालात मांडली आहेत ही निरीक्षणे हितसंबंधितांच्या बैठकांमध्ये झालेली चर्चा, मुलांशी झालेला मुक्त संवाद, शिक्षक पालकांनी सांगितलेले अनुभव यावर आधारित आहेत. यातून मूल्यवर्धन कार्यक्रम राज्यात कशा प्रकारे सुरु आहे याचे सर्वसामान्य चित्र वाचकांच्या डोळ्यांसमोर उभे राहील अशी अपेक्षा आहे .

माझे अनुभव समृद्ध करणाऱ्या या आनंददायी दौऱ्याचे नेटके नियोजन करून तो यशस्वी करण्यामध्ये विद्या प्राधिकरणातील, विविध जिल्ह्यातील व एसएमएफ मधील अधिकारी, कर्मचारी यांचे तसेच स्थानिक कार्यकर्ते यांचे मोलाचे सहकार्य झाले आहे. या सर्वांचा मी मनापासून आभारी आहे.

**शांतिलाल मुथ्था**
अध्यक्ष ,
शांतिलाल मुथ्था फाउंडेशन, पुणे

# अनुक्रमणिका


पृष्ठ क्र.

अ. मूल्यवर्धन : सर्व जिल्ह्यातील काही समान निरीक्षणे ..... १

ब. मूल्यवर्धन कार्यक्रम : जिल्हा भेटीतील वेचक वेधक अनुभव ..... २

१. चंद्रपूर ..... २
२. गोंदिया ..... २
३. गडचिरोली ..... ३
४. नांदेड ..... ३
५. उस्मानाबाद ..... ४
६. अमरावती ..... ४
७. अकोला ..... ४
८. बुलढाणा ..... ५
९. नाशिक ..... ५
१०. नंदुरबार ..... ६
११. सोलापूर ..... ६
१२. ठाणे ..... ७
१३. पालघर ..... ८
१४. रत्नागिरी ..... ८

क. मूल्यवर्धन कार्यक्रम : जिल्ह्यातील प्रसंगचित्रे ..... १०

१. नागपूर ..... १०
२. वर्धा ..... १०
३. चंद्रपूर ..... ११
४. गोंदिया ..... १२
५. भंडारा ..... १३
६. गडचिरोली ..... १४
७. लातूर ..... १५
८. नांदेड ..... १५

**पृष्ठ क्र.**


९. उस्मानाबाद ........ १७
१०. औरंगाबाद ........ १७
११. जालना ........ १८
१२. परभणी ........ १९
१३. हिंगोली ........ २०
१४. अमरावती ........ २१
१५. अकोला ........ २२
१६. वाशीम ........ २३
१७. बुलढाणा ........ २४
१८. यवतमाळ ........ २५
१९. नाशिक ........ २६
२०. जळगाव ........ २७
२१. धुळे ........ २८
२२. नंदुरबार ........ २९
२३. सोलापूर ........ २९
२४. अहमदनगर ........ ३०
२५. रायगड ........ ३१
२६. ठाणे ........ ३२
२७. पालघर ........ ३३
२८. कोल्हापूर ........ ३४
२९. सांगली ........ ३४
३०. सातारा ........ ३५
३१. रत्नागिरी ........ ३६
३२. सिंधुदुर्ग ........ ३६

## अ. मूल्यवर्धन कार्यक्रम : सर्व जिल्ह्यांतील काही समान निरीक्षणे

सर्व जिल्ह्यांतील मूल्यवर्धन कार्यक्रमाचा अनुभव घेतल्यानंतर काही बाबीमध्ये बरेच साम्य आढळले ही सामाईक निरीक्षणे पुढे थोडक्यात नमूद केली आहेत.

१) मूल्यवर्धन हा पूर्णतः या उपक्रमावर आधारित कार्यक्रम असल्यामुळे प्रत्येक उपक्रम करीत असताना प्रत्येक ठिकाणी विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग, आनंद व उत्साह असल्याचे जाणवले. उपक्रम साधे, सोपे, उपयुक्त असल्यामुळे शिक्षकांनाही याचा आनंद घेता आला. एका अर्थाने हे उपक्रम म्हणजे ज्ञानरचनावादाची प्रात्यक्षिकेच आहेत. त्यामुळे जर हा पाया भक्कम झाला तर संपूर्ण शालेय वातावरणामध्येच आमूलाग्र बदल घडवण्याची क्षमता त्यामध्ये आहे.

२) संपूर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्याचा दौरा केला असता, कोणत्याही जिल्ह्यामध्ये शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, पालक, विद्यार्थी, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य यांपैकी एकाही व्यक्तीचा या कार्यक्रमाला विरोध दिसून आला नाही. उलटपक्षी कमी जास्त प्रमाणात उत्साह असल्याचे जाणवले.

३) शांतिलाल मुथ्था फाउंडेशन आणि विद्या प्राधिकरण यांच्यामार्फत संयुक्तपणे प्रत्येक जिल्ह्यातील तीनच साधन व्यक्तींना मूल्यवर्धन कार्यक्रम आयोजनाचे प्रशिक्षण देण्यात आले होते. परंतु या तीन साधन व्यक्तींनी आपापल्या जिल्ह्यात स्वतःच्या केंद्रातील इतर शिक्षकांना अतिशय सक्षम पद्धतीने प्रशिक्षण दिल्याचे जाणवले.

४) मूल्यवर्धन या कार्यक्रमातील उपक्रम बालस्नेही व आनंददायी कृतींवर (ज्ञानरचनावाद, जोडीचर्चा, गटचर्चा, सहयोगी खेळ, चित्र काढणे, गाणी, गोष्टी इत्यादींवर) आधारित असल्यामुळे सर्वच ठिकाणी मूल्यवर्धन कार्यक्रम राबविण्यात शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये उत्साह असल्याचे निदर्शनास आले.

५) ज्या ज्या ठिकाणी विद्यार्थ्यांची किंवा शिक्षकांची संख्या कमी असल्यामुळे दोन-दोन वर्गातील मुले एकत्र बसविली जातात, अशा प्रत्येक ठिकाणी मूल्यवर्धनचे उपक्रम दोन्ही वर्गांना उपयुक्त होत असल्याचे दिसले.

६) प्रत्येक जिल्ह्यात विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संपर्क साधला असता, अनेक वेगवेगळ्या प्रश्नांना उत्तरे देत असताना विद्यार्थी आनंदी व उत्साही असल्याचे सर्वच ठिकाणी जाणवत होते. अतिशय लहान लहान खेडेगावांमधून जोडीचर्चा, गटचर्चा या उपक्रमामुळे विद्यार्थी विचार करू लागले आहेत. एकमेकांचे विचार ऐकून घेऊ लागले आहेत. दुसऱ्याचे विचार ऐकण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण होत आहे. एकमेकांना सहकार्य करण्याची भावना त्यांच्यात वाढत आहे. विद्यार्थी व पालक आणि विद्यार्थी व शिक्षक यांच्यामध्ये असणारे अंतर कमी होत असल्याचे स्पष्टपणे दिसून आले.

७) पुढील वर्षी सर्व जिल्ह्यांमध्ये मूल्यवर्धनची व्याप्ती वाढविण्यासाठी केंद्रप्रमुख, गट शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी हे उत्साही असल्याचे आढळून आले. कारण मूल्यवर्धन कार्यकम विस्ताराच्या दृष्टीने जिल्ह्यांच्या सर्वच केंद्रप्रमुखांकडून कमीतकमी ११ व जास्तीतजास्त ३६ मूल्यवर्धन साधन व्यक्तींची (मास्टर ट्रेनर्स) यादी विद्या प्राधिकरणाकडे सादर करण्यात आली.

भेटींदरम्यानच्या या तीन महिन्यात ७५० शाळांतील २००० शिक्षक, अधिकारी, विद्यार्थी व पालक यांच्या भेटी झाल्या. त्यामध्ये सर्व हितसंबंधी व्यक्तींचा (स्टेकहोल्डर्सचा) मूल्यवर्धनच्या संदर्भातील उत्साह असे दर्शवित होता की, मूल्यवर्धन ही काळाची गरज आहे. मूल्यवर्धनमुळे ज्ञानरचनावाद हा प्रत्यक्ष उपक्रमाच्या माध्यमातून वर्गात वापरण्याची संधी सर्वांना मिळाली व त्यामुळे झालेले फायदे सर्वांसमोर दिसून आले. काही ठिकाणी शिक्षक संघटनांनी स्वतःहून मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या विस्ताराचा आग्रह धरला. प्रत्येक जिल्ह्याकडून आगामी वर्षात मूल्यवर्धन कार्यक्रम तालुका व जिल्हा पातळीवर विस्तारित करण्यासाठी शिक्षक प्रशिक्षकांच्या याद्यासुद्धा विद्या प्राधिकरणाकडे पाठविण्यात आल्या.

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमधील मूल्यवर्धन उपक्रमाबद्दलचा सकारात्मक दृष्टिकोन पाहता मूल्यवर्धनचा विस्तार करण्याची आवश्यकता अधोरेखित होत आहे.

## ब. मूल्यवर्धन कार्यक्रम : जिल्हा भेटीतील वेचक वेधक अनुभव

मूल्यवर्धन पाहणी दौऱ्यामध्ये कार्यक्रमाच्या अंमलबजावणीविषयी अनेक सकारात्मक, उत्साहवर्धक, विशेष अनुभव आले. काही जिल्ह्यांतील अशा नोंद घेण्याजोग्या, वैशिष्ट्यपूर्ण घटना पुढे आवर्जून नमूद केल्या आहेत.

### १. चंद्रपूर

लोकशाहीची मूल्ये व त्यासंबंधित कौशल्ये विकसित करण्यासाठी सातत्याने व नियोजनबद्ध संधी देणे हा प्रमुख उद्देश समोर ठेवून राज्यातील जि.प.च्या प्राथमिक शाळांमध्ये मूल्यवर्धन कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. सध्या मूल्यवर्धन ३४ जिल्ह्यांतील ३८ केंद्रामध्ये सुरू आहे. मूल्यवर्धन कार्यक्रमाचा आढावा घेण्याकरिता बुधवार दि. २२ फेब्रुवारी २०१७ रोजी सकाळी ९:३० वा मूल्यवर्धन कार्यक्रम आढावा बैठक चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर तालुक्यातील कोठारी केंद्रातील मानोरा जि.प. उच्च माध्यमिक शाळेत पार पडली.

**मूल्यवर्धनमधील 'माझ्या जबाबदाऱ्या' या उपक्रमांतर्गत 'मुले स्वत: वर्गनियम तयार करतात, दुसऱ्यांचे ऐकून घेतात. इयत्ता तिसरीतील एका विद्यार्थ्यांला (नाव मुद्दाम दिलेले नाही,) चोरीची सवय होती, परंतु मूल्यवर्धनातील 'खरे बोलण्याचे बक्षीस', 'नियमपालन', 'आदर्श समाजसेवक-बाबा आमटे', 'दुसऱ्याच्या बाजूने विचार करूया' इत्यादी उपक्रमांमुळे त्यांच्या वर्तनात बदल होऊन त्याच्यात सुधारणा झाली आहे, असा अनुभव श्रीमती उपलंचीवार या शिक्षिकेने सांगितला.** प्रामाणिकपणा, खरे बोलणे, इतरांना त्रास होईल असे न वागणे या मूल्यवर्धन कार्यक्रमात रुजवल्या जाणाऱ्या मूल्यांचा उपयोग मुलांना चांगले नागरिक घडवण्यात पूरक ठरत आहे, हेच यातून दिसते. येथील जि.प. शाळेचे शिक्षक श्री. मोरे यांनीही मूल्यवर्धनमुळे स्वत:मध्ये बदल घडला, असे सांगितले.

### २. गोंदिया

गोंदिया जिल्ह्यातील मोहगाव (तिल्ली) केंद्रातील १० शाळांमध्ये मूल्यवर्धन सुरु आहे. हा अतिशय दुर्गम भाग असल्याने अशिक्षित पालकांची संख्या जास्त आहे. या केंद्रातील जि.प.प्रा.शाळा मोहगाव (तिल्ली) येथे दि. २२ डिसेंबर २०१६ रोजी भेट देण्यात आली. याकार्यक्रमासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सी. एल. पुलकुंडवार व जिल्हा शिक्षणाधिकारी श्री. यू. के. नरड हे स्वतः गोंदियाहून मोहगाव (तिल्ली) या छोट्या गावात कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी आले होते.

विशेष म्हणजे **तिसरीच्या विद्यार्थ्यांशी चर्चा करण्यासाठी आम्ही वर्गात जाताना आमचे बूट पायात ठेवूनच गेलो होतो. हे विद्यार्थ्यांच्या लक्षात आल्यावर मुलांनी आम्हाला 'बूट बाहेर काढून आले पाहिजे', असे स्पष्टपणे सांगितले. याचे आम्हांला खूप आश्चर्य वाटले. मूल्यवर्धन उपक्रमामध्ये मुलांनीच स्वतः आपल्या वर्गाचे वर्गनियम तयार करण्याचा व ते पाळण्याचा उपक्रम देण्यात आला आहे. मूल्यवर्धनच्या सर्व शाळांमध्ये हा उपक्रम अतिशय चांगल्या पद्धतीने राबविला जात आहे. मुलेच हे नियम तयार करतात व त्याचे पालनही करतात. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेबांनी याबद्दल विचारले असता मुलांनी उत्तर दिले की,आमच्या वर्गाचे नियम आम्ही तयार केले आहेत. त्यामध्ये एक नियम 'आपले बूट व चप्पल बाहेर काढून येणे' हा आहे. आम्ही सर्वजण वर्गनियम पाळतो, आमच्या वर्गात तुम्ही आलात म्हणून तो नियम आपणही पाळला पाहिजे. यातून स्वतंत्रपणे विचार करून आपण स्वतः आखलेल्या शिस्तीच्या नियमांचे जबाबदारीने पालन करणे, हे मूल्य विद्यार्थ्यांमध्ये दिसले.** त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी साहेबांनी मुलांना वेगवेगळे प्रश्न विचारले. मुलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, आत्मविश्वास आणि स्पष्ट बोलणे, आपल्या वर्गाचे नियम सर्वांनी पाळण्याची अपेक्षा ठेवणे, आदी चांगले बदल घडत आहेत, हे त्यांच्या लक्षात आले व त्यांना मूल्यवर्धनबाबत आत्मियता निर्माण झाली. हा मूल्यवर्धन कार्यक्रम संपूर्ण जिल्ह्यात राबवू असे त्यांनी सभेमध्ये जाहीर केले. एवढेच नव्हे, तर मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा शिक्षणाधिकारी यांनी रात्री ११.०० वाजता आमची भेट घेऊन व मूल्यवर्धन सीडीद्वारे कार्यक्रमाची माहिती घेतली. हा मूल्यवर्धन कार्यक्रम संपूर्ण जिल्ह्यात राबविणे जरुरीचे आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

## ३. गडचिरोली

गडचिरोली हा महाराष्ट्रातील अतिशय संवेदनशील व आदिवासीबहुल जिल्हा आहे. या जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यामध्ये तळोधी केंद्रात १८ शाळांमध्ये मूल्यवर्धन कार्यक्रम सुरु आहे. पुणे जिल्ह्यात ज्यावेळी मा. शिक्षणमंत्री महोदयांनी आढावा बैठक बोलाविली होती, त्या बैठकीला गडचिरोलीचे केंद्रप्रमुख श्री. गौतम मेश्राम उपस्थित होते. या बैठकीत त्यांनी मूल्यवर्धनची माहिती सांगत असताना सांगितले, ''गडचिरोली जिल्ह्यातील तळोधी केंद्रामध्ये मूल्यवर्धनमुळे बदल होताना दिसत आहेत व इतके बदल होत आहेत की इयत्ता पहिली, दुसरीची मुले घरी आईवडिलांना शौचालय बांधण्यासाठी आग्रह करीत आहेत. ही समज त्यांच्यामध्ये मूल्यवर्धनमुळे आली आहे''.

या केंद्रातील तळोधी, हिवरगाव व खोर्दा या तीन शाळांना मी भेटी दिल्या. त्यावेळी केंद्रप्रमुख श्री. मेश्राम यांच्याशी बोलून इयत्ता पहिलीची मुले पालकांना शौचालय बांधण्याचा आग्रह करतात याबद्दल माहिती घेतली. मूल्यवर्धन उपक्रमांमध्ये राबवल्या जाणाऱ्या कृतींद्वारे विद्यार्थ्यांमध्ये आपल्या राज्यघटनेशी सुसंगत मूल्ये रुजविण्याचा प्रयत्न केला जातो. यामध्ये एक मूल्य आहे; स्वत:च्या जबाबदारीची जाणीव असणे आणि जबाबदारीने निर्णय घेणे. यामध्ये एक मुद्दा आहे तो असा की, स्वच्छ आणि निरोगी राहण्यासाठी दैनंदिन सवयी पाळणे. याच मुद्द्याला धरून विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांकडे शौचालय बांधण्याचा आग्रह धरला होता. मेश्राम यांनी या विद्यार्थ्यांची व माझी भेट घडवून आणली, त्यावेळी मला खऱ्या अर्थाने समाधान वाटले. या जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये मूल्यवर्धन कार्यक्रम चांगल्यारितीने चालला असून विद्यार्थ्यांमध्ये व शिक्षकांमध्ये होत असणारे बदल सर्वांच्याच बोलण्यावरून जाणवत होते.

## ४. नांदेड

१) नांदेड जिल्ह्यातील चौफाळा केंद्रात १४ शाळांमध्ये मूल्यवर्धन सुरु आहे. या केंद्रातील जि.प.प्रा.शाळा, बोंढार येथे दि. ३० डिसेंबर २०१६ रोजी भेट दिली. त्या दिवशी या जिल्ह्यातील माळेगावची जत्रा होती. या जत्रेला महाराष्ट्र शासनाच्या वतीने सर्व अधिकारी व राजकीय क्षेत्रातील व्यक्ती उपस्थित असतात. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अशोक शिंगारे व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पद्माकर केंद्रे हे दोघेही या यात्रेला जाणार होते. परंतु माळेगावला जाताजाता ५-१० मिनिटे मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या आढावा बैठकीला धावती भेट देण्यासाठी ते आले आणि आश्चर्य म्हणजे तब्बल अडीच तास या कार्यक्रमासाठी थांबले. त्यांनी नांदेड जिल्ह्यात मूल्यवर्धन कशाप्रकारे सुरु आहे, हे समजावून घेतले व कार्यक्रमाला उपस्थित राहिल्याचे समाधान मला आज लाभले असे उदगार नांदेड जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अशोक शिंगारे यांनी या प्रसंगी काढले. संपूर्ण नांदेड जिल्ह्यात हा उपक्रम राबविणे आवश्यक असून त्यासाठी १०० मूल्यवर्धन साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स) उपलब्ध करून देण्याची तयारी त्यांनी दर्शविली. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी पद्माकर केंद्रे यावेळी म्हणाले, **''शांतिलाल मुथ्था फाउंडेशन ही एक केवळ प्रयोगशाळा नसून संस्काराचे विद्यापीठ आहे.''** निवृत्तीनंतरही या क्षेत्रात कार्य करत राहण्याचा आपला संकल्प असल्याचे यावेळी त्यांनी बोलून दाखविले.

२) या जिल्ह्यात उर्दू शाळांची संख्या जास्त आहे. ज्या उर्दू माध्यमाच्या शिक्षकांनी मराठीत शिक्षण घेतले आहे, त्यांनी मूल्यवर्धन उपक्रमांचे उर्दूमध्ये भाषांतर करून स्वतः उर्दू शाळेतील मुलांकडून उपक्रम करून घेतले. हे सर्व पाहून मूल्यवर्धन उर्दू भाषेत असण्याची गरज नांदेड येथील शिक्षक श्री.अब्दुल कादीर यांनी लक्षात घेतली आणि मूल्यवर्धन उपक्रम पुस्तिका व मार्गदर्शक पुस्तिकांचे उर्दूमध्ये भाषांतर केले. श्री. कादीर यांनी केलेल्या या कार्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शिंगारे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. श्री. कादिर यांनी केलेले उर्दूचे भाषांतर पाहून त्यांना पुणे येथे आमंत्रित करून संपूर्ण मूल्यवर्धन उपक्रमातील प्रत्येक इयत्तेसाठीची विद्यार्थी उपक्रम पुस्तिका व शिक्षक संदर्भ पुस्तिका या सर्वांचे उर्दू भाषांतर त्यांचेकडून करवून घेऊन ते विद्या प्राधिकरणाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविण्यात आले आहे. म्हणजेच आता संपूर्ण महाराष्ट्रातील उर्दू माध्यमाच्या शाळांसाठी मूल्यवर्धन कार्यक्रम सज्ज होत आहे.

३) विद्या प्राधिकरणाच्या कार्यालयामार्फत मूल्यवर्धन शिक्षकांना मूल्यवर्धन उपक्रम तयार करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने इयत्ता चौथी व पाचवीचे उपक्रम तयार करण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये नांदेड जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षिका सौ. नुसरत यांनी जो उपक्रम तयार केला होता त्याला संपूर्ण महाराष्ट्रामध्ये तिसरा क्रमांक मिळाला. यावरून असे दिसून येते की, **जिल्हा परिषदेचे शिक्षक हे फक्त मूल्यवर्धन चे उपक्रम वर्गात घेतात असे नाही, तर त्याच्याही पुढे जाऊन नवीन उपक्रम तयार करण्याचे काम करतात** हे सिध्द झाले.

## ५. उस्मानाबाद

उस्मानाबाद जिल्ह्यातील निपाणी केंद्रात १० शाळांमध्ये मूल्यवर्धन कार्यक्रम सुरु आहे. या केंद्रातील जि.प.प्रा.शाळा, पखरुड येथे मूल्यवर्धन आढावा बैठकीचे आयोजन दि.१० जानेवारी २०१७ रोजी करण्यात आले होते. या ठिकाणी संतोष गोसावी या पालकाने, त्यांचे तंबाखूचे व्यसन त्यांचा इयत्ता तिसरीत शिकणारा मुलगा आर्यनने सोडविल्याची माहिती स्टेजवर येऊन सांगितली. ''माझ्या मुलाने मला, तंबाखूचे व्यसन चांगले नाही व ते शरीराला अपायकारक असल्याचे सांगितले, त्याच वेळी मी तंबाखू न खाण्याचा निर्णय घेतला'', संतोष गोसावींनी सांगितले.

**आर्यनला स्टेजवर बोलाविले असता त्याने ''मूल्यवर्धन कार्यक्रमातल्या 'माझ्यातील गुण आणि कौशल्ये', 'माझे ध्येय', 'दुसऱ्याच्या बाजूने विचार करूया' या उपक्रमांमधून जबाबदारीची जाणीव मनात निर्माण झाली. इतरांबद्दल आस्था, सक्रिय सहभाग या मूल्यवर्धनमधील मूल्ये व दृष्टिकोनामुळे वाईट सवयीपासून दूर का राहिले पाहिजे हे समजले. या शिकवणुकीमुळे वडिलांची तंबाखू आपण सोडवावी असे वाटू लागले आणि त्या दिशेने प्रयत्न करत राहिलो. वडिलांनीही माझ्या प्रयत्नांना प्रतिसाद दिला.''** अशारितीने आपण वडिलांचे तंबाखूचे व्यसन सोडविल्याचे आर्यनने सांगितले. मूल्यवर्धनच्या उपक्रमांमुळे मुलांमध्ये चांगले बदल दिसून येत आहेत व मुले पालकांशी मनमोकळेपणे बोलायला लागली आहेत, हे वर सांगितलेल्या प्रसंगावरून लक्षात येते.

## ६. अमरावती

अमरावती जिल्ह्यातील भातकुली तालुक्यामध्ये आसरा केंद्रात १० शाळांमध्ये मूल्यवर्धन सुरु आहे. दि. १६ नोव्हेंबर २०१६ रोजी या केंद्रातील जि.प.प्रा.शाळा,आसरा येथे मूल्यवर्धन आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत केंद्रप्रमुख सौ. स्मृती बाबरेकर यांनी स्वतःमध्ये मूल्यवर्धनचे प्रशिक्षण घेतल्यावर खूप बदल झाल्याचे सांगितले. त्याची अनेक उदाहरणे देत त्यांनी मोकळेपणाने स्वतःच्या वागण्यामध्ये फरक पडल्याची कबुली दिली. या केंद्रातील जसापूर जि.प.शाळेतील शिक्षक ए. एस. जंगले आणि नांदेड (खुर्द) येथील जि.प. शाळेचे शिक्षक प्रकाश देशमुख यांनीसुद्धा सौ. स्मृती बाबरेकर यांच्या स्वभावात किती फरक पडला याची उदाहरणे दिली. एखाद्या व्यक्तीमध्ये झालेला बदल त्याच्या वागणुकीतून इतरांच्या निदर्शनास येणे म्हणजे निश्चितपणे बदल झाल्याची खात्री पटते.

## ७. अकोला

१) अकोला जिल्ह्यातल्या शिवर केंद्रात मंगळवार दि. २१ फेब्रुवारी, २०१७ रोजी मूल्यवर्धन कार्यक्रम आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

**एका मुलाचे (नाव मुद्दाम दिलेले नाही.) वडील वारल्यानंतर तो आईला उद्धट बोलायचा, मारायचा, सर्वांच्या खोड्या काढायचा. घरी व शाळेत सर्वच ठिकाणी त्याचे वर्तन अतिशय उद्धट होते. त्याच्या खोड्यांनी इतर विद्यार्थी हैराण झाले होते. शिक्षिकाही हा मुलगा काहीही करू शकेल म्हणून घाबरत होत्या. मूल्यवर्धन, कार्यक्रमातील 'दुसऱ्याच्या बाजूने विचार करूया', 'शांति आणि आपण', 'काय होतं बरं रागावल्यानंतर?' इत्यादी उपक्रमांमुळे त्याच्यात हळूहळू बदल झाला. मोठ्यांबद्दल आदर, आस्था, सहकार्य,जबाबदारीची जाणीव ही मूल्ये त्याच्या मनात रुजायला मूल्यवर्धन उपक्रम उपयोगी पडले. एक वर्षभरात त्याची वागणूक सुधारली. आता त्याचे मारणे, उद्धट बोलणे व इतरांना त्रास देणे हे पूर्णपणे बंद झाले आहे. उलटपक्षी आता त्याची वर्तणूक सकारात्मक झाली आहे.** सध्या तो शाळेच्या उद्यानाची देखभाल करतो, झाडे लावतो व वाढवतो. आश्चर्य म्हणजे त्याने या कामात जो रस दाखवला त्यामुळे शिक्षकांनी त्याला शाळेचे पर्यावरणमंत्रीपद दिले आहे आणि या कामात तो आनंदाने वेळ घालवतो. शिवाय वेळच्यावेळी अभ्यास करणे, घरकामात आईला मदत करणे यातही तो लक्ष घालतो. जरी मूल्यवर्धन कार्यक्रम सध्या १ ली ते ४ थी सुरु असला तरी मूल्यवर्धनचा चांगला प्रभाव शाळेतील सर्व विद्यार्थी व शिक्षक यांच्यावर पडत आहे असे मुख्याध्यापकांचे म्हणणे आहे.

कार्यक्रमाच्या वेळी जिल्हाधिकारी (भाप्रसे) जी. श्रीकांत व मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण पुंडलिकराव विधळे यांच्यासमोर एका शिक्षिकेने या मुलास व्यासपीठावर आणले. त्यामध्ये झालेल्या बदलाचे विश्लेषण सभेमध्ये केले व त्याचे कौतुकही केले. विशेष म्हणजे याच विद्यार्थ्याला यावर्षीचा 'आदर्श विद्यार्थी पुरस्कार' मिळाला आहे, असेही सांगण्यात आले. मा. जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते या मुलाचा सत्कार करण्यात आला.

२) मूल्यवर्धनच्या 'समग्र शाळा दृष्टिकोन' टप्प्याअंतर्गत अकोल्याचे जिल्हाधिकारी जी.श्रीकांत यांच्या शासकीय निवासस्थानी एकदिवसीय क्षेत्रभेटीचे आयोजन ५ मार्च २०१७ रोजी करण्यात आले होते. यावेळी जि.प. उच्च प्राथमिक शाळा, कुंभारीच्या निवडक ५५ विद्यार्थी आणि ८ शिक्षक–शिक्षिकांनी भाग घेतला होता. 'जबाबदार अधिकारी' होऊन देशसेवा करण्याचा संकल्प या विद्यार्थ्यांनी यावेळी केला. मूल्यवर्धनच्या 'मित्र मिळवा' या नाविन्यपूर्ण खेळाच्या माध्यमातून गटरचना करून विद्यार्थ्यांनी, ' मी जिल्हाधिकारी झालो तर!' या विषयावर गटचर्चा करून उत्कृष्ट सादरीकरण केले.

या कार्यक्रमाला जिल्हाधिकाऱ्यांच्या सुविद्य पत्नी सोनल श्रीकांत, गुणवत्ता विकास कार्यक्रमाचे जिल्हा समन्वयक प्रकाश अंधारे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

मुख्याध्यापक रघुनाथ म्हैसने, मास्टर ट्रेनर श्रीकृष्ण डांबलकर आणि शाळेतील इतर सर्व शिक्षकांच्या प्रयत्नांमुळे हा क्षेत्रभेट कार्यक्रम यशस्वी झाला.

## ८. बुलढाणा

**बुलडाण्यात मोताळा तालुक्यातील शेलापूर केंद्रातील तळणी येथील जि. प. मराठी प्राथमिक शाळेजवळच्या सभागृहात मूल्यवर्धन कार्यक्रम आढावा बैठक सोमवार दि. २० फेब्रुवारी, २०१७ रोजी झाली. येथे झालेल्या मूल्यवर्धनच्या आढावा बैठकीत, गेल्यावर्षी इयत्ता चौथीत असलेल्या आणि आता पाचव्या इयत्तेत शिकणाऱ्या शेख नावेद शेख सिकंदर या मुलाच्या प्रामाणिकपणाबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला. शेख नावेदला रस्त्याने जाताना २४ हजार रुपये रोख असलेली पिशवी सापडली होती. त्याबद्दल त्याने वडिलांना सांगितले व ती पिशवी ज्याची त्याला परत केली.**

मूल्यवर्धन कार्यक्रम सध्या तिसऱ्या इयत्तेपर्यंतच घेतला जात असला तरी काही ठिकाणी शिक्षकांची किंवा विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्यास किंवा पुरेशा वर्गखोल्या नसल्यास दोन इयत्तांमधील मुलांना एकत्र बसवून शिकवले जात आहे. गेल्या वर्षी इयत्ता तिसरीपर्यंतच असलेल्या या उपक्रमांची चौथीतल्या नावेदला चांगलीच ओळख झालेली होती. नकळतपणे चौथीच्या मुलांवरही मूल्यवर्धनाचे संस्कार झाले होते. 'खरे बोलण्याचे बक्षीस', 'वागायचे कसे', 'आधी विचार मग आचार' इत्यादी उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान, जबाबदारीची जाणीव, प्रामाणिकपणा, स्वतःचे व समाजाचे हित ही मूल्ये रुजत आहेत. मूल्यवर्धन उपक्रमांमधल्या मूल्यांच्या शिकवणुकीमुळेच हे शक्य झाले, असे शेख नावेद शेख सिकंदरने यावेळी सांगितले.

## ९. नाशिक

१) नाशिक जिल्ह्यातील घोटी केंद्रात १३ शाळांमध्ये मूल्यवर्धन सुरु आहे. या केंद्रातील जि.प.प्रा.शाळा,घोटी, मुली नं.१ येथे मूल्यवर्धन आढावा बैठकीचे आयोजन दि. ४ जानेवारी २०१७ रोजी करण्यात आले होते. या बैठकीमध्ये उर्दू शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.सय्यद शहजाद यांनी या कार्यक्रमातील **'असे वागले तर', 'चांगली मुले', 'वागायचं कसं', 'दाखवू आदर', 'आनंदाचे मोजमाप', 'चांगल्या वाईट सवयी', 'कोणाला काय वाटेल?', 'माझ्यातील गुण आणि कौशल्ये', 'मित्राचे गुण', 'दुसऱ्याच्या बाजूने विचार करूया', 'आदर्श समाजसेवक – बाबा आमटे' इत्यादी उपक्रमांमुळे मुले खूप आनंदी व उत्साही झाली असून ती प्रत्येक गोष्टीवर विचार करू लागली आहेत व इतरांना मदतही करू लागली आहेत** असे सांगितले. गाव छोटे असल्यामुळे त्याचा संपूर्ण गावात परिणाम झाल्याचे दिसून येते. त्यामुळे उर्दू शाळेतील मुलांची पटसंख्या व उपस्थिती वाढण्यास मूल्यवर्धन उपक्रमांमुळेच मदत झाल्याचे सांगितले.

२) या बैठकीत घोटी गावातील गजानन काकडे या पालकांनी आपली मुलगी दीक्षा हिला इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून काढून जिल्हा परिषदेच्या शाळेत दाखल केल्याची माहिती दिली. दीक्षा ही पूर्वी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत इयत्ता चौथीत शिकत होती. परंतु ब्रेन टयूमरमुळे तिला अंशतः अंधत्व आले. ती अभ्यासात मागे पडू नये म्हणून ऑपरेशन झाल्यानंतर नुकताच तिने जि.प.प्रा. शाळा, घोटी, मुलीनं.१ ह्या मराठी शाळेत इयत्ता तिसरीत प्रवेश घेतला व मूल्यवर्धन उपक्रमामध्ये खूप चांगला सहभाग घेऊ लागली. जे जे उपक्रम शाळेत घेतले जातात, ते प्रत्येक उपक्रम ती घरी आल्यावर आम्हाला सांगते. मूल्यवर्धनमुळे तिला शाळेत येण्याची आवड निर्माण झाली असून, ती नियमित शाळेत येते, तिचे वडील गजानन काकडे यांनी शाळेत येऊन मूल्यवर्धन काय आहे याची माहिती घेतली. यातील 'माझ्यातील गुण आणि कौशल्ये', 'नियमपालन', 'शेजारी–शेजारी', 'मित्राचे गुण', 'दुसऱ्याच्या बाजूने विचार करूया', 'आदर्श समाजसेवक – बाबा आमटे' इत्यादी उपक्रमांमुळे तिच्यात झालेल्या बदलांबद्दल त्यांनी आढावा बैठकीत बोलताना समाधान व्यक्त केले. त्यावेळी त्यांनी सांगितले, ''माझी

मुलगी दीक्षा ही इयत्ता चौथीमध्ये इंग्रजी शाळेत शिकत होती, तिचे मेंदूचे ऑपरेशन झाले होते. मूल्यवर्धनमध्ये भरपूर खेळ असतात, मुलं एकमेकांना मदत करतात, हे ऐकून मी माझ्या मुलीला मराठी शाळेत दाखल केले. माझी मुलगी या शाळेमध्ये शिक्षण घेऊ शकेल व सर्व विद्यार्थी तिला सावरून घेतील, या हेतूने मी हे पाऊल उचलले.''

३) उर्दू शाळेतील शिक्षक मराठीमध्ये मूल्यवर्धनचे प्रशिक्षण घेऊन ते उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांकडून मूल्यवर्धन उपक्रम चांगल्याप्रकारे करवून घेत आहेत व त्याचे चांगले परिणाम व अनुभव स्पष्टपणाने मांडत आहेत.

## १०. नंदुरबार

१) नंदुरबार जिल्ह्यातील पिंपळोद केंद्रातील ११ शाळांमध्ये मूल्यवर्धन चालू आहे. या केंद्रातील जि.प.प्रा.शाळा घोड्यावद (शिवपूर) येथे मूल्यवर्धन आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. येथील केंद्रप्रमुख सौ.ललिता भामरे यांना त्यांच्या केंद्रातील शिक्षक व मुख्याध्यापकांना निमंत्रित करण्यास सांगण्यात आले होते. तथापि केंद्राप्रमुखानी या ठिकाणी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करून केंद्रातील सर्व विद्यार्थ्यांनाच या कार्यक्रमासाठी निमंत्रित केले. तसेच विद्यार्थी करीत असलेल्या कार्याची एक प्रदर्शनीच भरविण्यात आली होती. या कार्यक्रमाला बाल मेळाव्याचे स्वरूप देण्यात आले व सुंदर नियोजन केले होते. आजूबाजूच्या इतर केंद्रातून शिक्षक, विद्यार्थी व केंद्रप्रमुख या ठिकाणी आले होते. या बैठकीला नंदुरबारचे जिल्हाधिकारी श्री.मल्लिनाथ कलशेट्टी, जिल्हा शिक्षणाधिकारी श्री. अरुण पाटील, उपशिक्षणाधिकारी श्री. राहूल चौधरी, गटशिक्षणाधिकारी श्री.सी.के.पाटील उपस्थित होते.

२) या केंद्रातील ढाकणपाडा शाळेतील इयत्ता दुसरीतील मतिमंद मुलगी(नाव मुद्दाम दिलेले नाही.) शाळेत येत नव्हती. तिला सांभाळण्यासाठी रोज घरातल्या एका व्यक्तीला घरी थांबावे लागत असे. हातावर पोट असल्याने रोजगार बुडत असे. शिक्षक, शेजारी राहणारे विद्यार्थी आदींनी, तिने शाळेत यावे म्हणून रोजच प्रयत्न करणे सुरु केले. सुरुवातीला नाईलाजाने ती शाळेत येऊ लागली. वर्गातल्या मुलामुलींनी तिला खूप सांभाळून घेतले. खाताना स्वच्छता राहावी, तोंडातून इतर वेळेला लाळ गळते ती पुसावी, अशा आणि इतर गोष्टींचे भान तिला नव्हते. परंतु वर्गातल्या विद्यार्थ्यांनी तिच्या स्वच्छतेकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. त्याबाबत तिला ही मुले मदत करू लागली. त्यांनी शाळेच्या ड्रेसला खांद्याखाली सेफ्टीपिनेच्या सहाय्याने रुमाल अडकवून द्यायला सुरुवात केली. लाळ गळली, शिंक आली तर त्या रुमालाने तोंड पुसण्यास तिला या मुलांनी शिकवले. मुलांचे हे प्रेमाने सांभाळणे आणि शिक्षकांनीही वर्गाला व त्या मुलीला आत्मीयतेने शिकवणे यामुळे या मुलीमध्ये चांगले बदल दिसू लागले. आता ती न चुकता शाळेत जाते. वर्गमित्र–मैत्रिणींच्यात, शाळेत रमते. अभ्यास आणि मूल्यवर्धन उपक्रमात सहभागी होते. तिचे हे नियमित शाळेत येणे म्हणजे वर्गशिक्षकांचे प्रयत्न आणि वर्गातील व शेजार–पाजारच्या शालेय विद्यार्थ्यांमध्ये घडलेले बदल आणि त्यामुळे या मुलीला झालेला फायदाच दाखवतात. मूल्यवर्धनमुळे शिक्षक स्वतः आपल्यात बदल झाल्याचे मान्य करतात. त्यामुळे शिक्षक–विद्यार्थ्यांमध्ये मित्रत्वाचे संबंध निर्माण झाले आहेत.'चांगल्या वाईट सवयी', 'माझ्या वस्तूंची जपणूक', 'कोणाची मदत घेऊ शकू', 'नियमपालन' इत्यादी मूल्यवर्धन उपक्रमांमुळे इतरांबद्दल आस्था, जबाबदारी, सुसंवादी नातेसंबंध, इतरांच्या कल्याणासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे अशी मूल्ये विद्यार्थ्यांच्यावागणुकीतून जाणवू लागली आहेत. या विद्यार्थ्यांमध्ये फार चांगले बदल झाल्याचे शिक्षकही सांगतात. त्याचे हे प्रत्यक्ष उदाहरण म्हणता येईल. 'मूल्यवर्धन उपक्रमांमुळे ती नियमित शाळेत येऊ लागली. स्वतःची कामे स्वतः करु लागली. स्वतःची काळजी स्वतः घेऊ लागली. वर्गातल्या विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या मदतीने तिच्यात झालेला बदल तिच्या पालकांनाही जाणवला. आपल्या नातीत हा बदल कसा काय झाला, हे विचारण्यासाठी आजोबा शाळेत येऊन शिक्षकांना भेटले, तेव्हा मूल्यवर्धनमुळे हा बदल झाल्याचे शिक्षकांनी त्यांना सांगितले. त्यामुळे आम्ही बिनघोर कामावर जाऊ शकतो, असे या मुलीच्या आजोबांनी याबैठकीच्या वेळी सर्वांना सांगितले. हे ऐकून सर्वांनाच आनंद झाला.

## ११. सोलापूर

१) सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील वांगी१ या केंद्रामध्ये १५ शाळांमध्ये मूल्यवर्धन कार्यक्रम सुरु आहे. त्यापैकी जि.प.प्रा.शाळा,वांगी या ठिकाणी दि. २७ डिसेंबर २०१६ रोजी भेट देण्यात आली. या ठिकाणी आढावा बैठक झाल्यानंतर संपूर्ण गावजेवणाचे आयोजन करण्यात आले होते. वास्तविक पाहता मूल्यवर्धन आढावा बैठकीसाठी लेखी मार्गदर्शक सूचना सर्व मुख्याध्यापकांना दिल्या होत्या. त्यामध्ये शाळेत उपलब्ध असलेल्या मोठ्या वर्गामध्ये आढावा बैठक घ्यावी, सत्कारासाठी तसेच चहा–नाश्ता–भोजन यासाठी कोणताही खर्च करू नये,असे नमूद केले होते. तरीसुद्धा गावकऱ्यांनी कार्यक्रमासाठी

मोठा मांडव टाकला. सर्व ग्रामस्थांना निमंत्रण दिले व गावजेवण ठेवले होते. मी केंद्रप्रमुख श्री.राजन कुलकर्णी यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, हे सर्व नियोजन गावकऱ्यांनी केले आहे. मुलांमध्ये जे बदल होत आहेत तो मूल्यवर्धनचा प्रभाव असल्याचे पालकांचे मत आहे. त्यामुळे सर्व पालक समाधानी आहेत. त्यांच्या स्वतःच्या भावना प्रकट करण्यासाठी त्यांनी अशाप्रकारे मोठ्याप्रमाणावर कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

२) मूल्यवर्धन कार्यक्रम हा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २००५ वर आधारित आहे. त्यातील लोकशाहीधिष्ठित नागरिकत्व जोपासणारी मूल्ये आणि अभिवृत्तींचा पुरस्कार मूल्यवर्धन कार्यक्रमात केलेला आहे. त्यातील जबाबदारी, इतरांबाबत आस्था आणि सुसंवादी नातेसंबंध या विषयावर आधारित उपक्रम प्राथमिक शाळेतील पहिली ते तिसरीच्या वर्गांमध्ये घेतले जातात. त्यासंबंधी विद्यार्थ्यांशी बोलताबोलता मी मुलांना बोलते केले. 'सुसंवादी नातेसंबंध' हे मूल्य लक्षात घेऊन मी, मुलांना आई–वडिलांची घरातील भांडणे सोडविण्यासाठी कसे प्रयत्न करता? असा प्रश्न विचारला. इयत्ता तिसरीतील एक मुलगी (नाव मुद्दाम दिलेले नाही.) वर्गामध्ये सर्वांसमोर तिने घरातील आईवडिलांमधील भांडण कसे सोडविले हे सांगत असताना तिच्या डोळ्यात अश्रू आले. हे पाहून वर्गातील वातावरण भावनाविवश झाले होते. **मूल्यवर्धनमुळे मुलं घरात सहकार्य करतात, नातेसंबंध चांगले जोपासतात व त्याच्या पुढे जाऊन भांडण मिटविण्यासाठी पुढाकारही घेतात.** एखाद्या ठिकाणी त्यांना यशही मिळते, हे त्यातील ज्वलंत उदाहरण आहे. बऱ्याच ठिकाणी विद्यार्थी असे प्रयत्न करतात असे दिसून आले आहे.

३) या वांगी १ केंद्रप्रमुख श्री. राजन कुलकर्णी हे प्रथम पुणे येथे मूल्यवर्धन प्रशिक्षणाला आले होते. त्यावेळी त्यांनी सांगितले, ''मूल्यवर्धनचे हे कार्य अतिशय मोलाचे आहे, त्यामुळे माझ्या निवृत्तीनंतरसुद्धा उर्वरित आयुष्य मूल्यवर्धन उपक्रमाला समर्पित करण्याची माझी इच्छा आहे.'' या केंद्रातील जि.प.प्रा.शाळा,वांगी या ठिकाणी भेट दिली असता त्यांनी या म्हणण्याचा पुनरुच्चार केला. सहा महिन्यापूर्वी बार्शी येथे त्यांच्या स्वतःच्या राहत्या गावामध्ये बदली झाली असतानासुद्धा, शाळेतील मुलांचे नुकसान होऊ नये म्हणून, ती बदली नाकारून त्यांनी वांगी येथेच केंद्रप्रमुखपदावर राहण्याचे ठरविले. यासाठी त्यांनी रोज मोटार सायकलवर दोन तास जाण्याच्या व दोन तास येण्याच्या प्रवासाचा कंटाळा केला नाही. असे उदाहरण क्वचितच सापडू शकेल.

## १२. ठाणे

१) ठाणे जिल्ह्यातील टेंभूर्ली केंद्रातील १३ शाळांमध्ये मूल्यवर्धन कार्यक्रम सुरु आहे. या केंद्रातील कातकरीवाडी व टेंभूर्ली या दोन शाळांना दि. ४ जानेवारी २०१७ रोजी भेट देण्यात आली. हा संपूर्ण आदिवासी भाग आहे. या दोनही शाळांमध्ये भिंती आतून बाहेरून मूल्यवर्धन कार्यक्रमाची माहिती व चित्रे यांनी रंगविल्या आहेत, याचे मला आश्चर्य वाटले. त्यामुळे मी केंद्रप्रमुख श्री. महेंद्र धीमते यांना विचारले असता, **मूल्यवर्धनमुळे मुले आनंदी झाली आहेत व त्यांच्या वर्तणुकीमध्ये बदल झाल्याची जाणीव पालकांना झाली आहे. त्यामुळे पालकांमध्ये मूल्यवर्धन कार्यक्रमाविषयी उत्साह वाटू लागला आहे व सर्व गावकऱ्यांनी आपल्या वर्गणीतून या शाळात भिंतीवर माहिती व चित्रे रंगविले असे त्यांनी सांगितले.** वास्तविक पाहता इतक्या दुर्गम आदिवासी भागात पालकांनी इतके जागरूक होऊन, कुणीही न सांगता या रंगकामाद्वारे मूल्यवर्धन कार्यक्रमाची दखल घेतली आहे. यावरून शिक्षक, पालक, सरकारी अधिकारी यांच्यामध्ये मूल्यवर्धनबद्दल खूप आस्था असल्याचे दिसत होते. केंद्रातील सर्व शाळा या मूल्यवर्धनच्या आदर्श (मॉडेल) शाळा बनाव्यात, असा त्यांचा यामागचा उद्देश असल्याचे समजले.

२) या केंद्रामध्ये सुरु असलेल्या मूल्यवर्धन कार्यक्रमाची ख्याती संपूर्ण तालुक्यात पसरली आहे. या केंद्राच्या आसपासच्या केंद्रातील शाळांचे शिक्षक या केंद्रांमध्ये येऊन मूल्यवर्धनची संपूर्ण पाहणी करतात. मूल्यवर्धन पुस्तकांच्या स्वखर्चाने झेरॉक्स प्रती काढतात. आपापल्या शाळेतील विद्यार्थ्यांना त्या वितरित करून स्वतः मूल्यवर्धनचा अभ्यास करून, त्यांच्या शाळेत प्रत्यक्षात उपक्रम घेत आहेत. इतकेच नव्हे तर, या जिल्ह्यात आदिवासी आश्रमशाळांची संख्या जास्त आहे. यापैकी सेनवे येथील आश्रमशाळेचे प्रमुख श्री. शरद पांढरे यांनी मूल्यवर्धन कार्यक्रम आढावा बैठकीला उपस्थित राहून मूल्यवर्धनची माहिती घेतली व त्यांच्या जिल्ह्यातील सर्व आश्रमशाळांमध्ये मूल्यवर्धन सुरु करण्याची विनंती केली.

आदिवासीबहुल भागामध्ये मूल्यवर्धनबद्दलचा इतका प्रचंड उत्साह पाहता, मूल्यवर्धन संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हा परिषद शाळांमध्ये लवकर पोहोचणे आवश्यक आहे, असे वाटते.

## १३. पालघर

१) पालघर जिल्ह्यातील वेवजी केंद्रातील ११ शाळांमध्ये मूल्यवर्धन चालू आहे. दि. ६ जानेवारी २०१७ रोजी या केंद्रातील नानापाडा शाळेत मूल्यवर्धन कार्यक्रम आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. हा संपूर्ण आदिवासी परिसर असल्यामुळे अशिक्षित पालकांचे प्रमाण जास्त आहे. या ठिकाणी कार्यक्रमासाठी केंद्रातील सर्व शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, पालक व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य उपस्थित होते. कार्यक्रम चालू असताना व चर्चा सुरु असताना एका शिक्षिकेने तिसरीतील एका विद्यार्थ्याला (नाव मुद्दाम दिलेले नाही.) व्यासपीठावर आणले व माईकवरून सर्वांना सांगितले, ''मूल्यवर्धनमुळे आपल्या सर्व शाळांमध्ये झालेले बदल दिसतच आहेत, विद्यार्थी खूप आनंदी व उत्साही असल्याचे जाणवत आहे. परंतु एक विशेष बाब सांगण्यासाठी मी उभी आहे.'' असे म्हणून त्यांनी एका विद्यार्थ्याची ओळख करून दिली. **हा विद्यार्थी शाळेमध्ये रोज मारामारी करत असे. घरी रोज आईला व इतरांना त्रास देत असे. आईकडे पैसे मागायचा, पैसे दिले नाहीत तर आईला मारायचा, चावायचा. शिवाय त्याचा शाळेतील विद्यार्थ्यांना खूप त्रास होत होता. या विद्यार्थ्याची वर्गातच नव्हेतर शाळेमध्ये मोठी दहशत होती. परंतु गेल्या वर्षभरामध्ये या ठिकाणी मूल्यवर्धनची अंमलबजावणी अतिशय चांगल्याप्रकारे सुरु आहे. मूल्यवर्धनच्या उपक्रमामध्ये 'माझ्यातील गुण व कौशल्य', 'माझे ध्येय', 'माझा दिनक्रम','आपल्याला राग कधी येतो', 'राग आल्यानंतर काय होते', 'खरे बोलण्याचे बक्षीस', 'शेजारी-शेजारी', 'दुसऱ्यांच्या बाजूने विचार करूया', 'जगातील मुले', 'भाकरीचा प्रवास', 'मला लोकशाही हवी आहे' इत्यादी उपक्रम इयत्ता तिसरीमध्ये घेण्यात आले आहेत. या उपक्रमामध्ये या विद्यार्थ्याने सक्रिय सहभाग घेतल्याने या मुलाच्या वर्तणुकीत बदल दिसून येत आहे. आता हा मुलगा रोज शाळेत येतो, इतरांना मारत नाही, भांडत नाही, आईकडे पैसे मागत नाही, तिला मारत व चावत नाही. इतर विद्यार्थ्यांशी आपुलकीने वागतो, सर्वांशी हसून-खेळून राहतो,** हे बदल सभेमध्ये सर्वांसमोर शिक्षिकेने ठेवले. या मुलाची आई या ठिकाणी उपस्थित होती. आम्ही तिला याविषयी बोलण्यास सांगितले तेव्हा तिने आदिवासी भाषेत या घटनेचा वृत्तांत सांगितला. त्याचा मराठीत अनुवाद करून या शिक्षिकेने आम्हांला सांगितला. या घटनेचे सर्वांना आश्चर्य वाटले व आनंदही झाला. मूल्यवर्धनमुळे असे सकारात्मक बदल एका वर्षात होऊ शकतात, हेच मुळात कौतुकास्पद आहे. या बदलाचे सातत्य राहणे हे महत्त्वाचे ठरणार आहे.

२) **इयत्ता तिसरीतील एक मतिमंद मुलगा (नाव मुद्दाम दिलेले नाही.) पूर्वी शाळेत न येता इकडे तिकडे फिरत असे, आईला घरातल्या कामांमध्ये कधीच मदत करत नसे. कुणाशी नीट बोलत नसे. आजूबाजूला माणसे असतील तर तो अवघडून जात असे. परंतु शेजारी मित्र आणि शिक्षकांच्या सांगण्यावरून शाळेत जायला त्याने सुरुवात केली. मूल्यवर्धनच्या उपक्रमांमधील 'माझा दिनक्रम','दुसऱ्यांच्या बाजूने विचार करूया', 'जबाबदारी','सुसंवादी नातेसंबंध', 'शांतता', 'सहकार्य, कामात मदत करणे' आणि 'दुसऱ्याच्या हक्काची जाणीव ठेवून वागणे', 'इतरांबद्दल आदर' आणि 'आस्था असणे' या घटकांच्या शिकवणुकीमुळेच तो आता शाळेत नियमित येऊ लागला आहे. घरामध्ये आईला पाणी आणण्यास, साफसफाई करण्यास मदत करतो. पूर्वी वर्गात कोणी आले तर लपून बसायचा, पण आता धीट झाला आहे. हे सर्व बदल मूल्यवर्धन घटकांच्या शिकवणुकीमुळेच या मुलामध्ये घडले असल्याचे त्याच्या पालकांनी आणि शिक्षकांनी सांगितले.**

३) इयत्ता दुसरीत शिकणारी एक मुलगी (नाव मुद्दाम दिलेले नाही.) नंदुरबार जिल्ह्यातून स्थलांतरित म्हणून आली असून शाळेत येत नव्हती. ती हट्टी होती, चिडचिड करायची, सुरुवातीला अबोल होती. आजूबाजूच्या मुलांमुळे तीही हळूहळू शाळेत जाऊ लागली. शाळेत मूल्यवर्धन उपक्रम सुरु झालेले होते. त्याची गोडी तिला लागली. त्यातील 'आनंदाचे मोजमाप', 'आधी विचार मग आचार', 'चांगल्या वाईट सवयी' या उपक्रमांमुळे तिच्या वागणुकीत फरक पडला आहे. या मूल्यांच्या शिकवणुकीमुळे शाळेत यायला ही मुलगी कंटाळा करत नाही. सांस्कृतिक कार्यक्रमात स्वतःहून भाग घ्यायला लागली. चिडचिड करत नाही, ती आता बोलकी झाली आहे. सगळ्यांमध्ये मिळूनमिसळून वावरते, तसेच स्वतःची कामे स्वतः करते. तिच्यात झालेल्या बदलांची माहिती तिच्या शिक्षकांनीच दिली.

## १४. रत्नागिरी

रत्नागिरी जिल्ह्यातील पुनस केंद्रात १० शाळांमध्ये मूल्यवर्धन चालू आहे. या केंद्रातील जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळा कुर्णे (घडशीवाडी) नं. २ येथे मूल्यवर्धन आढावा बैठकीचे आयोजन दि. १९ जानेवारी २०१७ रोजी करण्यात आले होते. फक्त या

केंद्रातील शिक्षकच बैठकीला येणे अपेक्षित होते, परंतु मूल्यवर्धनचा प्रभाव संपूर्ण तालुक्यामध्ये असल्यामुळे व सर्व तालुका व जिल्हास्तरीय बैठकीमध्ये मूल्यवर्धनची चांगली चर्चा होत असल्यामुळे पुनस केंद्राच्या बाहेरून लांजा तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुखसुद्धा या बैठकीला आवर्जून हजर होते. मूल्यवर्धन उपक्रमांमुळे काय आणि कसे बदल होत आहेत असे कुणी विचारले तर येथील इयत्ता तिसरीच्या एका विद्यार्थ्यामध्ये घडलेल्या आमूलाग्र बदलाचे उदाहरण देता येईल.

लहान मुलांना बहुतेकदा, तू मोठेपणी कोण होणार, असा प्रश्न विचारला जात असतो. त्यांच्या कल्पनाशक्तीप्रमाणे किंवा बाह्य जगतात दिसणाऱ्या घटनांमधून आपल्याला काय व्हायला आवडेल हे मुले ठरवत असतात. बहुतेकांच्या मनात सुप्त इच्छा असते ती अधिकार गाजवण्याचीच! पण कोणत्या पद्धतीने अधिकार गाजवला तर समाजात मान मिळतो, याची जाणीव मुलांना असेलच असे नाही. मूल्यवर्धन कार्यक्रम सुरु होण्यापूर्वी **या शाळेतील एक मुलगा (नाव मुद्दाम दिलेले नाही.) इयत्ता दुसरीत असताना 'आपण मोठेपणी गुंड होणार', असे सर्वांना सांगत असे. गेल्या वर्षी या शाळेत मूल्यवर्धन कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यावेळी हा मुलगा तिसरीत गेलेला होता. शाळेच्या संदीप निखार्गे सरांनी मूल्यवर्धन उपक्रम घेण्यास सुरुवात केली. त्यातील 'माझ्यातील गुण आणि कौशल्ये', 'माझे ध्येय', 'माझा दिनक्रम', 'काय होतं बरं रागावल्यावर'?, 'खरे बोलण्याचे बक्षीस', 'दुसऱ्याच्या बाजूने विचार करूया', 'जगातील मुले', 'मला लोकशाही हवी आहे', 'आदर्श समाजसेवक– बाबा आमटे', 'शांती आणि आपण' या उपक्रमांमुळे वर्गातील सर्व विद्यार्थ्यांबरोबर या मुलालाही 'काय बरे काय वाईट', या गोष्टींची जाणीव होऊ लागली. गुंड होण्याचे स्वप्न बाजूला ठेवून तो आता सर्वांना, 'मी पोलीस होणार' असे सांगू लागला. मूल्यवर्धनमुळे बऱ्या–वाईटाची जाण मुलांमध्ये येऊ लागली आहे, याचे हे चांगले उदाहरण म्हणता येईल.** जबाबदारीची जाणीव, शांतता,सहकार्य आणि बंधुता यातून प्रतित होणारे सुसंवादी नातेसंबंध, आदी बदल मूल्यवर्धन मूल्यांमुळे मुलांमध्ये घडताना दिसत आहेत. या जिल्ह्यात तालुका पातळीवर बैठकांमध्ये मूल्यवर्धन संदर्भात चर्चा होत होत्या व या शाळा मूल्यवर्धन कार्यक्रम पाहण्यासाठी पुनस केंद्राला भेट देत होत्या. या ठिकाणी उपस्थित सर्व शिक्षकांनी मूल्यवर्धन प्रशिक्षण मिळावे अशी विनंती केली.

## क. मूल्यवर्धन कार्यक्रम : जिल्ह्यातील प्रसंगचित्रे

मूल्यवर्धन कार्यक्रमाची सद्य:स्थिती जाणण्याच्या हेतूने माझी संपूर्ण महाराष्ट्राची परिक्रमा घडली. प्रत्येक जिल्ह्यात मला अनेक रंजक, सकारात्मक आणि अनेकवेळा भावनेला हात घालणारे अनुभव आले. प्रत्येक जिल्ह्यामध्ये मला वेगळा अनुभव आला. नाविन्य आढळले. त्याचा धावता आढावा पुढे वाचायला मिळेल.

### १. नागपूर

**काटोल, जिल्हा नागपूर–मूल्यवर्धन शिक्षक प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा समारोप समारंभ : १७.११.२०१६**

मूल्यवर्धन कार्यक्रम दि.१ जानेवारी २०१६ पासून नागपूर जिल्ह्यातील काटोल केंद्रामध्ये सुरू झाला. त्या ठिकाणी श्री. राजीव धवड, श्री. दिलीप केने व श्री. राजू तिजारी यांनी प्रशिक्षण घेऊन मूल्यवर्धनची उत्कृष्टपणे अंमलबजावणी केली. तेथील आमदार मा. डॉ. आशिष देशमुख यांच्या आग्रहास्तव महाराष्ट्र शासन व शांतिलाल मुथ्था फाउंडेशन यांच्याकडे पाठपुरावा करून मूल्यवर्धन फक्त एका केंद्रात न घेता काटोल व नरखेड या दोन्ही तालुक्याच्या सर्व शाळांमध्ये सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर जानेवारी २०१६ पासून नोव्हेंबर २०१६ पर्यंत नऊ महिन्यांच्या कालावधीत मूल्यवर्धन आता २५ केंद्रात सुरु झाले. त्यानंतर दोन्ही तालुक्यांतील १२० शिक्षक प्रशिक्षकांची यादी तयार करण्यात आली. त्यांना दिनांक २१ ते २४ जुलै २०१६ रोजी मूल्यवर्धनचे प्रशिक्षण यशस्वीपणे देण्यात आले. या सर्व शिक्षकांनी स्वतःच्या शाळेत जाऊन तीन महिने इयत्ता पहिली, दुसरी व तिसरीच्या वर्गातमूल्यवर्धनचे उपक्रम घेतले. यातून आलेल्या अनुभवावरून व तीन महिन्यानंतर १४ ते १७ नोव्हेंबर या कालावधीत घेतलेल्या प्रशिक्षणाआधारे आपापल्या केंद्रामध्ये इतर शिक्षकांना प्रशिक्षण देणे अपेक्षित होते. या चार दिवसांच्या प्रशिक्षण शिबिराचा समारोप १७ नोव्हेंबर रोजी करण्यात आला. या कार्यक्रमासाठी आमदार मा. डॉ. आशिष देशमुख, श्री. शांतिलाल मुथ्था, शिक्षणाधिकारी, जिल्हा समन्वयक श्री. गोपाल घाडगे, श्री. सोमनाथ नवले, श्री. शैलेश नांदे, श्री. मनमोहन शिंदे व सर्व प्रशिक्षक उपस्थित होते. तसेच अनेक शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख यांनी मूल्यवर्धन कशा पद्धतीने चालू आहे व प्रशिक्षण कसे आहे याबद्दलचे अनुभव सर्वांसमोर सांगितले.

**श्री. शांतिलाल मुथ्था यांनी स्टेजवरून खाली उतरून, प्रत्येक शिक्षकाकडे जाऊन त्यांना त्यांचे अनुभव कथन करण्यास प्रोत्साहित केले. सर्व शिक्षकांनी स्वत:मध्ये व विद्यार्थ्यांमध्ये होत असलेले बदल सांगितले. पुस्तकी शिक्षण देण्याची जुनी पद्धती बदलून आता कृतींवर आधारित विद्यार्थ्यांचा सहभाग घेऊन जोडीचर्चा, गटचर्चा घडवून विद्यार्थ्यांना विचार व्यक्त करण्याची संधी मूल्यवर्धनमुळे मिळेल, अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या. एकंदरीत सर्वच घटकांचा खूपच चांगला प्रतिसाद दिसून आला.**

संपूर्ण महाराष्ट्रात मूल्यवर्धन कार्यक्रम प्रत्येक जिल्ह्याच्या एका केंद्रामध्ये सुरु असला तरी नागपूर जिल्ह्यात एक नवीन प्रयोग म्हणून नारखेड व काटोल या दोन तालुक्यांत एकाच वेळी मूल्यवर्धन कार्यक्रम सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानुसार शिक्षकांचे प्रशिक्षण करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. त्यामुळे हा कार्यक्रम कसा विस्तारला जाऊ शकेल याचा अंदाज आला. या कार्यपद्धती नुसार मूल्यवर्धन कार्यक्रम संपूर्ण महाराष्ट्रभर विस्तारित करता येऊ शकेल.

### २. वर्धा

जि. वर्धा, ता.वर्धा, केंद्र–झाडगाव

शाळेचे नाव – जि.प.प्रा.शाळा

गुरुवार, दि.१७ /११/२०१६, वेळ–स.१० वा.

केंद्रातील शाळा: १२ ;प्रशिक्षित शिक्षक : २८

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स) : १) मनीषा किनगावकर २) सुनिता धायडे ३) रविंद्र राठोड

**मूल्यवर्धन कार्यक्रमामुळे शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये गुणात्मक बदल**

वर्धा जिल्ह्यातील झाडगाव या केंद्रात १२ शाळांमध्ये मूल्यवर्धन कार्यक्रम चालू आहे. या जिल्ह्यांमध्ये चार शिक्षक प्रशिक्षक आहेत. येथील केंद्रप्रमुख श्री. भीमराव भोयर यांनी त्या केंद्रातील सर्व शिक्षक व मुख्याध्यापक यांची एकत्रित बैठक पंचायत समिती

कार्यालय वर्धा येथे आयोजित केली होती. या बैठकीत शिक्षक प्रशिक्षक, मूल्यवर्धन शिक्षक व त्या केंद्रातील सर्व शिक्षक उपस्थित होते. तसेच उपशिक्षणाधिकारी श्री. भाऊ कांबे, गट शिक्षणाधिकारी श्री. अशोक कोळपे, केंद्रप्रमुख श्री. रविंद्र राठोड, शांतिलाल मुथ्था फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्री.शांतिलाल मुथ्था, श्री. सुदर्शन जैन, श्री. अमर गांधी, श्री. योगेंद्र फत्तेपुरिया व श्री. अनिल फरसोले या प्रसंगी उपस्थित होते. सर्वप्रथम केंद्रप्रमुखांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत करून मूल्यवर्धन कार्यक्रमाची पार्श्वभूमी सांगितली. त्यानंतर श्री. शांतिलाल मुथ्था यांनी मूल्यवर्धनची भूमिका सर्वांना सविस्तर समजावून सांगितली. सर्व शिक्षक प्रशिक्षकांनी आपले अनुभव सांगितले. त्यानंतर सर्व उपस्थित मूल्यवर्धनच्या शिक्षकांनी स्वतःचे मूल्यवर्धन संदर्भातील अनुभव व्यक्त केले. एकंदरीत मूल्यवर्धनमुळे विद्यार्थ्यांबरोबरच स्वतः शिक्षकांमध्येही बदल दिसून येत आहेत, असे सर्व शिक्षकांनी सांगितले. बऱ्याच शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या नावासह त्यांच्यात झालेल्या बदलांची सर्वांना माहिती दिली.

या बैठकीतील सर्व बाबी लक्षात घेता, वर्धा जिल्ह्यात शिक्षक प्रशिक्षक हे मूल्यवर्धनबद्दल खूप उत्साही असल्याचे मत श्री. शांतिलाल मुथ्था यांनी मांडले. त्यांनी खूप चांगले काम केले आहे व केंद्रातील इतरांना चांगले प्रशिक्षण दिले आहे. त्यांच्याकडून प्रशिक्षण घेऊन वर्गात उपक्रम घेणाऱ्या सर्व शिक्षकांनी समाधान व्यक्त केले आहे, ही अतिशय आनंददायी बाब आहे, असे सांगून मुथ्था यांनी सर्वांचे आभार मानले.

**वर्धा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा शिक्षणाधिकारी बैठक : १७.११.२०१६**

वर्धा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मा. नयना गुंडे, जिल्हा शिक्षणाधिकारी श्री. कृष्णा शेंडे, उपशिक्षणाधिकारी श्री. भाऊ कांबे, गट शिक्षणाधिकारी श्री. अशोक कोडापे, केंद्रप्रमुख श्री. रविंद्र राठोड,शांतिलाल मुथ्था फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्री. शांतिलाल मुथ्था, श्री. सुदर्शन जैन, श्री. अमर गांधी, श्री. योगेंद्र फत्तेपुरिया व श्री. अनिल फरसोले यांची संयुक्त बैठक झाली. या बैठकीत श्री. शांतिलाल मुथ्था यांनी मूल्यवर्धन कार्यक्रमासंदर्भातील माहिती तसेच वर्धा तालुक्यातील झाडगाव केंद्रामध्ये गेल्या वर्षीपासून चालू असलेल्या मूल्यवर्धन कार्यक्रमाची सविस्तर माहिती दिली. झाडगावचे केंद्रप्रमुख श्री. रविंद्र राठोड यांनी मूल्यवर्धन कार्यक्रम कसा चालू आहे, केंद्रातील शिक्षकांनी तो कसा स्वीकारला आहे व त्यामुळे कोणते बदल होत आहेत याची माहिती दिली. मूल्यवर्धन कार्यक्रम वर्धा जिल्ह्यात कशा पद्धतीने विस्तारता येईल यावर साधक–बाधक चर्चा झाली. पूर्ण जिल्ह्यात मूल्यवर्धन कार्यक्रम घेऊन जाण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

## ३. चंद्रपूर

जि.चंद्रपूर , ता.बल्लारपूर , केंद्र– कोठारी

शाळेचे नाव –जि. प. उच्च माध्यमिक शाळा,मानोरा

बुधवार, दि. २२ फेब्रुवारी २०१७, वेळ–स.९.३०वा.

केंद्रातील शाळा : १०, प्रशिक्षित शिक्षक :२८

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स): १) रामदास गव्हारे २) रवींद्र वनकर ३) सबतकौर भौंड

**'भारतीय राज्यघटनेतील मूल्ये ही मूल्यवर्धन उपक्रमांचा आधार'**

**– उपशिक्षणाधिकारी श्री.किशोर काळे**

चंद्रपूर जिल्ह्यातील मूल्यवर्धन कार्यक्रमाचा आढावा घेण्याकरिता बुधवार दि. २२ फेब्रुवारी २०१७ रोजी सकाळी ९:३० वा मूल्यवर्धन कार्यक्रम आढावा बैठक चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर तालुक्यातील कोठारी केंद्रातील मानोरा जि.प. उच्च माध्यमिक शाळेत पार पडली. यावेळेस मूल्यवर्धन हा कार्यक्रम वयानुरूप असून भारतीय राज्यघटनेतील मूल्ये याचा आधार आहे. याचा उपयोग शालेय़ विद्यार्थी हे,भविष्यात लोकशाहीचे जबाबदार, संवेदनशील आणि कर्तबगार नागरिक घडण्याकरिता होईल असे उपशिक्षणाधिकारी श्री. काळे म्हणाले.या वेळेस केंद्रप्रमुख श्रीमती सबतकौर भौंड यांनी उपक्रमातील प्रत्येक कृती ही फलनिष्पत्तीशी जोडली गेली आहे , तसेच या उपक्रमामुळे जिल्हा परिषदेच्या शाळांची गुणवत्ता वाढण्यास मदत होत आहे, असे सांगितले.

शांतिलाल मुथ्था यांनी मूल्यवर्धन कार्यक्रम हा उपक्रमांवर आधारित असून तो राबवण्यामागची भूमिका स्पष्ट केली.

या शाळेचे शिक्षक श्री.मोरे यांनी,'मूल्यवर्धनमुळे माझ्या स्वतःमध्ये बदल घडला', असे मत व्यक्त केले.

मुले स्वतः वर्गनियम तयार करतात, दुसऱ्यांचे ऐकून घेतात. तसेच इयत्ता तिसरीतील एका विद्यार्थ्यांला. (नाव मुद्दाम दिलेले नाही,)

चोरीची सवय होती, परंतु मूल्यवर्धनातील 'खरे बोलण्याचे बक्षीस','नियमपालन', 'आदर्श समाजसेवक–बाबा आमटे', 'दुसऱ्याच्या बाजूने विचार करूया' इत्यादी उपक्रमांमुळे त्याच्या वर्तनात बदल होऊन त्याच्यात सुधारणा झाली आहे, असा अनुभव श्रीमती उपलंचीवार या शिक्षिकेने सांगितला. या वेळेस उपशिक्षणाधिकारी किशोर काळे, गटशिक्षणाधिकारी चिंतामणी खेर, मुख्याध्यापक भारत फुलझेले कोठारी केंद्रातील शिक्षक, शाळा समिती सदस्य, पालक, ग्रामस्थ तसेच शांतिलाल मुथ्था फौंडेशनचे स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

## ४. गोंदिया

जि. गोंदिया, ता.गोरेगाव , केंद्र–मोहगाव (तिल्ली)

शाळेचे नाव – जि.प.प्रा.शाळा मोहगाव(तिल्ली)

गुरुवार दि.२२ /१२/२०१६ , वेळ– दु.४.३० वा.

केंद्रातील शाळा : १०, प्रशिक्षित शिक्षक : १९

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स) : १) अनिल मेश्राम २) हिवराज धापड ३) आर.आर. आगडे

**'गोंदिया जिल्ह्यातील १००५ शाळांमध्ये मूल्यवर्धन घेऊन जाणार' !**

**– डॉ. सी. एल. पुलकुंडवार, मुख्य कार्यकारी अधिकारी**

गोंदिया जिल्ह्यातल्या गोरेगाव तालुक्यातील मोहगाव (तिल्ली) येथे मूल्यवर्धन कार्यक्रम एक वर्षापासून सुरू आहे. इथे सुरु असलेल्या मूल्यवर्धन कार्यक्रमाचा आढावा घेण्यासाठी मुथ्था फौंडेशनचे अध्यक्ष शांतिलाल मुथ्था यांनी गुरुवार दि. २२ डिसेंबर २०१६ रोजी मोहगाव (तिल्ली) येथील शाळेत आढावा बैठक बोलावली होती. या बैठकीला जिल्हा शिक्षणाधिकारी यू. के. नरड, गटशिक्षणाधिकारी पी. वाय. कावले, शिक्षण विस्तार अधिकारी एस. बी. खोब्रागडे, मुख्याध्यापक श्री. वाघमारे, सरपंच सूरजमल पटले यांसह जिल्ह्यातील सर्व शिक्षणाधिकारी. तसेच एसएमएफचे संस्थापक अध्यक्ष शांतिलाल मुथ्था, महेश कोठारी, अमर गांधी, दीपक पारख व पदाधिकारी उपस्थित होते. केंद्रशाळेच्या मुख्याध्यापकांनी सर्वांचे स्वागत केले व केंद्रप्रमुख आर.आर.आगडे यांनी प्रास्ताविकामध्ये मूल्यवर्धन कार्यक्रमाचा आढावा घेतला. या वेळी पुणे येथे प्रशिक्षण घेतलेल्या तीन मास्टर ट्रेनर्सनी सर्वांसमोर आपले अनुभव मांडले. त्यांनी पुणे येथे प्रशिक्षण घेतल्यावर केंद्रस्तरावर इतर शिक्षकांना प्रशिक्षण दिले. या शिक्षकांपैकी बऱ्याच शिक्षकांनी मूल्यवर्धन विषयीचे आपले अनुभव विशद केले. काही पालकांनी मुलांमध्ये होत असलेल्या चांगल्या बदलांबाबत प्रतिक्रिया व्यक्त केल्या. शाळा समिती सदस्यांनी मूल्यवर्धन कार्यक्रमाचा आढावा शालेय व्यवस्थापन समिती सदस्य बैठकीत घेतला जात असल्याची माहिती दिली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारीडॉ.सी.एल. पुलकुंडवार यांनी मूल्यवर्धन कार्यक्रम गडचिरोली जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये घेऊन जाण्याची घोषणा केली. जिल्हा शिक्षणाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या भाषणामध्ये मूल्यवर्धन यशस्वीरीत्या राबवू असे सांगितले व संपूर्ण जिल्ह्यात हा कार्यक्रम राबविण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन सर्व शिक्षकांनी दिले. यावेळी **श्री.शांतिलाल मुथ्था व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पुलकुंडवार यांनी प्रत्येक वर्गात जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विशेष म्हणजे एका वर्गात जाताना श्री. शांतिलाल मुथ्था व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बूट काढलेले नव्हते हे विद्यार्थ्यांच्या लक्षात आल्यावर मुलांनी त्यांना,'आपण बूट बाहेर काढून वर्गात आले पाहिजे, कारण हा आमच्या वर्गाचा नियम आहे', असे स्पष्टपणे सांगितले. यावरून मुलांमध्ये आत्मविश्वास दिसणे आणि स्पष्ट बोलणे, आपल्या वर्गाचे नियम सर्वांनी पाळण्याची अपेक्षा ठेवणे, आदी चांगले बदल घडत आहेत, हे सर्वांच्या लक्षात आले.**

कार्यक्रमानंतर गोंदिया येथे मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा शिक्षणाधिकारी यांच्याबरोबर श्री. शांतिलाल मुथ्था यांची रात्री उशिरा बैठक झाली. त्यामध्ये मूल्यवर्धनची माहिती सी.डी. प्रेझेंटेशनच्या माध्यमाद्वारे देण्यात आली व मूल्यवर्धन पूर्ण गोंदिया जिल्ह्यात घेऊन जाण्यासाठी कशा पद्धतीने तयारी केली पाहिजे यावर चर्चा झाली. मुख्य कार्यकारी अधिकारी हे विद्या प्राधिकरण, पुणे व मुथ्था फाउंडेशनला पत्र देणार आहेत व जिल्हा शिक्षणाधिकारी दहा दिवसात मूल्यवर्धन कार्यक्रमाला उपयुक्त अशा मास्टर ट्रेनर्सची निवड करून त्यांची यादी एसएमएफकडे पाठवतील असे ठरले.

त्याच दिवशी शिक्षण सचिव श्री. नंदकुमार हे गोंदिया येथे असल्याने मुथ्था यांनी रात्री त्यांच्याशी संपर्क साधला. त्यावेळी गोंदिया जिल्ह्यातील सर्व प्राथमिक शाळांमध्ये मूल्यवर्धन सुरू करण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत, अशी चर्चा झाली व त्यासाठी श्री. नंदकुमार यांनी सहमती दर्शवली.

## ५. भंडारा

जि. भंडारा, ता. मोहाडी, केंद्र–आंधळगाव

शाळेचे नाव – जि.प.प्रा.शाळा,आंधळगाव (धर्मापुरी व डोंगरगाव)

शुक्रवार दि.२३ /१२/२०१६ , वेळ–स. ९ वा.

केंद्रातील शाळा :१२, प्रशिक्षित शिक्षक : २६

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स): १) पी. एच. चौरे २) दिलीपकुमार वडवाईक ३) सुभाष मुकुर्णे

**'भंडारा जिल्ह्यातील ८०० शाळांमध्ये मूल्यवर्धन कार्यक्रम राबविणार' !**

**– जिल्हा शिक्षणाधिकारी श्री. अभयसिंह परिहार**

भंडारा जिल्ह्यातील मोहाडी तालुक्यातल्या आंधळगावच्या जि.प. प्रा. शाळेत शुक्रवार दि. २३ डिसेंबर २०१६ रोजी मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. आढावा बैठकीसाठी आंधळगाव जि.प. प्रा. शाळेचे मुख्याध्यापक श्री. महिवाल पटले, केंद्रातील १२ शाळांचे शिक्षक, पालक, शालेय समितीचे सदस्य आणि आंधळगावचे केंद्रप्रमुख श्री. सुभाष मुकुर्णे, भंडारा जि. प. सदस्य सौ. राणीताई ढेंगे तसेच एसएमएफचे संस्थापक अध्यक्ष श्री. शांतिलाल मुथ्था, श्री. दीपक पारख, श्री. अमर गांधी व पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थितांचे स्वागत, प्रास्ताविक आणि सूत्र संचालन सहशिक्षक श्री. योगेश पुडके यांनी केले. या केंद्रातील आंधळगाव, धर्मापुरी व डोंगरगाव या तीन शाळांना भेटी देण्यात आल्या. श्री. शांतिलाल मुथ्था यांनी प्रथम आंधळगाव शाळेतील इयत्ता पहिली ते तिसरीच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तिसरीच्या विद्यार्थ्यांना वर्गनियम, शांतता संकेत या विषयी माहिती विचारली. उपक्रम पुस्तिकेतील गोष्ट तयार करणे, मित्राचे गुण या विषयी चर्चा केली. पहिलीच्या वर्गातील मुलांनी बनविलेले वर्गनियम पाहिले आणि त्या आधारावर मुथ्था यांनी प्रश्न विचारले, ''वर्ग नियम कोणी बनविले? कोणते वर्ग नियम आहेत? तुम्ही वर्ग नियम पाळता का?'' या आणि इतर प्रश्नांना विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त उत्तरे दिली. मुथ्था यांनी इयत्ता दुसरीच्या वर्गामध्ये उपक्रम पुस्तिकेच्या माध्यमातून संवाद साधून सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. त्यानंतर झालेल्या बैठकीत मुथ्था म्हणाले, ''शालेय विद्यार्थी हा देशाचा एक जबाबदार, संवेदनशील, कर्तबगार नागरिक व्हावा यासाठी मूल्यवर्धन कार्यक्रम तयार करण्यात आला आहे. हा कार्यक्रम महाराष्ट्रातील ३४ जिल्ह्यांमधील प्रत्येकी एका केंद्रात सुरु आहे. सर्वच ठिकाणी हा कार्यक्रम जि. प. चे शिक्षक अतिशय चांगल्या प्रकारे राबवित आहेत. मूल्यवर्धनचे काही उपक्रम जि. प. शाळेतील शिक्षकांनी तयार केले आहेत.'' केंद्रातील सर्व शिक्षकांचे आभार मानून मुथ्था पुढे म्हणाले, **''गेल्या २० ते २५ वर्षांपासून होत चाललेला मूल्यांचा ऱ्हास थांबवायचा असेल तर पुढची पिढी लहानपणापासून मूल्याधिष्ठित केली पाहिजे. मूल्य ही शिकविली जाऊ शकत नाहीत, तर, ती वेगवेगळ्या कृतींच्या माध्यमातून मुलांमध्ये रुजविली पाहिजेत. त्यासाठी आपण सर्वजण एकत्र काम करून काही आव्हानांना सामोरे जाऊयात.''**

जिल्हा शिक्षणाधिकारी श्री. अभयसिंह परिहार यांनी यावेळी बोलताना सांगितले, ''प्रौढ व्यक्तीचा पिंड लहानपणीच रुजला पाहिजे. मोठेपणी काही सवयी बदलता येत नाहीत. सुजाण, सुशिक्षित नागरिक घडले पाहिजेत. आजचा युवक हा इंटरनेट, मोबाईल, संगणक यामध्ये गुरफटला आहे. मूल्यवर्धन कार्यक्रम हा अतिशय महत्त्वाचा असून तो जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये राबविण्याची गरज आहे.'' त्यासाठी लागणारे सर्व सहकार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली. भंडारा जिल्ह्यातील ८०० शाळांमध्ये मूल्यवर्धन कार्यक्रम राबविण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. तसेच दि. २६ डिसेंबर २०१६ रोजी मूल्यवर्धन संदर्भात भंडारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे बरोबर बैठक आयोजित केल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास उपस्थित असलेले मोहाडीचे गट शिक्षणाधिकारी श्री. रमेश गाढवे यावेळी बोलताना म्हणाले, ''मूल्यवर्धन कार्यक्रम ही काळाची गरज असून त्यामुळे प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र निर्माण होण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास या कार्यक्रमाची मदत होत आहे. पुणे येथील बैठकीला हजर होतो त्यावेळी विद्या प्राधिकरणाने मास्टर ट्रेनरसाठी १५ लोकांची नावे मागितली होती. ती लवकरात लवकर पाठवून मूल्यवर्धन संपूर्ण तालुक्यात राबविण्यासाठी संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन मी देतो.''

केंद्रप्रमुख सुभाष मुकुर्णे यांनी केंद्रातील मूल्यवर्धन कार्यक्रमाचा आढावा घेताना सांगितले, ''हा उपक्रम केंद्रातील १२ शाळांमध्ये सुरु आहे आणि इथून पुढे मूल्यवर्धन अधिक जोमाने संपूर्ण केंद्रात राबविणार आहोत. मूल्यवर्धन कार्यक्रम शालेय अभ्यासक्रमाशी

निगडीत असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महत्त्वाचा आहे.''

बैठकीनंतर मुथ्था सरांनी डोंगरगाव व धर्मापुरी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मास्टर ट्रेनर दिलीपकुमार बडवाईक यांनी आभार मानले.

## ६. गडचिरोली

जि. गडचिरोली, ता.चामोर्शी, केंद्र–तळोधी

शाळेचे नाव – जि.प.प्रा.शाळा,तळोधी,(हिवरगाव व खोर्दा)

गुरुवार दि.२२/१२/२०१६ , वेळ– स.९.३० वा.

केंद्रातील शाळा :१८, प्रशिक्षित शिक्षक : ३६

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स) : १) गौतम मेश्राम २) नंदकिशोर धोटे ३) अतुल कुनघडकर

**'मूल्यवर्धन लवकरच संपूर्ण तालुक्यात नेऊ' – जिल्हा शिक्षणाधिकारी माणिकराव साखरे**

गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यात तळोधी केंद्रामध्ये १८ शाळांत मूल्यवर्धन कार्यक्रम सुरू आहे. यापैकी मुथ्था फाउंडेशनचे अध्यक्ष शांतिलाल मुथ्था यांनी गुरुवार दि. २२/१२/२०१७ रोजी तीन शाळांना भेट दिली. सर्वप्रथम हिवरगाव शाळेस भेट दिली. या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना एकत्र बोलविण्यात आले होते. विद्यार्थी, पालक, शाळा समिती सदस्य, शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख या शाळा भेटीला उपस्थित होते. सुरूवातीला थेट विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला. शांतिलाल मुथ्था यांनी इयत्ता पहिली, दुसरी व तिसरीच्या विद्यार्थ्यांना मूल्यवर्धनच्या विविध उपक्रमासंबंधी प्रश्न विचारले.त्यावेळी विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देऊन आपल्याला हे उपक्रम आवडत असल्याचे दाखवून दिले. यानंतर खोर्दा शाळेस भेट दिली. या भेट दिलेल्या दोन्ही शाळेत असेच आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. खोर्दा शाळेत प्रथम विद्यार्थ्यांशी चर्चा करण्यात आली. त्यावेळी चौथी व पाचवीच्या मुलांनाही 'शांतता संकेत' माहिती असल्याचे निदर्शनास आले. तळोधी केंद्र शाळेत मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी जिल्हा शिक्षणाधिकारी माणिकराव साखरे, गटशिक्षणाधिकारी (चामोर्शी), दिपक देवतळे, शिक्षण विस्तार अधिकारी धर्मानंद मेश्राम, केंद्रप्रमुख गौतम मेश्राम, केंद्रशाळेचे मुख्याध्यापक ओमप्रकाश बोमनवार व आर. के. देऊरमल्ले, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व केंद्रातील सर्व शिक्षक, जिल्हा समन्वयक श्री राजन बोरकर हजर होते. तसेच एसएमएफचे संस्थापक अध्यक्ष श्री. शांतिलाल मुथ्था, श्री. दीपक पारख, श्री. अमर गांधी व पदाधिकारी उपस्थित होते.

सुरूवातीला श्री. ओमप्रकाश बोमनवार यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. श्री. गौतम मेश्राम यांनी प्रास्ताविक करून मूल्यवर्धन कार्यक्रमाची माहिती सांगितली. विशेष म्हणजे त्यांनी मूल्यवर्धन संदर्भातील सी.डी. प्रेझेंटेशन सर्वांसमोर सादर केले. या केंद्रशाळेत टेक्नॉलॉजीची अद्ययावत सुविधा उपलब्ध आहे.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी मुख्याध्यापक व केंद्रप्रमुखांनी भरपूर मेहनत घेतल्याचे जाणवत होते. शांतिलाल मुथ्था यांनी मूल्यवर्धनची भूमिका सी.डी.च्या माध्यमाद्वारे मांडली व सर्वांशी संवाद साधला. गडचिरोली जिल्ह्यातील तीन साधनव्यक्तींनी मूल्यवर्धन कार्यक्रमाविषयी सविस्तर माहिती दिली. पुणे येथे प्रशिक्षण घेतल्यानंतर केंद्रस्तरावर त्यांनी प्रशिक्षण दिल्याचे सांगितले. जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांनी मूल्यवर्धन कार्यक्रम लवकरच पूर्ण तालुक्यात सुरू करण्यासंदर्भात कार्यवाही सुरू केली आहे व मास्टर ट्रेनरची यादी विद्या प्राधिकरणाला पाठविण्यास सांगितले आहे, असे सांगितले.

आदिवासी भाग असल्याने या संपूर्ण केंद्रामध्ये मुलांच्या भाषेत बदल असल्याचे जाणवत होते. केंद्रातील शिक्षक त्या प्रमाणे बदल करून मूल्यवर्धनचे उपक्रम करीत आहेत. विद्या प्राधिकरण, पुणे यांनी तळोधी केंद्रप्रमुख श्री. गौतम मेश्राम यांना मूल्यवर्धनच्या विविध प्रशिक्षणासाठी पुणे येथे बोलवले होते. ते अतिशय सक्रिय व उत्साही असल्याचे जाणवत होते.

## ७. लातूर

जि. लातूर, ता. लातूर, केंद्र – महमदापूर

शाळेचे नाव – जि.प.प्रा.शाळा,भडी

मंगळवार दि. १० जानेवारी, २०१७, वेळ–स. ९ वा.

केंद्रातील शाळा : १४, प्रशिक्षित शिक्षक : ३६

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स) : १) व्ही.टी. बोनवले, २) एस. आर. येडले

**मूल्यवर्धन हा रचनावादाला पूरक उपक्रम आहे – एस. आर. येडले**

लातूर जिल्ह्यातील जि. प. शाळा, भडी येथे मंगळवार दि.१० जानेवारी २०१७ रोजी मूल्यवर्धन आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. **मूल्यवर्धन कार्यक्रमामुळे विद्यार्थी आणि शिक्षकांमधे जवळीक निर्माण झाली आहे. तसेच हा कार्यक्रम रचनावादाला पूरक आहे, असे मत महमदापूर (लातूर)चे केंद्रप्रमुख एस.आर.येडले यांनी व्यक्त केले.** या बैठकीला भडी शाळेचे मुख्याध्यापक सुवर्णकार, मूल्यदूत व्ही. टी. बोनवले, मूल्यदूत गुत्ते, शांतिलाल मुथ्था फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शांतिलाल मुथ्था, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य तसेच सर्व शिक्षक व पालक उपस्थित होते.

**सुवर्णकार यांनी या उपक्रमामुळे मुले संवेदनशील बनली, त्यांच्यात सहनशीलता वाढण्यास मदत झाली आणि शाळेत आनंदाची निर्मिती झाल्याचे म्हटले.** ''मूल्यवर्धनच्या प्रशिक्षणानंतर माझ्यात सभाधीटपणा आला. रागावर नियंत्रण कसे मिळवायचे याचे उदाहरण मी वर्गात दिल्यावर एका मुलीने ते घरी आईला सांगितले व कुटुंबातील वाद कमी करण्याचा प्रयत्न केला'', अशी प्रतिक्रिया मूल्यदूत व्ही.टी.बोनवले यांनी व्यक्त केली. 'मी व माझ्या क्षमता' या उपक्रमामुळे मुलांमधील नकारात्मकता दूर होण्यास मदत झाल्याचे मूल्यदूत गुत्ते सर यांनी सांगितले. या उपक्रमामुळे मुलांना त्यांचे नातेसंबंध अधिक स्पष्टपणे समजायला लागले आहेत. तसेच सहयोगी खेळातून मुलांमध्ये सहकार्य, एकात्मता, बंधुभाव रुजण्यास मदत होत आहे, अशी भावना श्रीमती कदम व स्वामी मॅडम यांनी व्यक्त केली.

यावेळी मुथ्था यांनी शिक्षकांशी तसेच मुलांशी संवाद साधला. वर्गात गेल्यावर मुलांनी मुथ्था यांची मुलाखत घेतली. वर्गातील काही मुलांनी आपल्या वडिलांची तंबाखूची सवय सोडण्यासाठी काय काय क्लृप्त्या केल्या, घरातील वाद मिटवण्यासाठी कसा पुढाकार घेतला, वर्गनियम आम्ही कसे तयार केले व ते कसे पाळतो हेही सांगितले. मुलांमधील जबाबदारीची जाणीव यातून दिसून आली. लातूरच्या गट शिक्षणअधिकारी तृप्ती अंधारे यांच्याशी मुथ्था यांची लातूर येथे बैठक झाली. त्यावेळी अंधारे यांनी मूल्यवर्धन कार्यक्रमामुळे शिक्षकांमध्ये व मुलांमध्ये आमूलाग्र बदल दिसून आल्यामुळे हा कार्यक्रम संपूर्ण तालुक्यात घेऊन जाण्यासाठी २० मास्टर ट्रेनर्सची यादी तयार केल्याचे सांगितले.

## ८. नांदेड

जि. नांदेड, ता. नांदेड , केंद्र – चौफाळा

शाळेचे नाव – जि. प. प्रा. शाळा, बोंढार

शुक्रवार दि.३० डिसेंबर २०१६, वेळ–स. ११ वा.

केंद्रातील शाळा : १३, प्रशिक्षित शिक्षक : ४४

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स) : १)एस. आर. हाडवे २) व्ही. बी .पवार ३) आर. डी. संगेवार

**'मूल्याधिष्ठीत पिढी निर्माण करण्याचे मूल्यवर्धनचे कार्य' –अशोक शिंगारे, मुख्यकार्यकारी अधिकारी**

नांदेड जिल्ह्यातील चौफाळा केंद्रामध्ये मूल्यवर्धन कार्यक्रम एक वर्षापासून सुरू आहे. या निमित्ताने कार्यक्रमाचा आढावा घेण्यासाठी नांदेड पंचायत समितीच्या सभागृहामध्ये मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम शांतिलाल मुथ्था यांनी चौफाळा केंद्रातील जि. प. शाळा, बोंढार येथे भेट दिली. या शाळेतील विद्यार्थ्यांशी त्यांनी संवाद साधला. या परिसरात वीटभट्टी कामगार राहत असल्याने मुलांच्या बोली भाषेमध्ये फरक जाणवत होता. मूल्यवर्धनबद्दल विचारलेल्या प्रश्नांना मुलांनी उत्तरे दिली. वर्गशिक्षिका शमशाद बेगम यांनी स्वतः नवीन उपक्रम बनविल्याची माहिती दिली.

या कार्यक्रमास नांदेड जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शिंगारे,उपमुख्य कार्यकारी अधिकारी पद्माकर केंद्रे, शिक्षणाधिकारी सविता बिरगे, उपशिक्षणाधिकारी (प्रा) डॉ. जयश्री गोरे, संस्कृती संवर्धन मंडळाचे अध्यक्ष प्रमोद देशमुख, गट विकास अधिकारी श्री राऊत, पं. स.नांदेडचे गट विकास अधिकारी अशोक देवकरे, चौफाळयाचे विस्तार अधिकारी बालाजीराव शिंदे, मूल्यवर्धन जिल्हा समन्वयक ऋषिकेश कोंडेकर, चौफाळा केंद्रप्रमुख नंदकुमार कवठेकर, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व पालक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, शांतिलाल मुथ्था फाउंडेशन (एसएमएफ) संस्थापक शांतिलाल मुथ्था व पत्रकार उपस्थित होते. केंद्रप्रमुख कवठेकर यांनी मूल्यवर्धन कार्यक्रम चौफाळा केंद्रांतर्गत कशा प्रकारे राबविला जातो याचे पॉवरपॉइंट सादरीकरण केले. यासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणावर तयारी केली होती. यानंतर तीन मास्टर ट्रेनर्सनी त्यांचे अनुभव सांगितले. तसेच शिक्षकांनीही त्यांचे अनुभव सांगितले. मूल्यवर्धन जिल्हा समन्वयक ऋषिकेश कोंडेकर हे अतिशय सक्रिय व उत्साही असल्याचे जाणवत होते.

**या ठिकाणी उपस्थित असलेल्या शिक्षकांपैकी ६० – ६५ टक्के शिक्षक उर्दू शाळांना शिकविणारे होते. एकूणच या जिल्ह्यात उर्दू शाळांची संख्या जास्त आहे. मराठीत शिक्षण घेतलेल्या उर्दू माध्यमाच्या शिक्षकांनी मूल्यवर्धन उपक्रमांचे उर्दूमध्ये भाषांतर करून स्वतः उर्दू शाळेतील मुलांकडून कृती करून घेतल्या. एसएमएफ च्या वतीने नांदेड येथील अब्दुल कादिर यांना मूल्यवर्धन उपक्रम पुस्तिका व मार्गदर्शक पुस्तिकांचे भाषांतर करण्याची विनंती केली होती. त्यांनी या पुस्तिकांचे भाषांतर केले असून ते पुनरावलोकनासाठी विद्या प्राधिकरणाकडे दिले जात आहे.** श्री. कादिर यांच्या योगदानाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शिंगारे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. विद्या प्राधिकरणाच्या कार्यालयामार्फत ४–५ महिन्यापूर्वी मूल्यवर्धन शिक्षकांना मूल्यवर्धन उपक्रम तयार करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने एका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये नांदेड जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षिका सौ. नुसरत यांनी जो उपक्रम तयार केला होता त्याला संपूर्ण महाराष्ट्रामध्ये तिसरा क्रमांक मिळाला, त्यांचाही सत्कार यावेळी करण्यात आला.

''आपण लोकशाही स्वीकारली परंतू मूल्ये रूजवू शकलो नाही, त्यामुळे मूल्ये चांगल्या पध्दतीने रूजवण्याचा प्रयत्न करावा लागेल व हा प्रयत्न मूल्यवर्धनच्या माध्यमातून होत असताना दिसत आहे. 'शांतिलाल मुथ्था फाउंडेशन' ही एक केवळ प्रयोगशाळा नसून संस्काराचे विद्यापीठ आहे'', अतिरिक्त जिल्हा कार्यकारी अधिकारी श्री. पद्माकर केंद्रे म्हणाले. तसेच निवृत्तीनंतरही या क्षेत्रात कार्य करत राहण्याचा संकल्प यावेळेस त्यांनी बोलून दाखवला.

''मूल्यवर्धन हे सामूहिक कार्य व चळवळ असून या उपक्रमातून मूल्याधिष्ठित पिढी निर्माण होत आहे, कार्यक्रमाला उपस्थित राहिल्याचे सर्वोत्तम समाधान आज मला लाभले'' असे उदगार नांदेड जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.अशोक शिंगारे यांनी या प्रसंगी काढले. या कार्यक्रमाची जिल्ह्यात विस्ताराची आवश्यकता आहे, या दृष्टीने फाऊंडेशनला पूर्ण सहकार्य केले जाईल व मूल्यवर्धनच्या प्रशिक्षणासाठी १००पेक्षा अधिक ट्रेनर देऊ, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यावर श्री. शांतिलाल मुथ्था यांनी पुणे मुख्य कार्यालयातून खास टीम पाठवून संपूर्ण नांदेड जिल्ह्यात मूल्यवर्धन राबविण्यासाठी सहकार्य करू, असे नमूद केले.

कार्यक्रमानंतर उपशिक्षणाधिकारी डॉ. जयश्री गोरे यांच्याशी जिल्हा परिषद कार्यालयामध्ये श्री. शांतिलाल मुथ्था यांची मूल्यवर्धन संदर्भात पुन्हा एकदा सविस्तर चर्चा झाली. डॉ. गोरे यांनी मूल्यशिक्षण या विषयामध्ये एम.एड ही पदवीत्तर पदवी प्राप्त केली असून त्यांना या क्षेत्रातील पूर्ण अनुभव आहे. त्यांनी शासकीय सेवेतील निवृत्तीनंतर मूल्यवर्धनसाठी समर्पित होऊन कार्य करण्याची इच्छा व्यक्त केली.

एकूणच नांदेड जिल्ह्यात खूप मोठ्याप्रमाणात उत्साह दिसून आला. नांदेड जिल्ह्यात शाळांची संख्या खूप असल्यामुळे एक मोठा प्रयोग करण्यासाठी नांदेड जिल्हा उपयोगी ठरेल. याबाबत विद्या प्राधिकरणबरोबर चर्चा करून निर्णय घेतला जाईल. कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री. बालाजीराव शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन श्री. चौधरी यांनी केले. आभार प्रदर्शन श्री. अशोक देवकरे व सौ. बिरगे यांनी केले.

## ९. उस्मानाबाद

जि. उस्मानाबाद, ता. भूम, केंद्र – निपाणी

शाळेचे नाव – जि.प.प्रा.शाळा,पखरुड

मंगळवार दि.१० /१/२०१७, वेळ– दु. ३.३० वा.

केंद्रातील शाळा :१०, प्रशिक्षित शिक्षक : २२

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स): १) पोपट बोराडे २) नारायण तरलकर ३)दादासाहेब साळुंके

**जि.प.शाळेच्या तिसरीतील मुले पालकांचे व्यसन सोडवितात!**

उस्मानाबाद जिल्ह्यात भूम तालुक्यातल्या पखरुड गावात मंगळवार दि. १० जानेवारी, २०१७ रोजी मूल्यवर्धन कार्यक्रम आढावा बैठक झाली. **आतापर्यंत जि.प. शाळांमधे शिकवणारे शिक्षक आणि शिकणारी मुले असे चित्र सगळ्यांनी पाहिले आहे; परंतु मूल्यवर्धन उपक्रमामुळे शिक्षक–विद्यार्थी–पालकांमधील नाते दृढ झाल्याचे चित्र निपाणी केंद्रांतर्गत असलेल्या पखरुडच्या जि.प.शाळेत झालेल्या मूल्यवर्धन उपक्रमाच्या आढावा बैठकीत अनुभवाला आले.** या बैठकीला भूमचे गटविकास अधिकारी कांबळे, गटशिक्षणाधिकारी शिवाजी जाधव, जि.प. सदस्य कांचनमाला संगवे, विस्तार अधिकारी खराडे, श्री. बन आणि सरोद, केंद्रप्रमुख अकुलवार, मुख्याध्यापक साळवे, मूल्यवर्धन उपक्रमाचे मास्टर ट्रेनर दादासाहेब साळुंके व पोपट बोराडे आदी उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून शांतिलाल मुथ्था फाउंडेशनचे संस्थापक शांतिलाल मुथ्था उपस्थित होते. बैठकीपूर्वी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यावेळी विद्यार्थ्यांमधून निवडलेल्या मुख्यमंत्री विद्यार्थ्यानेच मुथ्थांचे स्वागत केले. तसेच शाळेत सर्व मुले कामात कशी मदत करतात हे सांगितले. **ही मुले आपल्या घरी आई वडिलांनाही कामात मदत करतात. त्यांच्या आज्ञा पाळतात, पण वडिलांनी तंबाखूची पुडी आणायला सांगितली तर नकार देऊन व्यसन सोडण्याचा हट्ट धरतात! यामुळे पालकांमध्येही बदल घडले असून आपल्या पाल्यामुळेच व्यसन सुटल्याचे संतोष गोसावी या पालकाने भर बैठकीत सांगितले तेव्हा अवघी सभा स्तब्ध झाली!**

बीडमध्ये प्रायोगिक तत्त्वावर हा उपक्रम शांतिलाल मुथ्थांनी सुरू केला होता. तो नंतर राज्यसरकारने मूल्यमापन करवून घेऊन राज्यातल्या ३४ जिल्ह्यांत प्रत्येक तालुक्यातील एका केंद्रात राबवण्याचा निर्णय घेतला. हा उपक्रम सर्वदूर पोहोचावा अशी शिक्षकांची मागणी असल्याचे यावेळी मुथ्थांनी सांगितले. परदेशी शिक्षणसंस्थांनीही या कार्यक्रमाचे मूल्यमापन केले आणि हा कार्यक्रम उपयोगी असल्याचा अभिप्राय दिल्याचे मुथ्था यांनी नमूद केले.मूल्यवर्धनचे उपक्रम घेणाऱ्या शिक्षकांनी यावेळी आपले अनुभव सांगितले.

## १०. औरंगाबाद

जि. औरंगाबाद, ता. औरंगाबाद, केंद्र – कचनेर

शाळेचे नाव – श्रीमती धन्नाबाई टेक्निकल हायस्कूल

मंगळवार दि.१३ /१२/२०१६, वेळ – स.११ वा.

केंद्रातील शाळा : १५, प्रशिक्षित शिक्षक : ४३

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स):१) गजानन देशमुख २) आर. बी. ठोंबरे ३) व्ही. आर. खंडेभराड

**मूल्यवर्धन उपक्रमांमुळे मुलांची शाळेतील उपस्थिती वाढली!**

**सर्व शिक्षकांचे मत**

औरंगाबाद जिल्ह्यातील कचनेर येथे मंगळवार दि. १३/१२/२०१६ रोजी, मूल्यवर्धन आढावा कार्यक्रमाचे आयोजन श्रीमती धन्नाबाई टेक्निकल हायस्कूलमध्ये करण्यात आले होते. कचनेर केंद्रातील सर्व शाळांचे मूल्यवर्धन शिक्षक, मुख्याध्यापक, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, पालक, मुथ्था फाउंडेशनचे श्री. शांतिलालजी मुथ्था, शिक्षणाधिकारी श्री. आर.एस. मोगल, श्री. माणिकचंद गंगवाल, गटशिक्षणाधिकारी राकेश साळुंके, शिक्षण विस्तार अधिकारी रमेश ठाकूर, केंद्रप्रमुख श्री. खंडेभराड,

एसएमएफ चे पदाधिकारी श्री. गौतम संचेती, श्री. कस्तुरजी पापडीवाल उपस्थित होते.

या वेळी श्री. शांतिलाल मुथ्था यांनी मूल्यवर्धन सुरू करण्यामागचे उद्दिष्ट व दिशा स्पष्ट केली व उपक्रमात सहभागी अशा सर्वांशी संवाद साधला. **कार्यक्रमाला उपस्थित अधिकारी, शिक्षक, पालक तसेच शाळा समिती सदस्यांनी कचनेर केंद्रात चालणाऱ्या उपक्रमाचे अनुभव व मनोगते मांडली. कृतियुक्त उपक्रम असल्यामुळे मुले या विषयाला कंटाळत नाहीत, या विषयाचा त्यांना दबाव वाटत नाही, या उपक्रमामुळे शिक्षकांमध्ये उत्साह वाढला असून रचनावादाला पूरक असा हा उपक्रम आहे. यामुळे मुलांच्या शाळेतील उपस्थितीत वाढ झाल्याचे दिसून आले असे अनुभव शिक्षकांनी व्यक्त केले. मुले प्रत्येक घटना समजुतीने घेतात, दुसऱ्यांचा आदर राखतात, समोरच्याची मते ऐकून घेतात व खुल्या आणि मोकळ्या मनाने प्रश्न विचारतात. पूर्वीपेक्षा मुलांमध्ये चांगले बदल घडत असल्याचे मत पालकांनी व्यक्त केले.** नंतर श्री. शांतिलाल मुथ्था यांनी वर्गात जाऊन मुलांशी संवाद साधला. मुलांनीही मुथ्थांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या व शांतता संकेत काय असतो, वर्गनियम स्वत: कसे तयार केले व पाळतो, राग कसा नियंत्रित करतो, हे सांगितले व मूल्यवर्धन उपक्रमातील काही कृतीही करून दाखवल्या.

## ११. जालना

जि.जालना, ता. जालना, केंद्र – वाघ्रूळ

शाळेचे नाव – जि.प.प्रा.शाळा

मंगळवार दि.१३/१२/२०१६, वेळ–दु. ४.३० वा.

केंद्रातील शाळा : १२, प्रशिक्षित शिक्षक : ४३

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स) : १) उमेश जोशी २) एस. एस. डोके ३) राजकुमार खराडे.

**मूल्यवर्धन कार्यक्रमामुळे मुलांचा घरकामातील सहभाग आणि संवाद वाढला!**
**पालकांच्या प्रतिक्रिया**

जालना जिल्ह्यातील वाघ्रूळ केंद्रात मंगळवार दि.१३ डिसेंबर २०१६ रोजीमूल्यवर्धन कार्यक्रम आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिक्षणाधिकारी (प्राथ.) श्री.पांडुरंग कवाने यांनी, 'मूल्यवर्धन कार्यक्रम संपूर्ण जालना जिल्ह्यात राबवला जावा यासाठी आम्ही पूर्ण सहकार्य करू' अशी भावना व्यक्त केली. या कार्यक्रमात **श्री. शांतिलाल मुथ्था यांनी शिक्षकांशी संवाद साधला असता शिक्षकांनी मुलांमध्ये होत असलेल्या बदलांची अनेक उदाहरणे दिली. यात एक दुसऱ्याला मदत करण्यापासून ते मित्राची काळजी घेण्यापर्यंत, तसेच त्याच्या आवडीनिवडी जपण्यापर्यंत मुले काळजी घेताना आढळतात. मूल्यवर्धन उपक्रमातील मूल्ये ही जीवनाश्यक बाब असून योग्य अशा वयातच आपण त्यांना ती देत असल्याचा विशेष आनंद काही शिक्षकांनी बोलून दाखवला. 'मूल्यवर्धन' हा कृतियुक्त, मुलांच्या जाणीवा जागृत करणारा, त्यांना आपली मतं मांडायला लावणारा, तसेच कुटुंबातील व्यक्तींसोबत नातेसंबंध अधिक दृढ करणारा उपक्रम असल्याने मुलांना तो करताना खूप आनंद मिळतो आहे. एका शिक्षिकेने तर 'मुले आपल्या आजारी मित्राला भेटायला खाऊ घेऊन गेली व त्याची विचारपूस केली' हे सांगितल्यावर सर्वांनाच मुलांचे कौतुक वाटले.**

या उपक्रमाच्या परिणामाबद्दल पालकांना विचारले असता त्यांनी सांगितले, 'मुलं प्रथमच आमच्या पाया पडायला लागली. जी मुलं कधी घरातील कामाला हात लावत नव्हती, ती आज स्वतःहून मदत करायला लागली. आमच्या आवडीनिवडी विचारायला लागली, यामुळे आम्हाला देखील हा उपक्रम मुलांना सतत देत राहावेसे वाटत आहे''.

श्री. शांतिलाल मुथ्था यांनी 'मूल्यवर्धन' कार्यक्रमाचे उद्दिष्ट स्पष्ट केले. ते म्हणाले, ''व्यक्तीला नुसते ज्ञान असून उपयोगाचे नाही तर ते आचरणामध्ये उतरले पाहिजे आणि यासाठी मुलांना वेगवेगळे अनुभव दिले पाहिजेत, हे अनुभव देण्याचा प्रयत्न आपण 'मूल्यवर्धन'मधून करीत आहोत. यासाठी विविध कृती उपक्रमाचा समावेश 'मूल्यवर्धन' मध्ये केला आहे.'' श्री. मुथ्था यांनी मुलांशी संवाद साधला तेव्हा विद्यार्थ्यांनी वर्गनियम कसे तयार केले ते सांगितले व शांतता संकेत कसे शिकलो तेही सांगितले.

उपशिक्षणाधिकारी एन.एस. मापारी, उपशिक्षणाधिकारी रवींद्र जोशी, विस्तार अधिकारी बी.आर. खरात, वाघ्रूळ च्या जि.प. प्रा. शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मण जोशी, केंद्रप्रमुख राजकुमार खराडे, केंद्रातील १२ शाळांचे शिक्षक, सर्व मुख्याध्यापक, उपसरपंच, ग्रामस्थ, पालक या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

## १२. परभणी

जि. परभणी, ता. मानवत, केंद्र – केकरजवळा

शाळेचे नाव – जि.प.प्रा.शाळा,पोहंडूळ

गुरुवार दि.२९ /१२/२०१६, वेळ–स.१० वा.

केंद्रातील शाळा :१४, प्रशिक्षित शिक्षक : १७

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स) : १) एस. आर. लिपारे २) राम घाटे

**'जबाबदार नागरिक म्हणून मूल्यवर्धन कार्यक्रम पूर्ण जिल्ह्यात नेईन': जिल्हा शिक्षण सभापती दादासाहेब टेमशे यांचे प्रतिपादन**

परभणी जिल्ह्यातील मानवत तालुक्यात केंद्र केकरजवळा येथील पोहंडूळ जि. प. प्रा. शाळेमध्ये मूल्यवर्धन आढावा बैठकीचे आयोजन गुरुवार दि. २९ डिसेंबर २०१६ रोजी करण्यात आले होते. या बैठकीसाठी जिल्हाशिक्षण सभापती दादासाहेब टेमशे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष माणिकराव धोपटे, पोहंडूळ शाळेचे मुख्याध्यापक श्री.जी.एन. बनसोडे, केकरजवळा केंद्रप्रमुख आर. पी. मोरे, कोल्हा केंद्रप्रमुख कुलकर्णी, शिक्षक श्री. शिंदे, श्री. सुरवसे, श्री. जागो, श्री. भवर, श्री. शिराळे, सौ. सूर्यवाड व पालक उपस्थित होते. तसेच शांतिलाल मुथ्था फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्री. शांतिलाल मुथ्था, राज्य पदाधिकारी झुंबरलाल मुथ्था, निलेश विनायके, राजेंद्र पोखरणा, धरमचंद गंगवाल, ॲड. कळमकर इ. पदाधिकारी उपस्थित होते.

या जिल्ह्याचे वैशिष्ट्य असे की, मूल्यवर्धनचे पहिले प्रशिक्षण ३४ जिल्ह्यांत निवड केलेल्या केंद्रातील शिक्षकांसाठी डिसेंबर २०१५ जानेवारी २०१६ दरम्यान आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये परभणी जिल्ह्यातील शिक्षक प्रशिक्षणासाठी उपस्थित नव्हते. त्यामुळे इतर सर्व जिल्ह्यात जानेवारीमध्ये मूल्यवर्धन सुरु झाले. परंतु परभणी जिल्ह्यात हा कार्यक्रम सुरु होऊ शकला नव्हता. जून २०१६ मध्ये मात्र परभणीच्या शिक्षकांनी पुणे येथे प्रशिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी आपल्या केंद्रामध्ये जाऊन सहकारी शिक्षकांना प्रशिक्षण दिले. या ठिकाणी मूल्यवर्धन सुरु होऊन जेमतेम ३–४ महिने झाले आहेत. त्यामुळे या ठिकाणी मूल्यवर्धनच्या प्रगतीबद्दल साशंकाता होती. परंतु शांतिलाल मुथ्था यांनी प्रत्यक्षात विद्यार्थ्यांशी चर्चा व गप्पागोष्टी केल्या, विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यावेळी इतर जिल्ह्यांप्रमाणे जरी येथे मूल्यवर्धन एक वर्षापूर्वी सुरु झाले नव्हते, तरीसुद्धा केवळ तीन महिन्यात या शिक्षकांनी खूप मोठी प्रगती केल्याचे आढळून आले. सर्व विद्यार्थी, पालक व गावकरी यांनी कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला. मुथ्था यांनी भर सभेमध्ये मूल्यवर्धन संदर्भात विचारलेल्या सर्वच प्रश्नांची विद्यार्थ्यांनी समर्पक उत्तरे दिली. मूल्यवर्धन कार्यक्रमामुळे घटनात्मक मूल्ये मुलांमध्ये रुजविली जात आहेत व केंद्रातील शाळेत बदल घडत आहेत, असे प्रतिपादन केंद्रप्रमुख आर.पी. मोरे यांनी केले. तसेच त्यांनी मूल्यवर्धन उपक्रम इयत्ता चौथी व पाचवीसाठी सुरु करावा व संपूर्ण मानवत तालुक्यात हा कार्यक्रम राबवावा, अशी विनंती, शांतिलाल मुथ्था यांना केली.

या प्रसंगी शिक्षणसभापती श्री.दादासाहेब टेमशे उपस्थित होते. त्यांनी जिल्ह्यातील बऱ्याच शाळांमध्ये डिजिटलायझेशन प्रक्रिया सुरु केली आहे. शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्याशी सविस्तर चर्चेनंतर बोलताना म्हणाले, ''मूल्यवर्धन कार्यक्रमाबद्दल २–३ महिन्यापूर्वी कोणतीही कल्पना नव्हती. परंतु आज त्यांना सविस्तर माहिती व सर्वांशी चर्चा करण्याची संधी मिळाली व त्याची उपयुक्तता त्यांनी प्रत्यक्षात अनुभवली.'' ते पुढे म्हणाले, ''मी या ठिकाणी शिक्षण सभापती आहे म्हणून नव्हे, तर एक जबाबदार नागरिक म्हणून मूल्यवर्धन कार्यक्रम पूर्ण जिल्ह्यात घेऊन जाण्याचा प्रयत्न करीन. मी सभापती असो–नसो, या कार्यक्रमासाठी पूर्ण जिल्हाभर फिरेन.''

याच कार्यक्रमामध्ये पोहंडूळ शाळेतील डिजिटल क्लासचे उद्‌घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मुख्याध्यापक बनसोडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले व केंद्रप्रमुख आर.पी. मोरे यांनी मूल्यवर्धन कार्यक्रमाची माहिती दिली.

## १३. हिंगोली

<u>जि. हिंगोली, ता.वसमत, केंद्र–वसमत</u>

<u>शाळेचे नाव</u> – जि.प.प्रा.शाळा,पांगरासती

गुरुवार दि.२९ /१२/२०१६, वेळ– दु. ४ वा.

<u>केंद्रातील शाळा</u> :१४, प्रशिक्षित शिक्षक : ५३

<u>मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती</u> (मास्टर ट्रेनर्स) : १) विनायक चव्हाण २) व्ही. के. पंडित ३) जी. एस गारोडी.

**'मूल्यवर्धन हे समाजमन स्वच्छ करण्याचे साधन' – शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती जाधव**

हिंगोली जिल्ह्यातील <u>वसमत तालुक्यातल्या पांगरासती येथे गुरुवार, दि.२९ डिसेंबर, २०१६ रोजी जि. प. प्रा. शाळेत</u> मूल्यवर्धन कार्यक्रम आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला सुरुवात होण्यापूर्वीच मुख्य कार्यकारी अधिकारी मा. डॉ. एच. पी. तुम्मोड साहेब उपस्थित होते. तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. देशमुख, जिल्हा शिक्षणाधिकारी श्री. दीपक चवने, वित्त अधिकारी श्री. हिवाळे, गट विकास अधिकारी श्री. अमर माने, शांतिलाल मुथ्था फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शांतिलाल मुथ्था उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत श्याम संगेवार यांनी प्रशिक्षित केलेल्या लेझीम पथकाच्या सादरीकरणाद्वारे झाले.पांगरासती शाळेचे मुख्याध्यापक श्री. इंगोले यांनी शाळेने मूल्यवर्धन कार्यक्रमाबाबत केलेल्या प्रगतीची माहिती दिली. श्री. पांडुरंग लांडगु यांनी प्रास्ताविकात केंद्राबाबत व केंद्रातील मूल्यवर्धन कार्यक्रमाबाबत माहिती दिली.

श्री. शांतिलाल मुथ्था यांनी यावेळी शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख यांच्यासमोर विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. त्यांनी विद्यार्थ्यांना सभेत अनेक प्रश्न विचारले व विद्यार्थ्यांनीही त्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. विद्यार्थ्यांमध्ये मूल्यवर्धन कार्यक्रमाबाबत उत्साह दिसून आला. मुथ्था यांनी मूल्यवर्धन शिक्षकांना त्यांचे अनुभव सभेमध्ये मांडण्याची विनंती केली. त्यावेळी सर्वच शिक्षक आपले अनुभव सांगण्यास उत्सुक होते. सौ. राम दिनवार मॅडम, श्री. मुंढे, श्री. संगेवार, सौ. मेहजबिन या मोजक्या शिक्षकांनी आपले अनुभव सांगितले. मूल्यवर्धनचे प्रशिक्षण इतर प्रशिक्षणापेक्षा खूप सोप्या भाषेत असल्यामुळे ते घेताना त्यांना खूप आनंद वाटला. हे प्रशिक्षण घेतल्यावर तीन महिने त्यांनी उपक्रम घेतले व त्यानंतर केंद्रातील इतर शिक्षकांना त्यांनी प्रशिक्षण दिले. ते शिक्षकही चांगल्यारितीने उपक्रम आयोजित करीत आहेत. **शिक्षकांना मूल्यवर्धन उपक्रम घेताना खूप आनंद वाटतो. मुलांच्या वर्तणुकीत फरक पडल्याचे लक्षात येत आहे. मुले आनंदी व उत्साही झाली असून मूल्यवर्धन तासाची वाट पाहतात व उपक्रमांना चांगला प्रतिसाद देतात. एकूणच मुलांनी मूल्यवर्धन व्यवस्थितपणे आत्मसात केल्याचे दिसून आले.** जिल्हा शिक्षणाधिकारी श्री. चवने यांनी मूल्यवर्धनच्या चाललेल्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच, जिल्ह्यात हा कार्यक्रम घेऊन जाण्यासाठी प्रयत्न करू व चांगले शिक्षक प्रशिक्षणासाठी पाठवू. या प्रशिक्षणाने जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षकांना व विद्यार्थ्यांना खूप फायदा होईल, असे सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. तुम्मोड यांनी आपल्या भाषणात मूल्यवर्धन कार्यक्रमाविषयी समाधान व्यक्त करताना मूल्यवर्धन संपूर्ण जिल्ह्यात घेऊन जाण्यासाठी आम्ही सहकार्य करू, असे सांगितले. जवळजवळ तीन तास मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. तुम्मोड यांनी मूल्यवर्धन कार्यक्रम समजून घेण्यासाठी दिले. यावेळी सौ. जाधव मॅडम व श्री. ढोरे सर यांचा सत्कार डॉ. तुम्मोड यांच्या हस्ते करण्यात आला.

**''समाजामध्ये ज्या मूल्यांची आवश्यकता आहे, घटनेतील जे मूल्य विकसित करण्याची गरज आहे, ते मूल्य अशा उपक्रमातून रुजत असते व यामुळे जिल्हयाचा विकास घडेल'' असा विश्वास शिक्षणाधिकारी श्री. चवने यांनी व्यक्त केला. शिक्षणविस्तार अधिकारी श्रीमती जाधव या मत व्यक्त करताना म्हणाल्या, ''मूल्यवर्धन हे समाजमन स्वच्छ करण्याचे साधन आहे, या उपक्रमामुळे समाजात सकारात्मक गोष्टी पोहचत आहेत व यामुळे हा उपक्रम पूर्ण तालुक्यात विस्तार होण्यासाठी सहकार्य करेन.''**

या वेळी शांतिलाल मुथ्था फाउंडेशनचे प्रकाशचंद सोनी, झुंबरलाल मुथ्था, राजेंद्र पोखरणा, धरमचंद गंगवाल, जि.प. सदस्य अनिल कदम, सरपंच शामराव कदम, तालुक्यातील केंद्रप्रमुख श्री. साखरे, श्री.ताटे, श्री.आय.डी शेख, पालक व इतर मान्यवर उपस्थित होते.

तसेच श्री. पवळे, श्री. गारोडे, श्री. कदम, श्री. गायकवाड, सौ. पवार, किन्होळा शाळेचे श्री. भोसले, श्री. विनायक चव्हाण, श्री. पंडित, श्री. अनिल राऊत यांनी परिश्रम घेतले. केंद्रीय मुख्याध्यापक श्री. भोसले, श्री.गजानन हलगे, श्री. तीलकरी सर, श्री.

महेंद्र काळे आणि केंद्रातील सर्व शिक्षक यांनी मोलाचे सहकार्य केले. त्यामुळे कार्यक्रम योग्य रीतीने पार पडला. श्री. चव्हाण सर यांनी सूत्र संचालन केले.

## १४. अमरावती

जि. अमरावती, ता. भातकुली, केंद्र– आसरा

शाळेचे नाव – जि.प.प्रा.शाळा, आसरा.

बुधवार दि.१६/११/२०१६, वेळ–स. ९ वा.

केंद्रातील शाळा :१०, प्रशिक्षित शिक्षक : ३७

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स) : १) स्मृती बाबरेकर २) कीर्ती देशमुख ३) साधना बेलखेडे ४) स्वाती आखरे

**अमरावती जिल्ह्यात विविध तालुक्यांमध्ये मूल्यवर्धन कार्यक्रम सुरु करण्याची मागणी**

मूल्यवर्धन अंमलबजावणी संदर्भातील करार महाराष्ट्र शासन व शांतिलाल मुथ्था फाउंडेशन यांच्यामध्ये दि. १६ नोव्हेंबर २०१५ रोजी झाला. १६ नोव्हेंबर, २०१६ रोजी या घटनेला एक वर्ष पूर्ण झाले आहे. हे निमित्त साधून अमरावती जिल्ह्याच्या आसरा केंद्रातील शाळांमध्ये जाऊन श्री. शांतिलाल मुथ्था यांनी मूल्यवर्धन कार्यक्रमाची आढावा बैठक घेतली. त्यामध्ये केंद्रप्रमुख सौ. स्मृती बाबरेकर, मुख्याध्यापक श्री. अशोक कुऱ्हाडे, प्रशिक्षक श्री. निखिल सवाई, सौ. किर्ती देशमुख, कु. मीना इंगळे, सौ. साधना बेलखेडे, सौ. पोकळे, सौ. भालचक्र, सौ. साधना देशमुख, आसरा केंद्रातील मूल्यवर्धन उपक्रमाची अंमलबजावणी करणारे सर्व शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, काही पालक व जिल्हा समन्वयक श्री. बी. के. चेडे या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीमध्ये अडीच तास सविस्तर चर्चा झाली. **सर्व प्रशिक्षक, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक यांनी मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबतचे आपले अनुभव सविस्तरपणे बैठकीत सांगितले. मूल्यवर्धन कार्यक्रमाचा सकारात्मक परिणाम शिक्षक व विद्यार्थ्यांवर होत आहे, त्यामध्ये विद्यार्थी व शिक्षकांचे नाते हे खूप मैत्रीचे होणे, शाळेत आनंदी वातावरण निर्माण होणे, शिक्षणामध्ये रुची निर्माण होणे, याबरोबरच शिक्षकांना इतर विषय शिकविताना मूल्यवर्धनच्या बालकेंद्री शिक्षण पद्धतीचा उपयोग करून घेता येत आहे. इतर सर्व विषयांशी मूल्यवर्धन कृतींची जोड लावल्यामुळे हे विषय शिकविणे सोपे होत आहे. एकूणच हे उपक्रम शिक्षण पद्धतीतील परिवर्तनाचा भाग आहे. मूल्यवर्धन हा एक खूप चांगला कार्यक्रम असून त्याची व्याप्ती वाढविली पाहिजे व तो अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविला जावा, असे मत सर्वांनी व्यक्त केले. या बैठकीत उपस्थित सर्वांना मूल्यवर्धनच्या चित्रफीती दाखविण्यात आल्या. एकूणच सर्वांमध्ये मोठा उत्साह दिसून आला.**

या बैठकीनंतर श्री. शांतिलाल मुथ्था यांनी इयत्ता पहिली, दुसरी व तिसरीच्या विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला. प्रत्येक वर्गात गेल्यावर काहीही न बोलता फक्त हात वर केल्यावर सर्व विद्यार्थ्यांनी क्षणात शांत होऊन शांतता संकेताचे पालन केले. यावरून मूल्यवर्धन उपक्रमातील कृती विद्यार्थ्यांपर्यंत चांगल्या पद्धतीने पोहोचत आहेत, असे निदर्शनास आले. शिक्षकांनी घेतलेल्या निरनिराळ्या उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना विचारली असता, सर्वच विद्यार्थी उत्तर देण्यास उत्सुक असल्याचे दिसून आले.

यानंतर शांतिलाल मुथ्था यांनी या केंद्रातील जसापूर या शाळेस भेट दिली. तेथे मूल्यवर्धन सुरू होऊन १–२ महिनेच झाले आहेत. तेथेही केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, प्रशिक्षक, आसरा केंद्रातील मूल्यवर्धन शिकविणारे सर्व शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व काही पालक या बैठकीला उपस्थित होते. थोडक्यात, मूल्यवर्धनची त्या शाळेतील माहिती समजून घेऊन, छोट्या शाळासुद्धा मूल्यवर्धनकडे कोणत्या दृष्टीकोनातून पाहतात, याचे निरीक्षण केले.

अमरावती शहरामध्ये मुथ्था यांनी जिल्हाधिकारी श्री. किरण गिते यांची भेट घेऊन मूल्यवर्धनबद्दलची विस्तृत माहिती त्यांच्या सहकाऱ्यांना दिली. तसेच अमरावती जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांचीही मुथ्था यांनी भेट घेतली व त्यांना आसरा केंद्रात चालू असलेल्या मूल्यवर्धन कार्यक्रमाची माहिती दिली. मूल्यवर्धनची माहिती करून घेतल्यानंतर त्याचे विस्तारीकरण करण्यासाठी काय नियोजन केले पाहिजे, याबद्दल त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली. यावेळी शांतिलाल मुथ्था यांनी आसरा केंद्रामध्ये मूल्यवर्धन चालू आहे, त्या जवळील भातकुली तालुक्यामध्ये मूल्यवर्धन सुरु करण्यास चांगली परिस्थिती आहे, असे सांगितले. तसेच अमरावती जिल्ह्यातील मेळघाटमधील धारणी तालुक्यातील एका केंद्रामध्ये मूल्यवर्धन सुरु करण्यात आले आहे. मेळघाट परिसरात कुपोषणाची समस्या वर्षानुवर्षे गंभीर आहे. शांतिलाल मुथ्था यांनी १९९७ साली मेळघाट

परिसरातील ३२५ आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पुण्यात आणले होते. त्यांचे इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करण्यात आले होते. तेव्हापासून दरवर्षी इयत्ता पाचवीमध्ये शिकत असलेल्या मेळघाट व ठाणे–कोसबाड या आदिवासी परिसरातील ७०–७५ विद्यार्थ्यांना पुणे येथे शैक्षणिक पुनर्वसनासाठी आणले जाते. आतापर्यंत १५०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांचे संपूर्ण शिक्षण पुणे येथील वाघोली शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पात करण्यात आले आहे. धारणी तालुक्यातसुद्धा मूल्यवर्धन सुरु व्हावे, असे पत्र धारणी तालुक्याचे शिक्षणाधिकारी यांच्याकडून शांतिलाल मुथ्था यांना दोन वेळा आले आहे. त्यामुळे सदर तालुका मूल्यवर्धनसाठी त्वरित निवडू शकतो का, यावर चर्चा झाली.

सुप्रसिद्ध अभिनेते श्री. आमीर खान यांच्या पानी फाउंडेशन बरोबर महाराष्ट्रातील दुष्काळमुक्त अभियानामध्ये श्री. शांतिलाल मुथ्था कार्यरत आहेत. या अभियानांतर्गत वरुड तालुक्यात मोठ्याप्रमाणावर कार्य सुरु आहे. त्यामुळे मूल्यवर्धन कार्यक्रम वरुड तालुक्यात सुरु केला जावा, यावरही विचार विनिमय झाला. अमरावती जिल्हा परिषदचे मुख्यकार्यकारी अधिकारी मा. डॉ. किरण कुलकर्णी यांच्याबरोबर भातकुली, धारणी व वरुड या तीन तालुक्यांत मूल्यवर्धन कार्यक्रम सुरु करण्याबाबत सविस्तर चर्चा झाल्यानंतर त्यांनी येत्या काही दिवसांत जिल्हा शिक्षणाधिकारी, संबंधित तालुक्याचे शिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख यांची बैठक घेण्याचे सूचित केले. या बैठकीत कोणकोणते अधिकारी व शिक्षक मूल्यवर्धन कार्यक्रम स्वीकारण्यास स्वेच्छेने तयार होतील, याची चाचपणी करू, सध्या चालू असलेल्या आसरा केंद्रातील मूल्यवर्धन कार्यक्रमाचा आढावा घेऊ आणि, त्यानंतर प्रशिक्षकांची उपलब्धता पाहून जिल्ह्यामध्ये मूल्यवर्धन विस्तारीकरणासाठी येत्या २–३ महिन्यांत या तीनही तालुक्यासंदर्भात योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांनी नमूद केले.

या सर्व बैठकीनंतर श्री. शांतिलाल मुथ्था यांनी अमरावती येथे पत्रकार परिषद घेऊन मूल्यवर्धन कार्यक्रमाची विस्तृत माहिती पत्रकारांना दिली. पत्रकारांनी अनेक प्रश्न विचारून मूल्यवर्धन कार्यक्रमासंदर्भात सखोल माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला आणि हा दौरा करत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. अशा पद्धतीने, उद्दिष्टे समोर ठेवून केलेला अमरावती जिल्ह्याचा मूल्यवर्धन दौरा सफल झाला. या सर्व संबंधितांनी चांगले सहकार्य केल्याबद्दल मुथ्था यांनी शिक्षक, पालक, केंद्रप्रमुख, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व पत्रकार यांचे आभार मानले.

## १५. अकोला

जि. अकोला, ता. अकोला, केंद्र – शिवर

शाळेचे नाव –जि. प. उच्च प्राथमिक शाळा, कुंभारी

मंगळवार दि. २१ फेब्रुवारी २०१७, वेळ–स. ९.०० वा.

केंद्रातील शाळा :१० ;  प्रशिक्षित शिक्षक : ४१

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स) : १)भारती बद्दुरकर २) साहेबराव पातोंड ३) श्रीकृष्ण दाबलकर

**योग्य आचरणासाठी मूल्यवर्धन उपयोगी –जी, श्रीकांत, जिल्हाधिकारी**

अकोला जिल्ह्यातल्या शिवर केंद्रातील कुंभारीच्या जि. प. उच्च प्राथमिक शाळेत मंगळवार, दि. २१ फेब्रुवारी २०१७ रोजी मूल्यवर्धन कार्यक्रम आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीनिमित्त विद्यार्थ्यांनी जय्यदत तयारी केली होती. लेझीम, ढोल– ताशांच्या गजरात विद्यार्थ्यांनी मुथ्था फाउंडेशनचे शांतिलाल मुथ्था यांचे स्वागत केले. वेगवेगळ्या प्रसिद्ध सामाजिक, राजकीय व्यक्ती, संत आदींच्या वेशभूषा करून लहान मुले दुतर्फा उभी होती. नंतर सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन झाल्यानंतर १५ विद्यार्थिनींनी मंगळागौरीचे खेळ सादर केले. इ. तिसरीच्या मुलांनी संत गाडगेमहाराजांचा जीवनपट अभिनयाद्वारे उलगडून दाखवला. त्यानंतर मुथ्था यांनी गटचर्चा घेतली. इ दुसरीच्या विद्यार्थ्यांनी गाण्याच्या रूपात घरातील नाती सांगितली. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी वर्गनियम स्वतः तयार केल्याचे सांगून दप्तरातल्या वस्तूंची काळजी घेतली नाही तर त्या वस्तूंना काय वाटेल हे सांगितले. तर पहिलीच्या वर्गातल्या एका मुलीने आजीचा वेश करून वर्गातल्या मुलांना खेळातून अवयवांची माहिती करून दिली.

**एका मुलाचे वडील वारल्यानंतर तो आईला उद्धट बोलायचा, मारायचा, पण मूल्यवर्धन उपक्रमांमुळे त्याच्यात बदल झाला. त्याची वागणूक सुधारली आणि आदर्श विद्यार्थी पुरस्कार त्याला मिळाला. आता सध्या शाळेत तो पर्यावरणमंत्री म्हणून काम पाहतो, अशी माहिती मिळाली.**

मुलांशी संवाद साधल्यानंतर मुथ्था यांनी शिक्षक– पालकांना मूल्यवर्धन कार्यक्रमाची आवश्यकता सांगितली. आज बाह्य वातावरण चांगले राहिलेले नाही, अशा वेळी आजची लहान मुले उद्याची जबाबदार आणि चांगली नागरिक बनावीत या हेतूने मूल्यवर्धन कार्यक्रम आखला, असे सांगून मुथ्था पुढे म्हणाले, ''ज्ञानरचनावादावर आधारित, भीतीमुक्त, बालस्नेही वातावरणात मूल्यवर्धन रुजविणे महत्त्वाचे ठरणार आहे. लहानपणापासूनच मुलांना स्वतः विचार करण्याची, दुसऱ्याचे विचार ऐकून व समजून घेण्याची सवय मूल्यवर्धनमुळे लागेल आणि मोठी झाल्यावर हीच मुले जबाबदार नागरिक म्हणून पुढे येतील. त्यासाठी मुलांना संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत आणि ही मुले मूल्ये कशी अंगिकारतील हे पहिले पाहिजे.''

यावेळी अकोल्याचे जिल्हाधिकारी जी. श्रीकांत (भाप्रसे) यांनी स्वतः कर्नाटकमधून आलेले असूनही मराठीत उत्तम भाषण करून उपस्थितांची मने जिंकली. ''मुथ्था यांनी सुरु केलेला मूल्यवर्धन कार्यक्रम हा थँकलेस जॉब आहे कारण मूल्य रुजवण हे सोपे काम नाही. मुलांची पहिली शाळा म्हणजे त्यांचे आई–वडील.दुसरी म्हणजे त्याचे शिक्षक–गुरुजी! <u>आपण आज साक्षर झालोत पण सुशिक्षित झालो नाहीत.</u> आपण शिकतो आणि मोठे झाल्यावर आई–वडिलांना घराबाहेर हाकलतो, संपत्तीत बहिणीला हिस्सा नाकारतो, सख्ख्या नातेवाईकांशी नीट बोलत नाही... कुठे चाललोय आपण? आपण शिकलो पण मोठे झालो का? आपल्याला पैसा हवा की आनंद हवा? आपल्याला कोटी रुपये पाहिजेत की आपले आईवडील? मूल्य रुजवणे हे आपले काम आहे. ते स्विकारायचे की नाही हे मुले ठरवतात. पूर्वी सकाळी सगळ्या गावाचे रस्ते स्वच्छ झाडलेले आणि सडारांगोळी केलेले दिसायचे, आता हे दिसत नाही. साधने बरीच असली तरी तुम्ही काय आहात, कसे वागता, कसे राहता हे महत्त्वाचे आहे. मुलांना ही मूल्ये रूजण्यासाठी मूल्यवर्धन कार्यक्रम उपयोगी आहे,'' श्रीकांत म्हणाले.

अकोल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण पुंडलिकराव विधळे म्हणाले, ''मूल्यवर्धन कार्यक्रम हा जि.प. शिक्षकांनी मनावर घेतल्याशिवाय यशस्वी होणे शक्य नाही. मुलांना नीट वाचता, लिहिता, बोलता येते का, हे ही शिक्षक–पालकांनी बघायला हवे'', असे सांगून ते पुढे म्हणाले, ''तुम्ही कितीही शिकलात तरी आयुष्यात शाश्वत मूल्ये महत्त्वाची असतात. राज्यघटनेत सांगितलेली आणि मूल्यवर्धन कार्यक्रमाने स्वीकारलेली मूल्ये ही शाश्वत मूल्येच आहेत. त्याचे संस्कार लहान मुलांवर झाले पाहिजेत.'' जि.प. सदस्य चंद्रशेखर पांडे गुरुजींनी आभार मानले.

## १६. वाशिम

<u>जि. वाशिम , ता. मालेगाव, केंद्र– मारसूळ</u>

<u>शाळेचे नाव</u> – जि. प. उच्च प्राथमिक शाळा,देवठाणा खांब

सोमवार दि. २० फेब्रुवारी २०१७, वेळ – दु. ४ .०० वा.

<u>केंद्रातील शाळा</u> :१३, प्रशिक्षित शिक्षक : ३४

<u>मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती</u> (मास्टर ट्रेनर्स) : १) यू. डी. जोगदंड २) दिलीप गवई

**'आजच्या काळात मूल्यवर्धन महत्त्वाचे'–मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश पाटील**

<u>वाशिम जिल्ह्याच्या मालेगाव तालुक्यात मारसूळ केंद्रातल्या देवठाणा खांबच्या जि. प. उच्च प्राथमिक शाळेत</u> सोमवार दि.२० फेब्रुवारी २०१७ रोजी मूल्यवर्धन कार्यक्रम आढावा बैठक आयोजित केली होती. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश पाटील, शिक्षणाधिकारी, वाशिम अंबादासमानकर, गटशिक्षणाधिकारी, पं. स. मालेगाव राजेंद्र शिंदे, जि. प. सदस्य रत्नप्रभा घुगे, डॉ. घुगे, पं.स. सदस्य अन्नपूर्णा भुरकाडे, सरपंच श्रीमती डाखोरे, उपसरपंच मांगीलाल भोई, केंद्रप्रमुख श्री.गवई, मुख्याध्यापक, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य सरला पवार, जिल्हा समन्वयक शरद थोरात, मुथ्था फाउंडेशनचे संस्थापक शांतिलाल मुथ्था, जिल्हा प्रतिनिधी सुभाष गादिया, अमरीश पारख, अनिश पारख, सकलेचा, इतर पदाधिकारी आणि सर्व शिक्षक व पालक हे मान्यवर उपस्थित होते. यावेळी शांतिलाल मुथ्था यांनी शिक्षक–पालकांशी संवाद साधला आणि शिक्षकांच्या सूचना जाणून घेतल्या.

''सुसंस्कृत नागरिक घडवण्यासाठी मूल्यवर्धनचा उपयोग होत आहे. मूल्यवर्धन माध्यमाद्वारे कृती आधारित शिक्षण देण्याचा प्रयत्न आहे. संविधानातील मूल्ये मुलांमध्ये रुजावीत, त्यांनी ती अंगिकारावीत यासाठी ज्ञानरचनावादानुसार मूल्यवर्धन कार्यक्रमाची रचना केली आहे. आपली मुले फार हुशार आहेत. त्यांना चांगले नागरिक म्हणून पुढे आणण्याची फार मोठी, चांगली संधी शिक्षकांना मिळालेली आहे.'' मुथ्था आपल्या भाषणात म्हणाले .

**एका शिक्षकाने सांगितले, ''आमच्या शाळेच्या मैदानात 'हरवले' आणि 'सापडले' या नावाच्या दोन पेट्या ठेवलेल्या**

**असतात. ज्याची वस्तू हरवली असेल तो त्या वस्तूचे नाव लिहिलेली चिट्ठी हरवलेल्या वस्तूंसाठी असणाऱ्या पेटीमध्ये टाकतो. तर कुणालाही सापडलेली वस्तू 'सापडले' नावाच्या पेटीमध्ये मुले आणून ठेवतात. त्यामुळे मुलांना चांगले वळण लागले आहे. या मुळे जी वस्तू ज्याची आहे त्याला परत मिळण्याची सोय झाली आहे. तसेच सूचना-तक्रारपेटी झाडाला लावलेली असते. त्यात विद्यार्थी आणि शिक्षकही आपल्या सूचना वा तक्रारी लिहून टाकतात. दर सोमवारी आणि गुरुवारी ही पेटी उघडतात. या दोन्ही उपक्रमांमुळे मुलांमध्ये चांगले बदल झाले आहेत.''**

शिक्षकांनी यावेळी मुलांमध्ये झालेले बदल सांगितले. तर वैशाली टेकाडे या शिक्षिकेने शिक्षकांनाही व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण दिले जावे, काही अभ्यासक्रम ॲनिमेटेडस्वरुपात दिल्यास बरे होईल आणि मूल्यवर्धनची पुस्तके आकर्षक रंगात द्यावी, अशा सूचना केल्या. त्यावर मुथ्था यांनी या सूचनांची दखल घेतानाच नोव्हेंबर २०१६ मध्ये मा. मुख्यमंत्र्यांबरोबर झालेल्या बैठकीत रंगीत पुस्तके देण्याचा निर्णय झाला असल्याचे सांगितले.

गट शिक्षणाधिकारी राजेंद्र शिंदे यावेळी बोलताना म्हणाले, ''चांगल्या वाईटातला फरक टेक्नॉलॉजीमुळे कळत नाही, तर, तो मूल्यवर्धन शिक्षणातून कळतो. ज्याचे आचरण चांगले असते तो आचार्य.'' असे सांगून ते पुढे म्हणाले, ''मूल शिकतंय की नाही, शिकत असेल तर काय शिकतंय हे पाहण्याची मोठी जबाबदारी आई, वडील व शिक्षकांची असते. मुलांची संगत काय आहे हे ही त्यांनी पाहिले पाहिजे. आई, वडील आणि शिक्षक कसे वागतात वावरतात याकडे मुलांचे लक्ष असते. आपल्या चांगल्या वागण्याने इतरांना प्रेरणा मिळते, हा विचार करता, देवठाण खांब सारख्या दुर्गम, आदिवासी केंद्रात मूल्यवर्धन कार्यक्रम सुरु झाल्याबद्दल मला समाधान वाटते.

वाशिमचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश पाटील यांनी आजच्या तरुणांच्या स्थितीवर नेमके भाष्य केले, ''आजचा तरुण सुशिक्षित झाला पण तो सुसंस्कृत झाला का, हा प्रश्न मनात आला की, मूल्यवर्धन कार्यक्रमाचे महत्त्व कळते'', असे म्हणाले. ''संविधानातली मूल्ये पहिली तर समता, बंधुता तत्त्व समाजात पसरलंय का, या प्रश्नाचे उत्तर 'नाही' असे द्यावे लागते'', असे ते म्हणाले. शाश्वत मूल्ये जपतानाच मुलांमधील बालपण हरवता कामा नये, हेही त्यांनी सांगितले. यावेळी जि.प. सदस्या रत्नप्रभा घुगे यांचेही भाषण झाले. जोगदंड सरांनी आभार मानले.

## १७. बुलढाणा

जि. बुलढाणा, ता. मोताळा, केंद्र - शेलापूर खुर्द

शाळेचे नाव -जि. प. मराठी प्राथमिक शाळा, शेलापूर (तळणी)

सोमवार दि. २० फेब्रुवारी २०१७, वेळ-स.९.००वा.

केंद्रातील शाळा : १३, प्रशिक्षित शिक्षक : ३२

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स) : १) सुनील बऱ्हाटे २) महेश नाफडे

**'जिल्हा परिषदेचा शिक्षक उत्कृष्ट' - शांतिलाल मुथ्था**

बुलढाण्यात मोताळा तालुक्यातील शेलापूर केंद्रातील तळणी येथील जि. प. मराठी प्राथमिक शाळेजवळच्या सभागृहात मूल्यवर्धन कार्यक्रम आढावा बैठक सोमवार दि. २० फेब्रुवारी २०१७ रोजी झाली. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला हार घालून आणि विद्यार्थिनींच्या स्वागत गीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. सुरुवातीला उपस्थित मान्यवरांना पुस्तके देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

**गेल्यावर्षी इयत्ता चौथीत असलेल्या शेख नावेद शेख सिकंदर या मुलाच्या प्रामाणिकपणाबद्दल त्याचाही सत्कार करण्यात आला. शेख नावेदला रस्त्याने जाताना २४ हजार रुपये रोख असलेली पिशवी सापडली होती. त्याबद्दल त्याने वडिलांना सांगितले व ती पिशवी ज्याची त्याला परत केली. मूल्यवर्धन कार्यक्रमामुळेच हे शक्य झाले, असे त्याने सांगितले.**

**२६ जानेवारी २०१६ पासून मूल्यवर्धन कार्यक्रम इथे राबवण्यास सुरुवात झाली. तेव्हापासून मुलांमध्ये सकारात्मक बदलांना सुरुवात झाल्याचे प्राणकर सरांनी प्रास्ताविकात सांगितले. ही मुले स्वयंप्रेरणेने परिसर स्वच्छता करतात. उत्सवात भाग घेतात आणि मूल्यवर्धनाच्या उपक्रमात आवडीने सहभागी होतात, असेही ते म्हणाले.**

या बैठकीत मुथ्था फाउंडेशनचे शांतिलाल मुथ्था यांनी शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यावेळी ते म्हणाले,

''मूल जन्मल्यापासूनच शिकायला सुरुवात करते. कधी आई–वडिलांकडे पाहून तर कधी शिक्षकांकडे पाहून ते शिकत असते. मूल्यवर्धन हा कार्यक्रम शालेय अभ्यासक्रमाशी निगडीत कार्यक्रम आहे. मूल्य ही माणसाच्या जीवनशैलीशी संबंधित असतात. ती अंगिकारता आली पाहिजेत. ती आचरणात आणणे महत्त्वाचे आहे. सुसंस्कृत असणे जरुरीचे आहे. माझ्या सामाजिक जीवनात मी अनेक वेगवेगळी कामे केली. मूल्यांविषयीचे वास्तव अधिकाधिक चिंताजनक होत चालले आहे . म्हणूनच मुलांच्या संस्कारासाठी उर्वरित आयुष्य वेचण्याचा निर्णय घेतला. मी १२ राज्यांत जि.प. शिक्षकांबरोबर काम केले आहे आणि जि.प. शिक्षक उत्कृष्ट शिक्षक आहे, हे मी खात्रीने सांगतो. मुलांना कृतीच्या माध्यमातून ज्ञानरचनावादाचे तत्व वापरून शिकवणे महत्त्वाचे आहे. माझ्याप्रमाणे दुसऱ्याचेही मत आहे, ते आपण ऐकले पाहिजे, हे मुलांना जोडीचर्चा किंवा गटचर्चेतून समजते. आज याची गरज का, तर मुलांच्या आत्महत्या, खून, पालक, शिक्षक यांचे खून असे प्रसंग पाहिल्यावर मूल्यवर्धन कार्यक्रमाची गरज पटते. आपली मुले सुपर कॉम्प्युटर आहेत. त्यात मूल्यवर्धनरूपी ॲन्टिव्हायरस सॉफ्टवेअर घालणे गरजेचे आहे.''

गटशिक्षणाधिकारी पंढरीनाथ मोरे म्हणाले, ''माणूस घडवण्यासाठी हा कार्यक्रम आवश्यक आहे. शिक्षणाधिकारी एन. के. देशमुख यांनी कुटुंबपद्धती आणि बदलत्या जीवनशैलीमुळे संवाद कमी झाल्याचे सांगितले. अशावेळी मुथ्था सर लहान मुलांमध्ये मिसळतात आणि संवाद साधतात, ही महत्त्वाची गोष्ट आहे. त्यांच्या व्रताला आपण साथ देऊ आणि हा उपक्रम अधिक जोमाने राबवू.''

मलकापूरचे आमदार चैनसुख संचेतींचेही यावेळी भाषण झाले. ते म्हणाले,''मूल्यवर्धनाचा चिमुकल्यांवरचा परिणाम पाहण्यासाठी आपण एकत्र जमलो आहोत. व्यसनमुक्त समाज निर्माण करण्याची मुथ्था यांची इच्छा आहे. आज समाजात दोष दूर करणाऱ्यांची संख्या कमी आहे. ज्याला समज आहे तोच समाजात बदल घडवू शकतो. उदात्त विचार, कथनी–करणी एक असलेला समाज आपल्याला हवा आहे. त्यासाठी मूल्यवर्धन शिक्षणप्रणाली मुलांमध्ये बिंबवण्याचं काम करू अशी शपथ घेऊन जा.''

यावेळी उपस्थितांना मूल्यवर्धनशी संबंधित २–२ मिनिटांचे २–३ व्हिडीओज दाखवले. यावेळी पालक व शिक्षकांनी मूल्यवर्धनविषयीचे आपले अनुभव सांगितले. सूत्रसंचालन स्वप्ना पांडव यांनी केले. सुनील बऱ्हाटे, महेश नाफडे, आघाव यांनी सीडी सादरीकरण,उपक्रम सादरीकरण आदी, तर आभार प्रदर्शन बाहेकर सरांनी केले.

## १८. यवतमाळ

जि. यवतमाळ, ता. बाभूळगाव, केंद्र– कोल्ही

शाळेचे नाव –जि. प. उच्च प्राथमिक डिजिटल शाळा, पिंपळखुटा

मंगळवार, दि. २१ फेब्रुवारी, २०१७, वेळ–दु. ४ .००वा.

केंद्रातील शाळा : १२, प्रशिक्षित शिक्षक : ३१

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स): १) पुंडलिक चंदनखेडे २) प्रशांत खैरनार ३) मारुती झाडपाटे

**'लोकशाहीभिमुख नागरिक घडविणे हेच मूल्यवर्धन कार्यक्रमाचे साध्य व कार्य' – मुख्याध्यापक नितीन मोरे**

पिंपळखुटा येथील जि.प. उच्च प्राथमिक डिजिटल शाळेत मूल्यवर्धन कार्यक्रम आढावा बैठक मंगळवार दि. २१ फेब्रुवारी २०१७ रोजी दु. ४ वाजता झाली. बैठकीला शिक्षणाधिकारी डॉ. सुचिता पाटेकर, गटशिक्षणाधिकारी मधुसूदन बांडे, केंद्रप्रमुख कुंडलिक चंदनखेडे, मुख्याध्यापक नितीन मोरे, शालेय व्यवस्थापन समितीअध्यक्ष सतीश नागपुरे, शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष नरेश पवार, सरपंच सुधाकर होपटे, मुथ्था फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शांतिलाल मुथ्था, जिल्हा प्रतिनिधी, इतर पदाधिकारी आणि सर्व शिक्षक व पालक उपस्थित होते.

**मुख्याध्यापक नितीन मोरे यांनी स्वागतपर भाषण केले. यावेळी ते म्हणाले,''अपेक्षित वर्तन बदलांचा आढावा घेण्यासाठी ही बैठक होत आहे. मूल्य शांततेतून फुलते हे आपल्याला माहीत आहे. संविधानातील चार मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजावीत आणि लोकशाहीभिमुख नागरिक तयार व्हावा हेच मूल्यवर्धन कार्यक्रमाचे साध्य व कार्य आहे. मूल्यवर्धन तासिकांना आवडीचे खेळ खेळू देण्यातून शाळेतील उपस्थिती १००% झाली. मुलांमधील वर्तनबदल आम्हालाही दिसून आला. शाळेसमोरची बाग मुलांनी तयार केली आणि त्या झाडांचे संगोपनही मुलेच करत आहेत. कुणी खेळताना पडलं तर शाळेतल्या ज्या मुलाने आधी पहिले असेल तो त्याला उचलायला आधी धावतो. 'हा माझ्या वर्गात नाही मग कशाला मदत करू', असा विचारही कुणी करत नाही.''**

केंद्रप्रमुख चंदनखेडे म्हणाले, ''लोकशाहीचा जबाबदार, कर्तबगार नागरिक निर्माण व्हावा हे मूल्यवर्धन कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी मुथ्था सरांनी उत्कृष्ट अभ्यासक्रमाची निर्मिती केली आहे. निरीक्षकांनीही मुलांमधील बदल अनुभवला आहे .''

यानंतर मुथ्था सरांनी उपस्थितांशी संवाद साधला. ''मूल्य शिकवले जाऊ शकत नाही, ते अंगिकारले जाते. शाळेचे शिक्षण मूल्याधिष्ठित व्हावे, हा उद्देश यामागे आहे. समोरची परिस्थिती बघून काय चांगले, काय वाईट हे मुले ठरवतात. त्यांना व्यक्त करण्याची संधी देऊ, तेव्हाच ते त्यांच्या ब्रेनचा वापर करतात.'' असे सांगून मुथ्था यांनी स्वतःच्या सामाजिक कार्याची माहिती दिली. ''दीर्घकालीन फायदे होण्यासाठी मी जि.प. च्या ८५% शाळांसाठी मेहनत करेन, आपली मुले सुपर कॉम्प्युटर आहेत. त्यांचा मेंदूचा चांगला राहण्यासाठी आपण मूल्यवर्धनरूपी ॲन्टीव्हायरस टाकणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी प्रयत्न करत राहणे गरजेचे आहे. जि.प.चे शिक्षक अत्यंत सक्षम आहेत.''

शिक्षणाधिकारी डॉ. सुचिता पाटेकर यांचे ही भाषण चांगले झाले. मूल्यवर्धन कार्यक्रम जिल्ह्यात राबवण्यासाठी आपण पुढाकार घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. गट शिक्षणाधिकारी बांडे यांनी मूल्यवर्धनामुळे मुलांमध्ये झालेल्या चांगल्या बदलांची उदाहरणे दिली आणि सर्वांनी मिळून पुढे जाण्याची समज मुलांमध्ये आल्याचे सांगितले.

यावेळी केंद्रप्रमुख, मास्टर ट्रेनर्स, शिक्षिका,शिक्षक, पालक यांनीही आपले अनुभव सांगितले. तत्पूर्वी मुथ्था यांनी विद्यार्थ्यांकडून मूल्यवर्धन उपक्रम करवून घेतले आणि त्यांच्याशी संवाद साधला.

## १९. नाशिक

जि. नाशिक, ता. इगतपुरी, केंद्र– घोटी २

शाळेचे नाव – जि.प.प्रा.शाळा मुलींची क्र.१

बुधवार, दि. ४/१/२०१७, वेळ–स.११वा.

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स) : १) चैताली चंद्रमोरे २) अशोक मोरे ३) अकबर शेख

केंद्रातील शाळा : १३, प्रशिक्षित शिक्षक : ३२

**'मूल्यवर्धन ही जादूची कांडी'– अलका जाधव**

मूल्यवर्धन ही जादूची कांडी असून त्यामुळे भावी पिढी चांगली तयार होणार असल्याचे मत जि.प.सदस्या अलका जाधव यांनी व्यक्त केले. नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातल्या घोटीमध्ये बुधवार दि. ४ जानेवारी २०१७ रोजी मूल्यवर्धन उपक्रम आढावा बैठक झाली त्यावेळी त्या बोलत होत्या.

मूल्यवर्धन उपक्रम मुलांनी व शिक्षकांनी मनापासून आत्मसात केला आहे आणि लोकशाहीचा जबाबदार नागरिक घडविण्यासाठी मूल्यवर्धन उपक्रम हे प्रभावी साधन आहे म्हणून हा दैनंदिन शालेय प्रक्रियेतील भाग व्हावा आणि संपूर्ण तालुक्यात सुरु करावा, अशी अपेक्षा गटशिक्षणाधिकारी शिवाजी अहिरे यांनी व्यक्त केली.

**''पुण्यातील प्रशिक्षण आगळेवेगळे होते, प्रशिक्षण बोजड असेल असे वाटले होते. पण प्रत्यक्षात खूप चांगले होते, मूल्यवर्धन हे आपल्या अभ्यासक्रमाला पूरक असून हा एक युनिक (आगळावेगळा) उपक्रम आहे. शांतता संकेत परिणामकारक आहे. मुलांना मार्ग दाखविण्याचे काम आम्ही शिक्षक करीत असतो'', मूल्यदूत अशोक रामराव मोरे म्हणाले. ''मूल्यवर्धनमुळे शाळा शिक्षकांच्या जवळ येत आहे व पालक शाळेच्या जवळ येत आहेत. मुलांना मूल्यवर्धन उपक्रमांमुळे खूप आनंद वाटतो, ह्या उपक्रमांमुळे विद्यार्थी–शिक्षक संबंध सुधारले'', मूल्यदूत चैताली चंद्रमोरे म्हणाल्या.**

**''देशामध्ये प्रथमच जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षकांनी उपक्रम लिहिले. एक पिढी घडविण्यासाठी खूप काम करावे लागते. शासनाला नावे ठेवण्यापेक्षा किंवा त्यांच्यावर टीका करण्यापेक्षा शासनाला मदत करणे महत्त्वाचे आहे. शाळेच्या वातावरणात व प्रक्रियेत बदल करून भारताचा संवेदनशील व जबाबदार नागरिक घडवायचा असेल तर सांविधानिक मूल्ये मुलांमध्ये रुजली पाहिजेत. मूल्यवर्धन हा उपक्रम शांतिलाल मुथ्था फाउंडेशनचा नसून महाराष्ट्र शासनाचा आहे व तो शालेय अभ्यासक्रम म्हणून राबविला जाईल.'', मूल्यवर्धन उपक्रमाचे प्रणेते शांतिलाल मुथ्था म्हणाले.**

तत्पूर्वी, मुथ्था यांनी इयत्ता पहिली ते तिसरीच्या वर्गांना भेटी दिल्या आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधला. आढावा बैठकीच्या वेळी विद्यार्थिनींनी मंगला धोंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली 'मला मुलगी हवी ग बाई' ही लघुनाटिका सादर केली. यावेळी मुथ्था यांनी

विद्यार्थी, पालक, शिक्षकांचे या उपक्रमाबाबतचे अनुभव जाणून घेतले.

घोटी केंद्रप्रमुख अकबर शेख यांनी केंद्रातील ४२ शिक्षक व ११०० विद्यार्थी मूल्यवर्धन उपक्रमामध्ये सहभागी असल्याचे नमूद केले. उर्दू शाळेच्या मुख्याध्यापिका सय्यद शहजाद यांनी उर्दू शाळेतील मुलांची पटसंख्या व उपस्थिती वाढण्यास मूल्यवर्धन उपक्रमामुळेच मदत झाली असे सांगून उर्दू शाळेसाठी उर्दू भाषेत पुस्तिका मिळावी अशी विनंती केली. सध्या घोटीतील इंग्रजी व उर्दू माध्यमाच्या काही शाळांनी मराठी उपक्रम पुस्तिकांचे इंग्रजी आणि उर्दूत भाषांतर करून आपापल्या शाळांमध्ये उपक्रम घेणे सुरु केले आहे. शांतिलाल मुथ्था यांनी वरील सर्व बाबींची पूर्तता लवकरच करणार असल्याचे आश्वासन दिले.

मूल्यवर्धन उपक्रम अतिशय चांगला व भावी पिढी घडविण्यास मदत करणारा आहे, असे भिला तात्या आहेर यांनी सांगितले. अशोक मोरे, चैताली चंद्रमोरे, सांबरे, तोरवणे, गितांजली परदेशी, मंगला धोंडगे, स्नेहलता शिंपी, विद्या देवरे या सर्वांनी उपक्रमाचे फायदे व ते इतर विषयाशी कसे निगडीत आहेत हे सांगितले. इयत्ता पाचवी ते आठवीपर्यंत मूल्यवर्धन उपक्रम सुरु करावा अशी मागणी काही शिक्षकांनी केली. पालकांनीही स्वतःत आणि पाल्यांमध्ये सकारात्मक बदल झाल्याचे सांगितले. शाळेच्या मुख्याध्यापिका स्मिता गोसावी यांनी सर्वांचे स्वागत केले. तसेच केंद्रप्रमुख अकबर शेख यांनी आभार मानले.

## २०. जळगाव

जि. जळगाव, ता. जळगाव, केंद्र – शिरसोली

शाळेचे नाव – जि.प.प्रा.शाळा, शिरसोली प्र.न.

शुक्रवार दि. १३ /१/२०१७ वेळ– स. ११ वा.

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स) : १) डी. एन. ठाकूर २) राजेंद्र पाटील ३) निलेश दुसे

केंद्रातील शाळा : ९, प्रशिक्षित शिक्षक : ३३

**'आजच्या शिक्षणपद्धतीशी मूल्यवर्धन उपक्रम सुसंगत'**

**–रविकिरण बिऱ्हाडे, शिक्षण विस्तार अधिकारी**

जळगाव जिल्ह्यात शिरसोली(प्र.न.) इथे जि.प.च्या प्राथमिक शाळेत मूल्यवर्धन कार्यक्रम आढावा बैठक शुक्रवार दि.१३ जानेवारी २०१७ रोजी झाली. मूल्यवर्धन कार्यक्रम आजच्या शिक्षणपद्धतीशी सुसंगत असून तो संपूर्ण तालुक्यात राबवण्यासाठी सज्ज असल्याचे जळगाव पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी रविकिरण बिऱ्हाडे यांनी मूल्यवर्धन उपक्रमाच्या आढावा बैठकीत सांगितले. ते पुढे म्हणाले,''मूल्यवर्धन आढावा बैठक हा दिवस शिरसोली केंद्रासाठी ऐतिहासिक दिवस असून मूल्यवर्धनमुळे शिक्षकांना व विद्यार्थांना खूप उर्जा मिळाली आहे. **हा उपक्रम ज्ञानरचनावादाला सुसंगत आहे. त्याचा शाळेच्या वर्ग व्यवस्थापनाला व अध्यापन पध्दतीला निश्चित फायदा होईल.** जि.प.प्रा.शाळा, शिरसोली प्र.न. इथे झालेल्या या बैठकीला शांतिलाल मुथ्था फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शांतिलाल मुथ्था, जैन उद्योग समूहाचे अशोक जैन, अनुभूती शाळेच्या निशा जैन, मुथ्था फाउंडेशनचे राज्यपदाधिकारी विनय पारख, केंद्रप्रमुख डी.एन.ठाकूर तसेच मूल्यवर्धन उपक्रम सुरू असणाऱ्या शिरसोली केंद्रांतर्गत नऊ शाळांचे शिक्षक आणि मुख्याध्यापक तसेच पालक उपस्थित होते. केंद्रप्रमुख ठाकूर यांनी उपक्रमाचा आढावा घेतला आणि सेवानिवृत्तीनंतर संपूर्ण वेळ मूल्यवर्धनसाठी देणार असल्याचे सांगितले. मूल्यवर्धन उपक्रम केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे तर शिक्षक, पालकांसाठीही उपयोगी असल्याचे मत यावेळी सर्व शिक्षिकांनी व्यक्त केले.

**जैन उद्योग समूहाचे अध्यक्ष श्री. अशोक जैन म्हणाले, ''जैन कंपनीत काम करणारे कामगार हे याच परिसरातील आहेत. मूल्यवर्धन कार्यक्रमामुळे त्यांच्या मुलांवर चागले संस्कार होतील. हा उपक्रम वर्गात जाऊन प्रत्यक्ष पाहण्याची संधी मला मुथ्था साहेबांमुळे मिळाली. मूल्यवर्धन उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षकांविषयी आदर दिसत आहे, ही खूप चांगली गोष्ट आहे आणि राज्यशासनाने हा उपक्रम राबवण्याचे ठरवले, ही एक ऐतिहासिक घटना आहे. शिक्षण आणि शैक्षणिक कामात मूल्यवर्धन उपक्रमाचा खूप मोठा वाटा आहे. मूल्यवर्धन उपक्रम हा एक पाया आहे. पाया जर मजबूत असेल तर त्यावरची इमारत खूप मजबूत असेल. मूल्यवर्धनमुळे मुलांचे जीवन घडविण्याचे काम होणार आहे. त्यामुळे आपणाला आत्मिक समाधान लाभेल. मुलांच्या व मुलींच्या मनामध्ये पूर्वी जो शिक्षकांविषयी आदर होता तो आदर नक्कीच मूल्यवर्धनमुळे पुन्हा दिसेल. हे उपक्रम पाहून खूप आनंद वाटला.''**

''मूल्यवर्धन उपक्रम राबवला जात आहे, ही चांगली गोष्ट आहे, कारण शिक्षकच समाज घडवत असतात'', असे निशा जैन म्हणाल्या सांगितले. प्रास्ताविक राजेंद्र पाटील आणि सूत्रसंचालन पूनम बागुल यांनी केले. गणेश बागुल यांनी आभार मानले.

## २१. धुळे

जि. धुळे, ता. सिंदखेडा, केंद्र – निमगूळ

शाळेचे नाव – जि.प.प्रा.शाळा, झिरवे

गुरुवार दि.१२ /१/२०१७, वेळ– दु. ३ वा.

केंद्रातील शाळा : ८ प्रशिक्षित शिक्षक : ३३

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स): १) जगन वाडिले २) भालचंद्र पाटील ३) दीपक पाटील

**'मूल्यवान नागरिक घडविणारे मूल्यवर्धन' – भालचंद्र पाटील**

धुळे जिल्ह्यात सिंदखेड तालुक्यातल्या झिरवे गावातल्या जि. प. प्रा. शाळेत मूल्यवर्धन कार्यक्रमाची आढावा बैठक गुरुवार दि. १२ जानेवारी २०१७ रोजी झाली. या बैठकीला शांतिलाल मुथ्था फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शांतिलाल मुथ्था, एसएमएफ चे राज्य पदाधिकारी मा.दिलीप कांकरिया, डॉ.कांतिलाल टाटिया, हरकचंद बोरा, मूल्यवर्धन उपक्रमाचे सर्व शिक्षक, केंद्रप्रमुख भालचंद्र पाटील, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य आणि पालक उपस्थित होते.

मूल्यवर्धन उपक्रम मूल्यवान नागरिक घडवत असल्याचे धुळे जिल्ह्यातील सिंदखेडा तालुक्यातील निमगूळचे केंद्रप्रमुख भालचंद्र पाटील यांनी या आढावा बैठकीत सांगितले. ते म्हणाले, ''पुण्यामध्ये घेतलेले प्रशिक्षण नाविन्यपूर्ण होत. मूल्यांची जोपासना करणारा नागरिक घडविण्याचे काम मूल्यवर्धनद्वारे आम्ही सर्वजण करीत आहोत. केंद्रातील ३९ पैकी ३६ शिक्षकांना मूल्यवर्धन प्रशिक्षण दिले आहे. मूल्यवर्धनचा केंद्राचा एक What's App ग्रुप आहे, केंद्रातील सर्व शाळांतील होणारे उपक्रम त्यावर शिक्षक पाठवीत असतात, मूल्यवर्धनमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होत आहे.'' गेल्या एक वर्षाचा निमगुळ केंद्राचा मूल्यवर्धन कार्यक्रमाचा आढावा घेताना ते पुढे असेही म्हणाले,''केंद्रातील सर्वच शिक्षकांचा या उपक्रमाला उत्तम प्रतिसाद आहे, शिक्षक स्वयंप्रेरणेने आपापल्या शाळांत मूल्यवर्धन उपक्रम राबवितात.''

**या उपक्रमामुळे मुलांचा सर्वांगीण विकास होतो, मुले धीट झाली, शिक्षक–विद्यार्थी आणि विद्यार्थी–विद्यार्थी यांच्यातील संबंध मित्रत्वाचे झाले मुले एकमेकांची काळजी घेतात, अशा प्रतिक्रिया शिक्षकांनी दिल्या.**

**अडचणी असताना प्रशिक्षणाला गेलो, आपण आपल्या स्तरांवर काहीतरी करावे असे वाटायचे. मूल्यवर्धनमुळे तशी संधी मिळाली. पैशापेक्षा सेवेत समाधान जास्त असते. जे प्रशिक्षणात सांगितले तसेच उपक्रम राबविण्यास मिळाले. मूल्यवर्धनमुळे शाळेचा परिसर चांगला झाला. मुले मनमोकळी राहतात. जी मुले शाळेत येत नव्हती ती मूल्यवर्धनमुळे शाळेत येऊ लागली. आपण विद्यार्थी बनून विद्यार्थ्यांना शिकवू शकतो, शिक्षक म्हणून नाही. मूल्यवर्धनमुळे आत्मविश्वास वाढला. स्वतःला सिद्ध करू शकलो, असे मुख्याध्यापक आणि मूल्यदूत जगन वाडिले यांनी सांगितले.**

बैठकीपूर्वी शांतिलाल मुथ्था फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शांतिलाल मुथ्था यांनी प्रत्यक्ष वर्गात जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी त्यांना उत्तम प्रतिसाद दिला व सर्व उपस्थितांची मने जिंकली. आढावा बैठकीदरम्यान राज्यस्तरीय मूल्यवर्धन उपक्रम लिहिण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविलेल्या शिक्षिका दीपिका बारी यांचा सत्कार मुथ्था यांच्या हस्ते करण्यात आला.

''मूल्यवर्धन कार्यक्रमामुळे पालकांना शाळेबद्दल तसेच शिक्षकांबद्दल आपुलकी वाटू लागली आहे. चांगल्या प्रशिक्षणामुळे चांगले परिणाम दिसून येतात आणि मूल्यवर्धन बाबत असेच घडले आहे. मूल्यवर्धन हा कार्यक्रम व्यक्तिमत्त्व विकासासारखा आहे, यामुळे स्वभाव चांगला होण्यास मदत होते. मूल्यवर्धन हा उपक्रमांवर आधारित कार्यक्रम आहे. यामुळे मुलांमधील भांडणाचे, रागविण्याचे प्रमाण कमी झाले. उपक्रम पुस्तिका अजून आकर्षक करावी. डिजिटलचे युग आहे त्यामुळे मूल्यवर्धन डिजिटल स्वरुपात असेल तर ते परिणामकारक होईल. मूल्यवर्धनमुळे फक्त मुलांमध्येच नव्हे तर शिक्षकांमध्येही सकारात्मक बदल होतील. एक काळ असा होता की शिक्षक विद्यार्थ्यांसाठी देवाप्रमाणे वंदनीय होते. मूल्यवर्धनमुळे पालकांना शिक्षकांबद्दल आपुलकी वाढू लागेल. इंग्रजी माध्यमाची मुले जिल्हा परिषदेच्या शाळेत येतील'', असे एसएमएफ चे राज्य पदाधिकारी डॉ. कांतिलाल टाटिया म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन मास्टर ट्रेनर तथा झिरवे शाळेचे मुख्याध्यापक जगन वाडिले यांनी केले तर आभार संजय बैसाने यांनी मानले.

## २२. नंदुरबार

जि. नंदुरबार, ता. नंदुरबार, केंद्र– पिंपळोद

शाळेचे नाव – जि.प.प्रा.शाळा घोड्यावद (शिवपूर)

गुरुवार दि. १२ /१/२०१७, वेळ–स. ११.०० वा.

केंद्रातील शाळा :११, प्रशिक्षित शिक्षक : २७

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स): १) सुभाष सावंत २) हरिश्र्चंद्र आव्हाड ३) ललिता भामरे

**'मूल्यवर्धन कार्यक्रम व अभ्यासजत्रा जिल्ह्यात सर्वत्र सुरु व्हाव्यात'**

**– जिल्हाधिकारी मल्लिनाथ कलशेट्टी**

नंदुरबार जिल्ह्यात घोड्यावद (शिवपूर) येथे गुरुवार दि.१२ जानेवारी २०१७ रोजी मूल्यवर्धन कार्यक्रम आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. ''मूल्यवर्धन कार्यक्रम आणि अभ्यास जत्रांना लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त व्हावे तसेच त्या जिल्ह्यात सर्वत्र सुरु व्हाव्यात'' असे मत नंदुरबारचे जिल्हाधिकारी मल्लिनाथ कलशेट्टी यांनी मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या आढावा बैठकीत व्यक्त केले. या बैठकीला कलशेट्टींसह जिल्हा शिक्षणाधिकारी अरुण पाटील, उपशिक्षणाधिकारी राहुल चौधरी, गट शिक्षणाधिकारी सी.के.पाटील, शांतिलाल मुथ्था फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष शांतिलाल मुथ्था, राज्य पदाधिकारी दिलीप कांकरिया, डॉ.कांतिलाल टाटिया, हरकचंद बोरा, घोड्यावदचे सरपंच सुधीर पाडवी, ग्रामसेवक किरण सैंदाने, सर्व शिक्षक, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य कांबळे तसेच पालक बहुसंख्येने उपस्थित होते. या बैठकीत जिल्हा शिक्षणाधिकारी अरुण पाटील यांनी हा उपक्रम संपूर्ण जिल्ह्यात राबविल्यास सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. गटशिक्षणाधिकारी सी.के. पाटील यांनी हा उपक्रम शालेय अभ्यासक्रमाला पूरक असून यामुळे फक्त मुलांमध्येच नव्हे तर शिक्षकांमध्येही सकारात्मक बदल झाल्याचे सांगितले. मुथ्था यांनी मूल्यदूत, पालक आणि शालेय व्यवस्थापन समिती सदस्य यांच्याशी या उपक्रमाबाबत चर्चा केली. त्यावेळी पालकांनी मुलांमध्ये झालेले सकारात्मक बदल सांगितले. बैठकीपूर्वी मुथ्था यांनी डिजिटल वर्गाचे उदघाटन केले. तसेच इयत्ता पहिली ते तिसरीच्या वर्गातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला व शिक्षकांकडून उपक्रम राबविताना येणाऱ्या आव्हानांची माहिती घेतली. केंद्रप्रमुख ललिता भामरे यांनी केंद्रातील मूल्यवर्धन उपक्रमाचा आढावा घेतला आणि सर्व शिक्षक आनंदाने उपक्रम राबवत असल्याचे सांगितले. दरम्यान एसएमएफने घेतलेल्या उपक्रम लिहिण्याच्या स्पर्धेत पारितोषिक मिळविलेल्या संगीता पवार आणि मनोजकुमार चौधरी या दोन शिक्षकांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. सूत्रसंचालन ललिता भामरे व आभार प्रदर्शन सुभाष सावंत यांनी केले.

## २३. सोलापूर

जि.सोलापूर, ता. करमाळा, केंद्र–जेऊर

शाळेचे नाव – जि.प.प्रा.शाळा,वांगी

मंगळवार दि. २७ डिसेंबर २०१६ ; वेळ स.१० वा.

केंद्रातील शाळा : १५, प्रशिक्षित शिक्षक : ३७

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स): १) रविंद्र साळुंके २) महादेव भारती ३) राजन कुलकर्णी

**'मूल्यवर्धन उपक्रमामुळे भांडण मिटले'**

**सोलापूर जिल्ह्यातल्या करमाळा तालुक्यातील वांगी गावात मूल्यवर्धन उपक्रमांतर्गत कृतीवर आधारित खेळ, गोष्टी, स्वतःच्या वर्गाचे नियम स्वतः तयार करणे, या सगळ्या गोष्टी 'ती आवडीने करत होती. समस्या आणि आव्हानांना सामोरे जाण्याविषयीचे उपक्रम, वेगवेगळ्या परिस्थितीत योग्य वर्तन कुठले हे समजण्याची क्षमता 'तिच्या' बरोबर तिच्या वर्गातल्या मित्र–मैत्रिणींकडेही येऊ लागली होती. अशातच एके दिवशी संध्याकाळी काहीतरी कारणाने तिच्या आई वडिलांमध्ये किरकोळ भांडण झाले आणि तिने धीटपणे दोघांचेही भांडण सोडविले. पण वर्गात मात्र तो प्रसंग उपस्थितांसमोर सांगताना तिच्या डोळ्यात पाणी आलेले पाहून उपस्थितांचेही मन हेलावून गेले. एखाद्या उपक्रमामुळे समाजात कसे चांगले बदल होतात**

**हे समजून घ्यायचे असेल तर या प्रसंगाकडे बघावे.** सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुका. त्यातील जेऊर केंद्रातले वांगी गाव. या वांगीमधील प्राथमिक शाळेत मंगळवार दि.२७ डिसेंबर, २०१६ रोजी मूल्यवर्धन कार्यक्रमाची आढावा बैठक घेतली, त्यावेळी या छोट्या मुलीने मूल्यवर्धनउपक्रमामुळे आपल्यात आत्मविश्वास निर्माण झाल्याचे सांगितले. वांगीच्या सरपंच शीतल मेनकुदळे, सिद्धेश्वर सरडे, महेंद्र पाटील, मुख्याध्यापक दीपक मेनकुदळे, केंद्रप्रमुख राजन कुलकर्णी, शांतिलाल मुथ्था फाउंडेशनचे संस्थापक शांतिलाल मुथ्था, केतनभाई शहा, महेश बाफना आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी शांतिलाल मुथ्था व केंद्रप्रमुख राजन कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यामध्ये मुलांचा अपार उत्साह दिसून आला. **मूल्यवर्धन हा शिक्षकांचा व विद्यार्थ्यांचा आवडता विषय बनला आहे. यामध्ये विविध उपक्रम कृतीद्वारे घेतले जातात. विषय व्याख्यान पद्धतीने शिकविण्याऐवजी जोडीचर्चा, गटचर्चा बालस्नेही पध्दतीने घेतले जात असल्याने मुले आनंदी व धाडसी झाल्याचे दिसले. सर्व विद्यार्थी एकमेकांना मदत करतात, घरी आई-बाबांना मदत करतात. स्वच्छता ठेवतात. इतरांना स्वच्छता ठेवण्यास प्रोत्साहन देतात. वर्ग नियम स्वतःतयार करतात व त्याचे पालनही करतात. ही मुले आई वडील, थोरा मोठ्यांचा आदर राखतात. त्याचबरोबर घरातील मोठ्यांनी व्यसनापासून दूर राहावे यासाठीही प्रयत्न करतात. विद्यार्थ्यांनी मूल्यवर्धन अंगिकारले आहे व त्याप्रमाणे त्यांचे वागणे दिसत आहे. विद्यार्थी स्वतः बदलत आहेत व त्याचा परिणाम कुटुंबीयांवरही होत असल्याचे त्यांच्याशी साधलेल्या संवादातून जाणवले. केवळ विद्यार्थीच नव्हेत तर शिक्षकांनीही स्वतःत बदल झाल्याचे सांगितले.** निवृत्त झाल्यावर आपले उर्वरित आयुष्य मूल्यवर्धन कार्यक्रमाला समर्पित करण्याचा निश्चय केंद्रप्रमुख राजन कुलकर्णी यांनी एक वर्षापूर्वी, केला होता. आजही त्यांनी या म्हणण्याचा पुनरुच्चार केला. सहा महिन्यापूर्वी त्यांना हवी त्या ठिकाणी बदली मिळत असतानासुद्धा ती नाकारून वांगी येथेच केंद्रप्रमुखपदावर राहण्याचे ठरविले. वांगी केंद्रातील सर्व शिक्षकांना त्यांनी या उपक्रमाचे प्रशिक्षण दिले त्याचबरोबर आसपासच्या केंद्रामध्ये हा उपक्रम सुरु झालेला नसतानासुद्धा उत्स्फूर्तपणे उत्साही शिक्षकांना हे प्रशिक्षण दिले. त्यामुळे या कार्यक्रमास वांगी केंद्राच्या बाहेरचे शिक्षक व मुख्याध्यापकही उपस्थित होते. रविंद्र साळुंके व महादेव भारती या दोन शिक्षकांनी पुणे येथे प्रशिक्षण घेतले व चार महिने स्वतःच्या शाळेत मूल्यवर्धन उपक्रम प्रत्यक्ष राबविला. त्यानंतर जूनमध्ये सुट्टी असताना केंद्रातील १५ शाळांतील इतर शिक्षकांना प्रशिक्षण दिले. अनेक शिक्षकांनी या उपक्रमाबाबत आपले अनुभव व्यक्त केले. तसेच पालक व गावकऱ्यांनी बदलाची चाहूल कशी आहे, हे सांगितले. आगामी शैक्षणिक वर्षात या उपक्रमाची व्याप्ती वाढविण्यासाठी कटिबद्ध असल्याचे केंद्रप्रमुख कुलकर्णी यांनी सांगितले. त्यांनी मूल्यवर्धन उपक्रमासाठी साधन व्यक्तींची (मास्टर ट्रेनर्स) यादी तयार केल्याचेही नमूद केले.

हा आढावा कार्यक्रम फक्त शाळेच्या आवारात करण्याचे निर्देश दिलेले असताना, वांगीच्या गावकऱ्यांचा उत्साह एवढा होता की, गावकऱ्यांनी संपूर्ण गावासाठी जेवण ठेवून आनंदोत्सव साजरा केला!

## २४. अहमदनगर

जि. अहमदनगर, ता. नेवासा, केंद्र- शिंगवे तुकाई

शाळेचे नाव - जि.प.प्रा.शाळा,शिंगवे तुकाई

सोमवार दि.२/१/२०१७, वेळ-दुपारी २.३० वाजता

केंद्रातील शाळा : ११, प्रशिक्षित शिक्षक : ३५

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स) : १) उमेश क्षीरसागर २) शिवाजी साबळे ३) उत्तम शेलार

**'मूल्यवर्धन कार्यक्रमाचे परिणाम दूरगामी आणि चिरकाळ टिकणारे'**

**-अंकुश जंजिरे, उपशिक्षण अधिकारी (प्राथ.)**

''राज्यघटनेतील मूल्ये ही आपल्या संस्कृतीची नीतिमूल्ये आहेत, हे आपल्याला मूल्यवर्धन उपक्रमामधून पुनश्च अनुभवायला मिळत आहे. याचे परिणाम दूरगामी आणि चिरकाळ टिकणारे आहेत. जर मूल्यवर्धन उपक्रम सर्वांनीच अंगिकारले असते तर महाराष्ट्रात महिलांवर हल्ले झाले नसते'' असे उपशिक्षणाधिकारी(प्राथ.) अंकुश जंजिरे म्हणाले. ते शिंगवे तुकाई, ता. नेवासा,जि. अहमदनगर येथे सोमवार दि.२ जानेवारी २०१७ रोजी मूल्यवर्धन उपक्रमाच्या आढावा बैठकीत बोलत होते. ''आपल्याला फक्त आपल्या वर्गासाठी नाही तर संपूर्ण समाजासाठी मुलांना घडवायचे आहे, याची जाणीव या उपक्रमामधून होते. या माध्यमातून शिक्षकांनी शाळेबाहेरही मुलांमधील मूल्यांचे मूल्यांकन करणे गरजेचे आहे'' असे उपशिक्षणाधिकारी (माध्य.) श्री डोंगरे म्हणाले.

''स्वतःचे नियम स्वतः बनविले पाहिजेत, हे आम्हाला मूल्यवर्धन उपक्रमातून समजले आणि भावले. मूल्यवर्धन हा एक कार्यक्रम नसून ती एक जीवनशैली आहे. हा कार्यक्रम संपूर्ण नेवासा तालुक्यात प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रयत्नशील राहू'', असे कार्यक्रमास आवर्जून उपस्थित असलेल्या गट शिक्षणाधिकारी श्रीमती सामलेटी म्हणाल्या.

**आढावा बैठकीत बोलताना शिक्षण विस्तार अधिकारी श्री. कापरे म्हणाले, ''मूल्यवर्धन मुळे आम्हाला शिक्षण हक्क कायद्यातील बऱ्याच प्रश्नांची उत्तरे मिळाली.'' मूल्यदूत संजय राऊत यांनी मूल्यवर्धन मधील 'भाकरीचा प्रवास' या उपक्रमामुळे मुलांचे अन्न फेकून देण्याचे प्रमाण कसे कमी झाले, याचा अनुभव सांगितला. इयत्ता पहिलीच्या विद्यार्थी उपक्रम पुस्तिकेत असणाऱ्या चित्रांमुळे मुलांच्या वर्तनात सकारात्मक बदल होत असल्याचे मूल्यदूत श्रीमती सोनवणे मॅडम यांनी सांगितले.**

शांतिलाल मुथ्था हे या आढावा बैठकीस उपस्थित होते. त्यांनी वर्गात जाऊन मुलांशी उपक्रमासंदर्भात संवाद साधला. तसेच सर्व शिक्षक, केंद्रप्रमुख यांच्याकडून मूल्यवर्धन कार्यक्रमाचा चर्चात्मक आढावा घेतला.

या प्रसंगी नेवासा तालुक्यातील सात केंद्रप्रमुख, उपशिक्षणाधिकारी (प्राथ.) श्री.जंजिरे, उपशिक्षणाधिकारी (माध्य.) श्री.डोंगरे, नेवासाच्या गट शिक्षणाधिकारी श्रीमती सामलेटी मॅडम, शिक्षण विस्तार अधिकारी श्री.कापरे, शिक्षण विस्तार अधिकारी श्री. साठे , शिंगवे तुकाईचे केंद्रप्रमुख श्री. कुलट तसेच केंद्रातील सर्व शिक्षक व शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होते.

## २५. रायगड

जि. रायगड, ता.महाड, केंद्र– बिरवाडी

शाळेचे नाव –जि. प. कन्याशाळा,बिरवाडी

शुक्रवार दि. २० जानेवारी २०१७, वेळ–स. १०.००वा.

केंद्रातील शाळा : १३, प्रशिक्षित शिक्षक : २६

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स): १) सुनील मोहिते २) संदीप भोसले

**मूल्यवर्धन कार्यक्रम जिल्हाभर नेण्यास मदत करू – नितीन मंडलिक**

रायगड जिल्ह्यातल्या महाड तालुक्यातील बिरवाडी येथे शुक्रवार दि. २० जानेवारी २०१७ रोजी जि.प. कन्याशाळेत मूल्यवर्धन कार्यक्रम आढावा बैठक आयोजित केली होती. बैठकीपूर्वी मुथ्था यांचे विद्यार्थिनींनी औक्षण करून स्वागत केल्यानंतर इयत्ता पहिली ते तिसरीच्या विद्यार्थिनींशी मुथ्था यांनी वर्गात जाऊन संवाद साधला. यावेळी विद्यार्थिनींनी उपक्रमातील कृतीआधारित प्रसंगांचे सादरीकरण केले. मूल्यवर्धन उपक्रमामुळे जिल्हा परिषदेच्या शाळांचे महत्त्व वाढू लागले आहे. विद्यार्थी तणावमुक्त, भितीमुक्त आणि आत्मविश्वासाने वावरताना दिसत आहेत. तसेच पालक व शिक्षकांमध्येही चांगले बदल दिसत आहेत. म्हणूनच हा उपक्रम संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यासाठी नक्कीच मदत करू, असे आश्वासन गटविकास अधिकारी नितीन मंडलिक यांनी मूल्यवर्धन कार्यक्रम आढावा बैठकीत दिले. या बैठकीला गटशिक्षणाधिकारी सुनिता चांदोरकर, मुख्याध्यापक दिपक कुरडुनकर, केंद्रप्रमुख सुनील मोहिते, संदीप भोसले, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, सर्व शिक्षक व पालक तसेच शांतिलाल मुथ्था फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शांतिलाल मुथ्था, जिल्हा प्रतिनिधी उत्तम जैन व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

नंतर मुथ्था यांनी शिक्षक, मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स), शाळा व्यवस्थापन समिती सदस्य आणि पालकांशीही संवाद साधला व मार्गदर्शन केले. मुलांना जबाबदार नागरिक बनविण्याचे काम आपल्याला करायचे आहे आणि जिल्हा परिषदेचे शिक्षक आणि केंद्रप्रमुख अतिशय आस्थेने हे काम करत आहेत असे मुथ्था म्हणाले. केंद्रातून बदली झाल्यानंतरही संदीप भोसले यांनी या केंद्रात शिक्षकांना मार्गदर्शन करणे सुरूच ठेवल्याबद्दल मुथ्था यांनी त्यांचे कौतुक केले.

**शिक्षण हक्क कायद्यात शिक्षण हे बालस्नेही, आनंददायी आणि आत्मविश्वास वाढवणारे असावे, असे म्हटले आहे. मूल्यवर्धन उपक्रमातून नेमक्या ह्याच गोष्टी साध्य होत आहेत. ज्ञानरचनावादी शिक्षणाची संकल्पनाही या उपक्रमातून साध्य होत आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये मला प्रचंड आत्मविश्वास पाहायला मिळाला. त्यांच्यात सकारात्मक बदल दिसतो आहे. अतिशय गरजेचा आणि सुंदर उपक्रम म्हणून मूल्यवर्धन उपक्रमाकडे पाहता येईल, यामुळे देशऋण फेडण्याची संधी शिक्षकांना मिळाली आहे, असे गटशिक्षणाधिकारी सुनिता चांदोरकर म्हणाल्या.** तसेच महाड तालुका मूल्यवर्धनमय करण्यासाठी सर्वतोपरी

सहकार्य करू, असेही त्यांनी सांगितले. केंद्राचा आढावा सादर करताना केंद्रप्रमुख सुनिल मोहिते यांनी, या कार्यक्रमातून मला खूप शिकायला मिळाल्याचे तसेच विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये सकारात्मक बदल पाहायला मिळाल्याचे सांगितले. प्रास्ताविक मुख्याध्यापक दिपक कुरडुनकर यांनी, तर सूत्रसंचालन कीर्तने मॅडम यांनी केले.

## २६. ठाणे

जि. ठाणे,ता.शहापूर,केंद्र– टेंभूर्ली

शाळेचे नाव – जि.प.प्रा.शाळा टेंभूर्ली

बुधवार दि.४ /१/२०१७, वेळ– दु.३.३०वा.

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स) : १) नितिन हरणे, २) दामू हिलम, ३) महेंद्र धीमते

केंद्रातील शाळा:१५ ; प्रशिक्षित शिक्षक : २२

**'मूल्यवर्धन ग्रामीण– दुर्गम भागातील मुलांसाठी एक वरदान'**

**–वर्षा सोनटक्के, शिक्षण विस्तार अधिकारी**

''प्राथमिक शाळांमध्ये सुरु झालेला मूल्यवर्धन कार्यक्रम हा ग्रामीण दुर्गम भागासाठी एक वरदान आहे. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधता आला. त्यामुळे मुलांमधे होणारे बदल जाणवले'' असे उद्गार शिक्षणविस्तार अधिकारी वर्षा सोनटक्के यांनी टेंभूर्ली येथील जि.प. प्राथमिक शाळेत झालेल्या मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या आढावा बैठकीच्या वेळी काढले. ही बैठक बुधवार दि.४ जानेवारी २०१७ रोजी ठाणे जिल्ह्यातल्या शहापूर तालुक्यात टेंभूर्ली येथे झाली. त्या पुढे म्हणाल्या, ''मूल्यवर्धनमुळे मुलांमध्ये खूप बदल पाहायला मिळाले. हा कार्यक्रम संपूर्ण महाराष्ट्रभर करावा अशी विनंती आहे. मूल्यशिक्षण हा उपक्रम नवीन नाही. परंतु मूल्यांचे वर्धन उपक्रमाच्या माध्यमातून होत आहे हे नाविन्यपूर्ण आहे.'' या बैठकीला शांतिलाल मुथ्था फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शांतिलाल मुथ्था, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, सरपंच, उपसरपंच, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**या केंद्रातील कातकरी वाडी व टेंभूर्ली या दोनही शाळांच्या भिंतींवर आतून बाहेरून मूल्यवर्धनची माहिती आणि उपक्रम रंगविले आहेत. मूल्यवर्धनमुळे मुले आनंदी झाली आहेत व त्यांच्या वर्तणुकीमध्ये बदल झाल्याची जाणीव पालकांना झाली आहे. त्यामुळे पालकांमध्ये मूल्यवर्धन कार्यक्रमाविषयी उत्साह वाटू लागला आहे व सर्व गावकऱ्यांनी आपल्या वर्गणीतून या शाळांना मूल्यवर्धनचा रंग दिला आहे.**

**''मूल्यवर्धन प्रशिक्षणाचा अनुभव खूप चांगला आहे, स्वतःही एखादी तासिका घेतो तेव्हा अनपेक्षित उत्तरे ऐकायला मिळतात. केंद्रातील सर्व शिक्षक स्वयंप्रेरणेने विद्यार्थी केंद्रस्थानी मानून आनंददायी पद्धतीने काम करतात, मूल्यवर्धन कार्यक्रमाचा परिणाम असा झाला की, मुले केंद्राला एक तरी बक्षीस मिळवून देतात. पूर्वी पालक सांगायचे मुलांना शिस्त नाही, परंतु, आता मुलांमध्ये स्वयंशिस्त येत चालली असल्याचे पालकांनीच आधीच्या बैठकीमध्ये सांगितले. पूर्वी मला खूप राग यायचा परंतु आता कितीही राग आला तरी मी संयम पाळतो. हा बदल माझ्यामध्ये मूल्यवर्धन मुळे झाला आहे'', केंद्रप्रमुख महेंद्र धीमते म्हणाले.**

मूल्यदूत मनीषा हासे म्हणाल्या, ''सुरूवातीला ओझे वाटले पण प्रत्यक्ष प्रशिक्षण घेतल्यावर खूपच वेगळे वाटले. मूल्यवर्धनमुळे मुलांच्या जवळ जाता आले, मुलांबरोबर आमच्यामध्येही बदल झाला''.

मूल्यदूत श्री. नितीन हरणे बैठकीत बोलताना म्हणाले, ''संधी मिळत असताना खूप संकटे घेऊन येत असते. अडचणी खूप होत्या; पण त्यावर मात केली. थोडा त्रास घेतला. त्यामुळे केंद्रातील १४ शाळांना मूल्यवर्धन उपक्रमांचा लाभ घेता आला. गावकऱ्यांचे सहकार्य मिळवायचे असेल तर पालक शाळेशी जोडले गेले पाहिजेत. मूल्यवर्धन उपक्रमांमुळे पालकांना शाळेशी कसे जोडावे हे समजले. मूल्यवर्धन कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या स्थलांतराचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली. चांगले वातावरण निर्माण केले तर मूल्यवर्धन कार्यक्रम खूप परिमाणकारक होऊ शकतो.''

आढावा बैठकी दरम्यान केंद्रातील शिक्षकांनी आपले अनुभव कथन केले. उपस्थित पालकांपैकी विशेषतः महिलांनी त्यांच्या मुलांमध्ये झालेले सकारात्मक बदल सांगितले. शांतिलाल मुथ्था यांनी यावेळी मूल्यदूत, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य आणि

पालकांशी संवाद साधला. त्यावेळी सेनवे येथील शासकीय आदिवासी आश्रम शाळेतील प्रमुख शरद पांढरे यांनी मूल्यवर्धन कार्यक्रम आश्रमशाळांत सुरु करण्याची विनंती केली. तसेच मुरबाड तालुक्यातील महेंद्र सुपेकर यांनी स्वयंप्रेरणेने राबवित असलेले उपक्रम मुलांसाठी फलदायी असल्याचे सांगितले. आढावा बैठकीपूर्वी मुथ्था यांनी पायलट स्कूल कातकरवाडी येथील मास्टर ट्रेनर्स नितीन हरणे व दामू हिलम यांनी साकारलेल्या मूल्यवर्धन वर्गाचे उदघाटन केले. तसेच शिक्षकांचे व ग्रामस्थांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभारप्रदर्शन मास्टर ट्रेनर नितीन हरणे यांनी केले.

## २७. पालघर

जि. पालघर , ता. तलासरी, केंद्र– वेवजी

शाळेचे नाव – जि.प.प्रा.शाळा,नानापाडा

शुक्रवार दि. ६ जानेवारी २०१७, वेळ: स.९ वा.

केंद्रातील शाळा : ११, प्रशिक्षित शिक्षक : १७

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स) : १) श्री. नवनाथ जाधव २)श्री. शिवदास लक्ष्मण माळी

**मूल्यवर्धन उपक्रमाची सर्वच केंद्रात गरज –श्री राहुल धूम, गट विकास अधिकारी**

पालघर जिल्ह्यातील तलासरी तालुक्यातल्या वेवजी केंद्रातील नानापाडा शाळेत शुक्रवार दि. ६ जानेवारी २०१७ रोजी मूल्यवर्धन कार्यक्रम आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना गट विकास अधिकारी श्री. राहुल धूम यांनी मूल्यवर्धन सर्वच केंद्रात राबविण्याची विनंती केली. मूल्यवर्धन हा देशाचा जबाबदार नागरिक घडविण्याचा कार्यक्रम असून सर्व शिक्षक या उपक्रमास योगदान देत आहेत. पालघर जिल्हा समाज कल्याण सभापती श्री.गोवारी यांनी सांगितले की, मूल्यवर्धन कार्यक्रम हा ह्या परिसरातील मुलांसाठी महत्त्वाचा कार्यक्रम आहे. बैठकीपूर्वी शांतिलाल मुथ्था यांनी पहिली ते तिसरीच्या वर्गात जाऊन मुलांशी संवाद साधला व शिक्षकांना मूल्यवर्धन उपक्रम राबविण्यात येणाऱ्या आव्हानांची माहिती घेतली. या वेळी शिक्षकांनी प्रमुख अडचण ही भाषेची असल्याचे सांगितले. त्यावेळी मुथ्था यांनी मूल्यदूत, पालक, शालेय समिती सदस्य यांच्याशी मूल्यवर्धन उपक्रमाबाबत चर्चा केली. त्या वेळी पालकांनी विशेषतः महिलांनी मुलांमध्ये झालेले सकारात्मक बदल विशद केले.

**कार्यक्रम चालू असताना व चर्चा सुरु असताना एका शिक्षिकेने तिसरीतील एका विद्यार्थ्याला (नाव मुद्दाम दिलेले नाही.) व्यासपीठावर आणले व माईकवरून सर्वांना सांगितले, ''मूल्यवर्धनमुळे आपल्या सर्व शाळांमध्ये झालेले बदल दिसतच आहेत, विद्यार्थी खूप आनंदी व उत्साही असल्याचे जाणवत आहे, परंतु एक विशेष बाब सांगण्यासाठी मी उभी आहे.'' असे म्हणून त्यांनी एका विद्यार्थ्याची ओळख करून दिली. ''हा विद्यार्थी शाळेमध्ये रोज मारामारी करत असे. घरी रोज आईला व इतरांना त्रास देत असे. आईकडे पैसे मागायचा, पैसे दिले नाहीत तर आईला मारायचा, चावायचा. शिवाय त्याचा शाळेतील विद्यार्थ्यांना खूप त्रास होत होता. या विद्यार्थ्याची वर्गातच नव्हेतर शाळेमध्ये मोठी दहशत होती. परंतु गेल्या वर्षभरामध्ये या ठिकाणी मूल्यवर्धनची अंमलबजावणी अतिशय चांगल्याप्रकारे सुरु आहे. मूल्यवर्धनच्या उपक्रमामध्ये 'माझ्यातील गुण व कौशल्य', 'माझे ध्येय', 'माझा दिनक्रम','आपल्याला राग कधी येतो', 'राग आल्यानंतर काय होते', 'खरे बोलण्याचे बक्षीस', 'शेजारी–शेजारी', 'दुसऱ्यांच्या बाजूने विचार करूया', 'जगातील मुले', 'भाकरीचा प्रवास', 'मला लोकशाही हवी आहे', इत्यादी उपक्रम इयत्ता तिसरीमध्ये घेण्यात आले आहेत. या उपक्रमामध्ये या विद्यार्थ्याने सक्रिय सहभाग घेतल्याने या मुलाच्या वर्तणुकीत बदल दिसून येत आहे.''**

**इयत्ता तिसरीतील एक मतिमंद मुलगा (नाव मुद्दाम दिलेले नाही.) पूर्वी शाळेत न येता इकडे तिकडे फिरत असे, आईला घरातल्या कामांमध्ये कधीच मदत करत नसे. कुणाशी नीट बोलत नसे. आजूबाजूला माणसे असतील तर तो अवघडून जात असे. परंतु शेजारी मित्र आणि शिक्षकांच्या सांगण्यावरून शाळेत जायला त्याने सुरुवात केली. मूल्यवर्धनच्या उपक्रमांमधील 'माझा दिनक्रम' , 'दुसऱ्यांच्या बाजूने विचार करूया', 'जबाबदारी', 'सुसंवादी नातेसंबंध'– 'शांतता', 'सहकार्य–कामात मदत करणे' आणि 'दुसऱ्याच्या हक्काची जाणीव ठेवून वागणे', 'इतरांबद्दल आदर' आणि 'आस्था असणे' या घटकांच्या शिकवणुकीमुळेच तो आता शाळेत नियमित येऊ लागला आहे. घरामध्ये आईला पाणी आणण्यास, साफसफाई करण्यास मदत करतो.**

इयत्ता दुसरीत शिकणारी एक मुलगी (नाव मुद्दाम दिलेले नाही.) नंदुरबार जिल्ह्यातून स्थलांतरित म्हणून आली असून शाळेत येत नव्हती. हट्टी होती. चिडचिड करायची. सुरूवातीला अबोल होती. आजूबाजूच्या शाळेत जाणाऱ्या मुलांमुळे तीही हळूहळू शाळेत येऊ लागली. शाळेत मूल्यवर्धन उपक्रम सुरु झालेले होते. त्याची गोडी तिला लागली. त्यातील 'आनंदाचे मोजमाप', 'आधी विचार मग आचार', 'चांगल्या वाईट सवयी' या उपक्रमांमुळे तिच्या वागणुकीत फरक पडला आहे.

या कार्यक्रमास जि.प.पालघरचे समाजकल्याण सभापती, जि.प. सदस्या, पंचायत समिती तलासरीच्या सदस्या, गटविकास अधिकारी, मुथ्था फाउंडेशनचे राज्य पदाधिकारी, तालुक्यातील केंद्रप्रमुख, मूल्यवर्धन शिक्षक, जिल्हा समन्वयक श्री. सखाराम वाघुम्ब्रे तसेच पालक, बहुसंख्येने उपस्थित होते. केंद्रातील मूल्यवर्धन कार्यक्रमाचा आढावा केंद्र प्रमुख श्री. नवनाथ जाधव यांनी घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. किशोर वर्तक यांनी केले तर मुख्याध्यापिका श्रीमती कुंदा करबट यांनी आभार मानले.

## २८. कोल्हापूर

जि.कोल्हापूर, ता.हातकणंगले, केंद्र–हेरले

शाळेचे नाव –जि. प. कन्या विद्या मंदिर ,हेरले .

शनिवार दि. १८ फेब्रुवारी २०१७, वेळ–स. १०.००वा.

केंद्रातील शाळा : ८, प्रशिक्षित शिक्षक : ३३

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स): १) योगेश पाकले २) हेमलता शिंदे ३) श्री. लोखंडे.

**मूल्ये ही अंगिकारण्याची गोष्ट – शांतिलाल मुथ्था**

कोल्हापूर जिल्ह्यात हातकणंगले तालुक्यातल्या हेरले केंद्रांतर्गत असलेल्या जि.प. प्राथमिक शाळेत शनिवार दि. १८ फेब्रुवारी २०१७ रोजी मूल्यवर्धन कार्यक्रम आढावा बैठक आयोजित केली होती. शाळेतील मुलांशी संवाद साधून त्यांच्याकडून मूल्यवर्धन उपक्रम करवून घेतल्यानंतर जागेअभावी ही बैठक संजय घोडावत इन्स्टिट्यूट्सच्या आवारात सी बिल्डिंगच्या सेमिनार हॉलमधे झाली.

**''आज समाजात वातावरण खूप बदललेले आहे. त्याची झळ प्रत्येक कुटुंबाला बसते आहे. बाहेरचे वातावरण सुधारणे आपल्या हातात नाही. परंतु मुलांना चांगल्या संधी उपलब्ध करून देणे आपल्या हातात आहे. मूल्यवर्धन कार्यक्रमातून मुलांनी काय अंगिकारले आहे, हेच महत्त्वाचे आहे'', मुथ्था फौंडेशनचे शांतिलाल मुथ्था यांनी मूल्यवर्धन कार्यक्रम आढावा बैठकीत सांगितले.**

या बैठकीला कोल्हापूर जिल्ह्याचे मूल्यवर्धन कार्यक्रमाचे समन्वयक ईश्वर नेवगिरे, हेरले केंद्रप्रमुख हेमलता शिंदे, मुख्याध्यापक बाळासाहेब कोठावळे, गट शिक्षणाधिकारी गजानन उकिर्डे आदी मान्यवर उपस्थित होते.

बैठकीपूर्वी शांतिलाल मुथ्था यांनी हेरले येथील जि.प.प्राथमिक शाळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मूल्यवर्धन कार्यक्रमातील उपक्रमांविषयी त्यांनी मुलांना बोलते केले आणि त्यांनी हे उपक्रम किती प्रमाणात आत्मसात केले आहेत, याची संवादातून चाचणी घेतली. यावेळी पालक आणि शिक्षकांनीही आपली मनोगते व्यक्त केली आणि मुलांमधे होत असलेल्या चांगल्या बदलांबद्दल समाधान व्यक्त केले.

## २९. सांगली

जि.सांगली , ता.वाळवा, केंद्र– भवानीनगर

शाळेचे नाव–पार्वती खेमचंद विद्यामंदिर, ताकारी. (जि. प.प्राथमिक शाळा, भवानीनगर

शनिवार दि. १८ फेब्रुवारी २०१७, वेळ–स. १०.००वा.

केंद्रातील शाळा :१२, प्रशिक्षित शिक्षक : ३६

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स): १)अशोक बनसोडे २)गिरीश मोकाशी ३)उज्ज्वला चव्हाण.

**मूल्यवर्धन कार्यक्रमात जि.प. शिक्षकांचे महत्त्वाचे योगदान – शांतिलाल मुथ्था**

सांगली जिल्ह्यात ताकारी येथे शनिवार, दि. १८ फेब्रुवारी २०१७ रोजी पार्वती खेमचंद विद्यामंदिरात मूल्यवर्धन कार्यक्रम आढावा

बैठक झाली.  यावेळी बैठकीपूर्वी भवानीनगर जि.प.प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी वेगवेगळे उपक्रम करून दाखविले. शांतिलाल मुथ्था फाउंडेशनचेसंस्थापक अध्यक्ष  शांतिलाल मुथ्था यांनी त्यांच्याशी संवाद साधला आणि मुलांचे कौतुक केले.

'मूल्यवर्धन कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात जि.प.चे प्राथमिक शाळाशिक्षक उत्कृष्ट काम करत आहेत. मुलांमध्ये आनंददायी कार्यपद्धती रुजवण्याचे काम आणि संधी निर्माण करून देण्याचे काम शिक्षण पद्धतीतूनच साध्य होते. मूल्यांचा अनुभव घेत,  त्यांचा अंगिकार करत जगणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी संविधानातली मूल्ये मुलांमध्ये रुजवली पाहिजेत. ज्यादिवशी आमच्या  मुलांना स्वतंत्रपणे विचार करण्याची संधी मिळेल, त्यादिवशी आमची मुलं चमकतील, असे मुथ्था यांनी सांगितले.

भवानीनगर केंद्रप्रमुख शिक्षकांनी सांगितले की, मूल्यवर्धन कार्यक्रम आणि ज्ञानरचनावाद यांचा जवळचा संबंध आहे. मूल्यवर्धन कार्यक्रमातील उपक्रम सुरू झाल्यापासून विद्यार्थ्यांच्या वर्तनात चांगला बदल झालेला दिसत आहे. त्यांच्यात सभाधीटपणा वाढला आहे. टापटीप– स्वच्छता वाढली आहे आणि वर्गातली उपस्थितीही वाढली आहे. महत्त्वाचे म्हणजे  इंग्रजी माध्यमात इ. पहिलीत शिकणाऱ्या ७– ८ मुलांनी मराठी माध्यमात शिकायचे असल्याचे सांगून जि.प.च्या मराठी माध्यमात प्रवेश घेतला.

''मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या माध्यमातून चांगलं पेरलेलं उगवू लागलंय'', तालुका प्रशिक्षक बरकड सरांनी यावेळी बोलताना सांगितलं.  मूल्यवर्धन कार्यक्रमाकडे  पालक सकारात्मक दृष्टिकोनातून बघत आहेत. मुलांमध्येही संघभावना, सहकार्याची भावना वाढली आहे, असेही ते म्हणाले.

जे बाजारात मिळत नाही,  जे रुजवावं लागतं ते मूल्य असं सांगून शिक्षणाधिकारी निशा वाघमोडे म्हणाल्या की, पुढच्या वर्षी सर्व शाळांमध्ये हा कार्यक्रम सुरू करण्यासाठी प्रयत्न करू.

यावेळी सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षक संघटनांचे पदाधिकारी आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

## ३०. सातारा

जि.सातारा, ता. फलटण, केंद्र– विडणी

शाळेचे नाव – जि.प.प्रा.शाळा,विडणी

मंगळवार दि.२७ /१२/२०१६, वेळ– दु.३ वा.

केंद्रातील शाळा :१९, प्रशिक्षित शिक्षक : ४९

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स) : १) भोलचंद बरकडे २) लक्ष्मण शिंद ३) सुंदर बिचकुले.

**मूल्यवर्धन पुढील पिढीसाठी अत्यंत उपयुक्त – ग.वि.अ.  विजयसिंह जाधव**

मूल्यवर्धन कार्यक्रम पुढील पिढीसाठी अत्यंत उपयुक्त आहे व या कार्यक्रमामुळे केंद्रातील सर्व शिक्षकांचा उत्साह वाढला आहे. त्यातील उपक्रमांमुळे मुले स्वतःच्या भावना व्यक्त करू लागली आहेत आणि त्यांच्यामध्ये शाळेत येण्यासाठी गोडी निर्माण होऊ लागली आहे, असे गट विकास अधिकारी विजयसिंह जाधव यांनी सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यातल्या विडणी गावात झालेल्या मूल्यवर्धन कार्यक्रम आढावा बैठकीत सांगितले. मंगळवार,दि.२७ डिसेंबर, २०१६ या दिवशी झालेल्या या बैठकीला जाधव यांच्यासह गट शिक्षणअधिकारी संजय धुमाळ, पंचायत समितीच्या सभापती वैशाली गावडे, पंचायत समिती सदस्य विठ्ठल नाळे, श्रीराम सहकारी कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब शेंडे, विडणी केंद्रप्रमुख सुंदर बिचकुले, मुख्याध्यापक भिकाजी वाडकर, फलटणमधील २२ केंद्रप्रमुख, सर्व शिक्षक व पालक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य आणि शांतिलाल मुथ्था फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शांतिलाल मुथ्था उपस्थित होते.

**'मूल्यवर्धन प्रशिक्षणामुळे १९ वर्षामध्ये मला जे जमले नाही ते मी आज करू शकलो. या उपक्रमामुळे मी मुलांना समजू लागलो व मुलांच्या भावविश्वाला हात घालू शकलो', असे उद्गार केंद्राचे मार्गदर्शक  भोलचंद बरकडे यांनी काढले.** आढावा बैठक फक्त विडणी केंद्रासाठी असून देखील फलटण मधून २२ केंद्रातील केंद्रप्रमुख आणि शिक्षक उपस्थित होते. मूल्यवर्धन कार्यक्रम संपूर्ण फलटण तालुक्यात पुढे घेऊन जाण्यासाठी त्यांनी तालुक्यातील २२ मास्टर ट्रेनर्सची यादी देखील सादर केली.

## ३१. रत्नागिरी

जि. रत्नागिरी, ता. लांजा , केंद्र– पुनस

शाळेचे नाव –जि. प. प्रा. आदर्श शाळा कुर्णे (घडशीवाडी) नं. २

गुरुवार दि. १९ जानेवारी २०१७, वेळ–दु. ४.००वा.

केंद्रातील शाळा : १०, प्रशिक्षित शिक्षक : १८

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स): १)संदीप निखार्गे २) सुनील चव्हाण ३) यशवंत पाडवे

**'मूल्यवर्धन उपक्रमाची ज्योत विद्यार्थीच पुढे नेतील '–सत्त्वशीला संसारे**

रत्नागिरीतल्या लांजा तालुक्यात पुनस केंद्रांतर्गत कुर्णे घडशीवाडीयेथील जि.प.प्रा. आदर्श शाळा नं.२ मध्ये गुरुवार दि.१९ जानेवारी २०१७ रोजी मूल्यवर्धन कार्यक्रम आढावा बैठक आयोजित केली होती. मुथ्था यांनी प्रत्यक्ष वर्गात जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. बैठकीसाठी मंडप न उभारण्याच्या सूचना दिलेल्या असतानासुद्धा भव्य मंडप उभारण्यात आला होता. **''मूल्यवर्धन उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांच्या हाती मूल्यांची शिदोरीच मिळाली आहे. ही मूल्यांची ज्योत हे विद्यार्थीच पुढे नेणार आहेत. मूल्यांची बीजे रोवण्यात आपण शिक्षक, पालक सहभागी होऊन हे परमेश्वरी कार्य पुढे घेऊन जाऊयात'' असे उदगार उपशिक्षणाधिकारी सत्त्वशीला संसारे यांनी मूल्यवर्धन आढावा बैठकीदरम्यान काढले.** या बैठकीला गटशिक्षणाधिकारी संतोष कठाळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रदीप पांचाळ, पुनस विभाग विस्तार अधिकारी विजयकुमार बंडगर, पुनस केंद्रप्रमुख यशवंत पडावे, प्रमुख साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स) संदीप निखार्गे, सुनील चव्हाण, शांतिलाल मुथ्था फाउंडेशनचेचे संस्थापक अध्यक्ष शांतिलाल मुथ्था, जिल्हा प्रतिनिधी दिलीप भंडारी, शिक्षक, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

बैठकीमध्ये शिक्षकांनी हा उपक्रम राबविताना स्वतःमध्ये आणि विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या सकारात्मक बदलांची माहिती दिली.'श्रमनिष्ठा, 'श्रमप्रतिष्ठा', 'स्त्री–पुरुष' समानता ही मूल्ये विद्यार्थ्यांबरोबरच आमच्यातही रुजली आणि आम्हाला मार्ग सापडला, असे सुनील चव्हाण यांनी सांगितले. त्यानंतर मुथ्था यांनी शिक्षक, पालकांना मार्गदर्शन केले. ''आपली मुलं सुपर कॉम्प्युटरसारखी आहेत. तीच देशाला मोठे करतील आणि ही क्रांती जिल्हा परिषदेच्या शिक्षकांमुळेच होईल'' असे शांतिलाल मुथ्था म्हणाले. या बैठकीला लांजा तालुक्याच्या १० शाळांचे प्रमुख शिक्षक तसेच हा उपक्रम संपूर्ण जिल्ह्यात घेऊन जाण्यास तयार असलेले शिक्षकही उपस्थित होते. पालकांनीही उपक्रमामुळे कुटुंबात होत असलेल्या सकारात्मक बदलांची माहिती यावेळी दिली.

## ३२. सिंधुदुर्ग

जि. सिंधुदुर्ग, ता. सावंतवाडी , केंद्र– इन्सुली

शाळेचे नाव –इन्सुली जि. प. प्रा. शाळा नं.४

गुरुवार दि. १९ जानेवारी २०१७, वेळ– स.१०.००वा.

केंद्रातील शाळा : १०, प्रशिक्षित शिक्षक : २५

मूल्यवर्धन उपक्रम साधन व्यक्ती (मास्टर ट्रेनर्स) : १) कमलाकर ठाकूर २) सुपर्णा भाईप ३) दादोजी जाधव

**मूल्यवर्धन उपक्रमामुळे मुलांमध्ये सकारात्मक बदल!**

मूल्यवर्धन कार्यक्रमाची आढावा बैठक गुरुवार दि. १९ जानेवारी २०१७ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यात सावंतवाडीतल्या इन्सुली गावात आयोजित केली होती,मूल्यवर्धन उपक्रम सुरू होऊन सहाच महिने झाले, पण विद्यार्थ्यांमध्ये इतके चांगले बदल झालेत की, क्षणभर विश्वासच बसत नाही, अशी प्रतिक्रिया पाल्यांच्या पालकांनी व्यक्त केली, तेव्हा उपस्थितांना खूपच कौतुक वाटले सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातल्या इन्सुली जि.प.प्रा.शाळा नं.४ मध्ये मूल्यवर्धन उपक्रम आढावा बैठक झाली त्यावेळी पालक आपले अनुभव सांगत होते. यावेळी सुमारे ३५ ते ४० पालकांनी आपल्या पाल्यात झालेल्या चांगल्या बदलांची माहिती मूल्यवर्धन उपक्रमाचे प्रणेते शांतिलाल मुथ्था यांना दिली. या बैठकीला शांतिलाल मुथ्था, गट शिक्षणाधिकारी शिवाजी देसाई, बांदा प्रभागाचे शिक्षण विस्तार अधिकारी बी.आर. जगताप, इन्सुली केंद्रप्रमुख कमलाकर ठाकूर, इन्सुली हायस्कूलचे मुख्याध्यापक विनोद गावकर, सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य आणि सर्व पालक, ग्रामस्थ उपस्थित होते.

बैठकीपूर्वी मुथ्था यांनी इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी विद्यार्थ्यांनी पथनाट्य, नृत्य, भाषणे, आदींद्वारे मूल्यवर्धन उपक्रमांमधील मूल्यांचे दर्शन घडविले. नंतर झालेल्या बैठकीत मुथ्थांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. विविध मान्यवरांनी या उपक्रमाचे फायदे सांगून चांगली पिढी घडत असल्याबद्दल उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. भारतीय संविधानातील स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांची शिकवण मूल्यवर्धन उपक्रमातील कृती आधारित प्रसंगांच्या द्वारे इयत्ता पहिली ते तिसरीच्या विद्यार्थ्यांना दिली जाते. हे प्रसंग त्यांच्या वयोगटानुसार आणि आकलनशक्तीनुसार तयार केलेले आहेत. बालस्नेही पद्धतीने शिक्षक मुलांमध्ये मिसळून हे उपक्रम घेतात. संपूर्ण शाळासहभाग पद्धतीनुसार शाळेचे वातावरण आणि दैनंदिन सर्वसाधारण व्यवहार यातून विद्यार्थ्यांना मूल्ये आत्मसात करण्याची संधी प्राप्त होत आहे.

## समारोप

नोव्हेंबरमध्ये अमरावती येथे सुरू झालेला हा प्रदीर्घ दौरा दि. २२ फेब्रुवारी २०१७ रोजी चंद्रपूर येथील मूल्यवर्धन कार्यक्रमाला भेट दिल्यानंतर महाराष्ट्रातील ३२ जिल्ह्यातील परिक्रमेची सांगता झाली. पुणे आणि बीड या जिल्ह्यात यापूर्वी अनेक भेटी दिल्यामुळे या दौऱ्यात भेटी दिल्या नाहीत.

या भेटीच्या निमित्ताने मूल्यवर्धन कार्यक्रमाची वाडी–व रस्त्यांवरील शाळात कशारीतीने अंमलबजावणी होते याचे चित्र अधिक स्पष्ट झाले. लहान मुलांमध्ये रूजू लागलेल्या मूल्यांचा कानोसा घेता आला. शिक्षक, पालक, अधिकारी यांच्या मूल्यवर्धन कार्यक्रमातील वाढत्या सहभागाची आणि समरसतेची पावती मिळाली. सर्व स्तरावर होऊ घातलेले हे बदल निश्चितच सुखद होते......उत्साह वाढविणारे होते. मुथ्था फाउंडेशन मधील मूल्यवर्धन कार्यक्रमाची अंमलबजावणी करणाऱ्या पथकालाही या दौऱ्यातील निरीक्षणांमुळे खूप ऊर्जा मिळाली; तसेच कार्यक्रमाची या विषयात कशाप्रकारे अंमलबजावणी करावी लागेल याचीही दिशा मिळाली या राज्य व्यापी आढाव्यामध्ये ज्या ज्या व्यक्ती/संस्थांचे सहाय्य झाले त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार.

## परिशिष्ट :

मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या आढावा दौऱ्याचे नियोजन

| अ.क्र | दिनांक | बैठकीची वेळ | बैठकीचे ठिकाण | तालुका | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|
| १ | १६ नोव्हेंबर २०१६ | सकाळी ९.०० वाजता | आसरा | भातुकली | अमरावती |
| २ | १७ नोव्हेंबर २०१६ | सकाळी १०.०० वाजता | झाडगाव | वर्धा | वर्धा |
| ३ | १७ नोव्हेंबर २०१६ | सायंकाळी ४. ०० वाजता | काटोल | काटोल / नरखेड | नागपूर |
| ४ | १३ डिसेंबर २०१६ | सकाळी ११.०० वाजता | कचनेर | औरंगाबाद | औरंगाबाद |
| ५ | १३ डिसेंबर २०१६ | सायंकाळी ४.३० वाजता | वाघूळ | जालना | जालना |
| ६ | २२ डिसेंबर २०१६ | सकाळी ९.३० वाजता | तळोधी | चामोर्शी | गडचिरोली |
| ७ | २२ डिसेंबर २०१६ | सायंकाळी ४.३० वाजता | मोहगाव तिल्ली | गोरेगाव | गोंदिया |
| ८ | २३ डिसेंबर २०१६ | सकाळी ९.०० वाजता | आंधळगाव | मोहाडी | भंडारा |
| ९ | २७ डिसेंबर २०१६ | सकाळी १०.०० वाजता | वांगी | करमाळा | सोलापूर |
| १० | २७ डिसेंबर २०१६ | दुपारी ३.०० वाजता | विडणी | फलटण | सातारा |
| ११ | २९ डिसेंबर २०१६ | सकाळी १०.०० वाजता | केकरजावळा | मानवत | परभणी |
| १२ | २९ डिसेंबर २०१६ | सायंकाळी ४. ०० वाजता | शाखा वसमत | वसमत | हिंगोली |
| १३ | ३० डिसेंबर २०१६ | सकाळी ११.०० वाजता | चौफाळा | नांदेड | नांदेड |
| १४ | २ जानेवारी २०१७ | दुपारी २.३० वाजता | शिंगवे तुकाई | नेवासा | अहमदनगर |
| १५ | ४ जानेवारी २०१७ | सकाळी ११.०० वाजता | घोटी | इगतपुरी | नाशिक |
| १६ | ४ जानेवारी २०१७ | दुपारी ३.३० वाजता | टेंभूली | शहापूर | ठाणे |
| १७ | ६ जानेवारी २०१७ | सकाळी ९.०० वाजता | वेवजी | तलासरी | पालघर |
| १८ | १० जानेवारी २०१७ | सकाळी ९.०० वाजता | महमदापूर | लातूर | लातूर |
| १९ | १० जानेवारी २०१७ | दुपारी ३.३० वाजता | निपाणी | भूम | उस्मानाबाद |
| २० | १२ जानेवारी २०१७ | सकाळी ११.०० वाजता | पिंपळोद | नंदुरबार | नंदुरबार |
| २१ | १२ जानेवारी २०१७ | दुपारी ३.३० वाजता | निमगुळ | शिंदखेडा | धुळे |
| २२ | १३ जानेवारी २०१७ | सकाळी ११.०० वाजता | शिरसोली | जळगाव | जळगाव |

| अ.क्र | दिनांक | बैठकीची वेळ | बैठकीचे ठिकाण | तालुका | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|
| २३ | १९ जानेवारी २०१७ | सकाळी १०.०० वाजता | इंन्सोली ४ | सावंतवाडी | सिंधुदुर्ग |
| २४ | १९ जानेवारी २०१७ | सायंकाळी ४. ०० वाजता | पुनस | लांजा | रत्नागिरी |
| २५ | २० जानेवारी २०१७ | सकाळी १०.०० वाजता | बिरवाडी कन्या | महाड | रागयड |
| २६ | १८ फेब्रुवारी २०१७ | सकाळी १०.०० वाजता | भवानीनगर | वाळवा | सांगली |
| २७ | १८ फेब्रुवारी २०१७ | सायंकाळी ४. ०० वाजता | हेरले | हातकंणगले | कोल्हापूर |
| २८ | २० फेब्रुवारी २०१७ | सकाळी ९.३० वाजता | शेलार्पूर खु | मोताळा | बुलढाणा |
| २९ | २० फेब्रुवारी २०१७ | सायंकाळी ४. ०० वाजता | मारसुळ | मालेगाव | वाशिम |
| ३० | २१ फेब्रुवारी २०१७ | सकाळी ९.३० वाजता | शिवार | अकोला पि.एस. | अकोला |
| ३१ | २१ फेब्रुवारी २०१७ | सायंकाळी ४. ०० वाजता | कोल्ही | बाभूगाव | यवतमाळ |
| ३२ | २२ फेब्रुवारी २०१७ | सकाळी ११.०० वाजता | कोठारी (मुले) | बल्लापूर | चंद्रपूर |

## मूल्यवर्धन कार्यक्रमामुळे काय साध्य झाले ?
## (दौऱ्यामधील अभिप्राय)

- प्रत्येक ठिकाणी विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग, आनंद व उत्साह असल्याचे जाणवले
- हे उपक्रम म्हणजे ज्ञानरचनावादाची प्रात्यक्षिकेच आहेत.
- अतिशय लहान-लहान खेडेगावांमधून जोडीचर्चा, गटचर्चा या उपक्रमामुळे विद्यार्थी विचार करू लागले आहेत.
- इयत्ता पहिली, दुसरीची मुले घरी आई-वडिलांना शौचालय बांधण्यासाठी आग्रह करीत आहेत. ही समज त्यांच्यामध्ये मूल्यवर्धनमुळे आली आहे'.
- मूल्यवर्धनमुळे विद्यार्थ्यांबरोबरच स्वतः शिक्षकांमध्येही बदल दिसून येत आहेत, असे अनेक शिक्षकांनी सांगितले
- 'मूल्यवर्धन हा उपक्रम ही काळाची गरज असून त्यामुळे प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र होण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास या कार्यक्रमाची मदत होत आहे
- मूल्यवर्धन कार्यक्रम शालेय अभ्यासक्रमाशी निगडीत असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महत्त्वाचा आहे'
- कृतियुक्त उपक्रम असल्यामुळे मुले या विषयाला कंटाळत नाहीत
- 'मूल्यवर्धन हे सामूहिक कार्य व चळवळ असून या उपक्रमातून मूल्याधिष्ठित पिढी निर्माण होत आहे
- मूल्यवर्धन कार्यक्रमामुळे मुलांचा घरकामातील सहभाग आणि संवाद वाढला!
- मूल्यवर्धन उपक्रमामुळे मुलांचा सर्वांगीण विकास होतो, मुले धीट झाली, शिक्षक-विद्यार्थी आणि विद्यार्थी-विद्यार्थी यांच्यातील संबंध मित्रत्वाचे झाले, मुले एकमेकांची काळजी घेतात
- 'मूल्यवर्धन कार्यक्रमाचे परिणाम दूरगामी आणि चिरकाळ टिकणारे'






**SHANTiLAL MUTTHA FOUNDATiON**

८ वा मजला, मुथ्था चेंबर्स २, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६, महाराष्ट्र, भारत

+९१ २० ६६०५ 0000

+९१ २० ६६०५ ०१९१

www.mutthafoundation.org

info@mutthafoundation.org